Regd NO. N. 150

# वऱ्हाडसमाचार.

## Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख १ माहे फेब्रुवारी सन १९१५ ई० [ अंक ५

### वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

### नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

WANTED smart and energetic men to work as agents in every town on very lucrative terms. Apply to:-
The National Indian Life Insurance Co. Ltd.,
166, Hornby Road - Bombay
No. No. 12

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवाबर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक अकोला १।१।०९ } J. G. Ridland. एजंट

नो. नं

सतत ४२ वर्षें चाललेला कारखाना

**ए. जे. ह्यात्रे आणि सन् सुगंधी.**

ठि:-पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदिर भुलेश्वर - मुंबई.

एकच भाव! ! एकच भाव! !

ओटो मुरगी आमचेकड मिळणारा माल ओटो मुरगी

अत्तरें.- गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल, रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६रु.

तेलें.- चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगंधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा, १ तोळ्यास ४ आ ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना (निरनिराळ्या सुवासाचा) दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ. १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुर्टे व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हॅल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**
नो. नं. ४

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ५

## डायरी बक्षीस!!

(१)खडे तात्विक बोल, भाग १ ला, किंमत ६. (२)खडे तात्विक बोल, भाग २ रा, किंमत ६. [३) धर्मपद, किंमत ४. (४) पांगारकरकृत एकनाथचरित्र, किंमत ५. (५) बिदग्धवाङमय, किंमत ६. (६) आकोलें (वऱ्हाड) येथील साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष रा. हरिभाऊ आपटे यांचें भाषण, किंमत २. ७ मुलांस-थोडा उपदेश, किंमत ८. (८) वाल्मीकीचा जय, किंमत ८. (९) अण्णा किर्लोसकरकृत संगीत सौभद्र व संगीत शाकुंतल, किंमत प्रत्येकीं १२. (१०) शिवलीलामृत किंमत ८. या यादीपैकीं आठ आणे किंमतीचीं पुस्तकें मागविणारास पुढील ह्मणजे सन १९१५ ची, कापडी बायंडिंगची, भरपूर माहितीची, लहान [पॉकेट] डायरी बक्षीस मिळेल; व एक रुपया किंमतीचीं, पुस्तकें मागविणारास कापडी बायंडिंगची, भरपूर माहितीची मोठी डायरी बक्षीस मिळेल. टपालखर्च निराळा पडेल.

**भट आणि मंडळी, पुणें शहर.**
नो. नं. ६

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेम्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ८ व्हीपीनें १२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही. पी. रु० १६




**सर्वत्र एजन्टस् पाहिजेत**

**पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी**
नो. नं. ७

### केशराचें फूल मुफ्त

पवित्र केशर ॥।=शुद्ध शिलाजीत ॥ असली कस्तूरी २४ ममीरातिनती ३ खालिस हींग ८= तो० सुंदर कामदार शाल ३ व

$३\frac{१}{२}+१\frac{१}{२}$ गज ६ शे १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२
नो० नं० ८

### अनुभवून पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमींट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध, याच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपैण; व्रण, चिखली, सुकी, ओली खाज, जखम, नखाविषयीं, तमाम रोगावर चालणारा १ च 'दिलखुष' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो पौष्टीक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे, विंचवावर पूड किं. १ रु० व डोळ्यांतील वेगळे सोडण्याचे औ. किं ४ आणे, वि० खु० पत्रद्वारें, वंग प्रवाल हात भट्टीचे किं० तोळ्यास २ रु०

पत्ता - व्ही० आर० मुळे,
नांदुरा. जी० आय० पी०
नो० नं० ९

### नोटीस

नोटीस बेशमी लक्ष्मी जवजे भाष्कर सोनार रा. देऊळगांव साकरश्या ता. मेहेकर

इसः-

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तूं माझी लग्नाची बायको आहे. तूं आजपर्यंत माझे घरीं जनरिती प्रमाणें होती. परंतु या दोन वर्षांत तूं आपले आईबापाचे घरीं गेल्यामुळे मी तुजला दोन तीन वेळां नेण्यास आलो तरी तूं आली नाहीं त्यामुळे मी एकवर्ष झालें दुसरी बायको गंधर्वाची केली तरी मी पुन्हा तुजला नेण्याकरीतां दोन तीन वेळां आलो असतां आली नाहीं. मी गंधर्वाची बायको केली तरी तुजलाही वागविण्यांस तयार आहे. तूं आपले बापाचे व भावाचे सांगण्यावरून आली नाहीं. तरी या नोटिशीनें कळवितो कीं मी तुजला वागविण्यास तयार असून माझे घरीं अन्नवस्त्र देण्यांस तयार आहे तूं आपले बापाचे घरी राहून मी तुजला निराळे अन्नवस्त्राचा जबाबदार नाहीं. व तुझा कोणतेच प्रकारचा जबाबदार नाहीं. तरी ही नोटीस पावले

तारखे पासून आठ दिवसाचे आंत घरीं यावे याप्रमाणें न केल्यास रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल कळावे ता० २६ १-१९ ई

सही.

भास्कर पांडोबा सोनार आकेगांवकर दस्तुर खुद.

नो. नं. ४९

## नोटीस

नोटीस बेशमी विश्वनाथ सोनार रा० मौजे पाळोदी पोष्ट मानोरा प्रगणें गिरोली तालुका मंगरूळपीर जिल्हा आकोला.

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं आपली मुलगी सौ॥ कोंडाबाई मर्द माधव ही माझी सुन असल्या कारणानें मी आपले घरीं सुनेस नेण्याकरितां ता० २-१-१९ इसवी रोजीं मी आणि माझा मुलगा नामे माधव असे आम्ही दोघे मुलीला नेण्याकरीतां आलो असतां आपण मौजे मजकूर येथील मुसाभाई कच्ची याचे दुकानावर मला व माझ्या मुलाला जबरदस्तीनें आपण घेऊन जाऊन कागद लिहीला व माझ्या मुलाला मुसाभाई कच्ची कागद लिहीणार पिराजी व आपण असे तिघे जण ह्मणाले कीं या कागदावर सही कर तेव्हां माझा मुलगा ह्मणाला कीं मला हा कागद कशाचा आहे. आणि या कागदावर काय लिहीले आहे. हें कांहींच समजत नाहीं. यावरून मी सही कसा करूं तेव्हां आपण माझ्या मुलाला चापटमारून जबरदस्तीने सही करविली व मला ह्मणालात कीं तुझा आंगठा या कागदास लाव तेव्हा आपण माझ्या मुलाला मारिले होतें या भीतीनें मी नाईलाजास्तव आंगठा लाविला यावरून मला संशय येतो कीं माझी सून सौ॥ कोंडाबाई इच्या आंगावर असलेले दागीनें येणेप्रमाणें:-

तोळे ४० तोड्याचा जोड १
तोळे २ सोन्याचा चितांक १
तोळे ३० पायजीब्याचा जोड १
तोळे २० दंडवाळ्याचा जोड १
तोळे १? काकण ४

सोन्याच्या ४ माशाच्या बाळ्या आणि घोस १ मासे आणि मुलीचे कपडे वगैरे सामान आहे. वर लिहीलेले सामान जिरविण्याकरितां आपण रोखा लिहून घेतला किंवा दुसरे मुलीचे सांडपत्र लिहून घेतले. किंवा मुसाभाईचे रुपये आपले कडे असल्यामुळें माझे मुलाचे व माझे नांवचा कागद लिहून घेतला किंवा कोणाचे कर्जरोख्यावर सही घेतली कोण जाणे हें कांहींच समजत नाहीं तरी ही नोटीस मिळाल्यापासून १९ दिवसाचे आंत तो जबरदस्तीनें लिहीलेला कागद काय ह्मणून लिहिला हे कळविणें. वरील मुदतींत न कळविल्यास तो कागद रद्द समजूं. दस्तुर हनमंत दत्तबा इंगळे रा० सवणा

सही

लक्ष्मीबाई मर्द तुकाराम जात सोनार रा० दिवठाणे हल्लीं मु० शिरपूर पो. महागांव ता. पुसद जि. यवतमाळ इचे हातचा आं. द. हनमंत दत्तबा इंगळे

नो. नं. ४६ द. खुद

## नोटीस

नोटीस बेशमी कटू वा॥ लक्ष्मण शेळकी कुणबी रा० सुकळी तां० बाळापूर व सर्वत्र साहूसावकार इतर लोक

या सर्वांसः—

या नोटिशीनें कळवितो कीं तुमचे कडे जे माझें येणे आहे दोनदस्तायवजाबद्दलचे त्यापैकीं मुद्दल, रु० ४०० चारशे व त्याचे व्याज व कोर्ट खर्च याजबद्दलचा आजरोजी दिवाणी कोर्टांत दावा दाखल केला आहे. या पैशा बद्दल तगादा करून थकलों तरी पुढें सदरहू दाव्याचा निकाल होईपर्यंत तुह्मी आपली कोणतीही स्थावर जंगम इस्टेट गहाण, खरीदी अगर पट्यानें कोणालाही देऊ नये. दिल्यास त्याबद्दल तुह्माला जबाबदार धरलें जाईल तसेच सर्वत्रांस ही कळवितों कीं वरील इसमाची मालकींची कोणतीही स्थावर अथवा जंगम इस्टेट कोणी वरील दाव्याचा निकाल होईपावेतों गहाण खरीदी पट्यानें घेऊनये. घेतल्यास तें घेणे व त्या संबंधीं झालेली कागद पत्रें रद्द समजलीं जातील. कळावें. ता० २१।१।१९१९

सही

कृष्णाजी दीपाजी घोगरे रा० सुकळी

नो० नं० ४७ द. खु.

## नोटीस

तांनी मर्द नारायण झाली रा० गारडगांव ता० खामगांव

ईसः—

खालीं सही करणार नारायण सखाराम झाली यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं वऱ्हाड समाचार छापखान्यांतून ता० ११।१।१९ रोजीं मला नोटीस दिली त्यात तूं लिहिलें कीं मला एक वर्षापासून मारहाण करून घालवून दिले परंतु हे तुझे ह्मणणे खोटें असून उलट मी घरीं नसतां व माझे मागे मला न विचारतां तूं आपले भावा बरोबर निघून गेली व माझा सर्व दागीना व तुजजवळ ठेवलेले रुपयेही घेऊन गेलीस नंतर मी तुला आणण्याकरिता दोनवेळ माझा चुलता पाठविला परंतु तूं आली नाहीं शेवटीं मी स्वतःतुला नेण्याकरितां आलो परंतु माझेही बरोबर आली नाहीं. नंतर मी माझे दागीनें व रुपये मागितले तेही तूं दिले नाहींस व आतां खोटेच लिहीतेस कीं मला ४०० रुपये कर्ज झाले तरी असे बहाणें न करितां ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचें आंत तूं माझे दागीनें व रुपयासह माझे घरीं यावें मी वागविण्यास तयार आहे नाहीं तर माझे दागीनें व रुपये व गंधर्वाचे खर्चाचे रुपये देऊन तूं आपली फारकत घ्यावी या दोहीतुन कोणतेही एक न केल्यास मी तुझेवर माझे दागीनें व रुपये याजबद्दल दावा करीन व तुझे खावटीचा बोजा माझेवर राहणार नाहीं व माझे नवरेपणाचा हक्क सुटणार नाहीं कळावे ता. २७-१-१९ इसवी सही.

नारायण सखाराम झाली राहणार पाथर्डी दस्तुर खुद पो. पाथर्डी ता० आकोट

नो. नं. ४८

## जाहीर नोटीस

सर्वत्र साहूसावकार व गांवकरी लोकांस खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं माझा मुलगा नामें रामजी वल्दद लक्ष्मण कुणबी रा. कोथळी ता. मलकापूर हा दुर्व्यसनी निघाला आहे त्यास कर्ज-वगैरे कोणी देऊं नये, दिल्यास त्या कर्जाबद्दल मी व माझी स्थावर जंगम इस्टेट जबाबदार नाहीं कळावे ता. २७-१-१९१९ इ.

सही.

लक्ष्मण वल्दद चंद्रभान तायडे रा. कोथळी ता. मलकापूर

नो. नं. ४९

## नोटीस

रा० रा० रामजी वा॥ लक्ष्मण तायडे रा० कोथळी ता० मलकापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून जाहीर नोटीसीनें कळविण्यांत येते कीं तूं माझा मुलगा असून अलीकडेस तूं दुर्व्यसनाचे छंदास लागून पैशाचा खराबा करीत आहेस. त्या दुर्व्यसनाकारिता तूं लोकांचे कर्ज काढत असशील अगर काढशील तर त्या कर्जाचा जबाबदार मी अगर माझी स्थावर जंगम जिंदगी नाहीं. जो कोणी तुजला माझे संमतीशिवाय कर्ज देईल त्याचाही मी अगर माझी जिंदगी जबाबदार नाहीं हे तुजला कळावें. ता० २६।१।१९१९

सही

लक्ष्मण वा॥ चंद्रभान तायडे रा० कोथळी ता० मलकापूर

नो० नं० ५०

## नोटीस.

नोटीस बेशमी तुकाराम कृष्णाजी चौधरी राहणार मौजे मंचनपूर तालुका आकोट

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येते कीं तुमचे व आमचे वडाळीचे शेत सर्वे नंबर ४ एकर ७१ यांत तुमचा हिस्सा १२ वा एकर ५ गुंठे ३६॥ चा असून रुपाये ७०० मालासुद्धां सौदा झाला त्या दिवशीं रुपये ३०० इसार ह्मणून वडाळी येथें दिले ४०० रुपये आठ दिवसानीं द्यावे व खरेदी करुन घ्यावे व पुढें करांराप्रमाणें रुपये घेऊन रजिष्टर करण्यास चला ह्मटले तुह्मी ज्वर आहे असे ह्मटलें तरी दिड महिन्याच्यावर बरेच दिवस होऊन गेले तर आज उद्या दिवस करून घेतां हल्लीं तुह्मी गांवात चर्चा करिता कीं मी पैसे घेतले नाहीं. व सौदा झाला नाहीं. तर मी एकटा नसून च्यार मंडळीं गांवची असून वडाळी येथें सौदा होऊन ३०० रुपये तेथेंच तिन्हाइती घेऊन तुह्मांस दिले तुह्मी त्याशींच प्रथम सौदा केला याच माझे शेतात मी कोणास येऊ देत नाहीं. त्याचे संमतीनें तुमसी सौदा झाला रुपये थोडे नाहींत तर तुह्मी मनांत दुखत असाल तर दिले रुपये परत घेण्यास खु: आहो भलते रद्द काढून गैर आहे तुह्मी बंधु असून जगात हंसे करणें तुह्मास शोभत आहे काय! ज्या दिवशीं आपली मर्जी असेल त्या दिवशी खरेदी करून द्यावे राही-

त्या रुपयास व्याज मिळणार नाहीं भलत्याचे नादीं लागुन आपलाच खराबा आहे परंतु खुशी नसल्यास हे शब्द लिहिले तर खुद्द माझे हातची पावती अक्षरांखेरीज असल्याशिवाय तुमची लबाडकी मानेल नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल शेतांत येण्याची तुह्मास मनाई आहे. कळावे तारीख २६ माहे जानेवारी सन १९१९

सही.

देवराव दिनाजी चौधरी राहणार मंचनपूर दस्तुर खुद.

नो. नं. ५१

## नोटीस

रा सटवा वल्दद गणपती वारीक रा० धोत्र ता० चिखली यांसः—

आनशी मर्द सटवा वारीक रा. डासाळवाडी ता० चिखली इजकडून नोटीस दिली जात कीं तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून गेल्या पंधरा वर्षांत माझी विचार पुस केली नाहीं. २।३ वेळा बोलाविले आले नाहीं तुह्माला संसार नको आज पावेतो माझ्या संसाराची माती केली. आतां तरी १९ दिवसांत येऊन माझे संसाराची सोय करावी नाहींतर मी दुसरा घरठाव करीन मग तुमचा मजवर कांहीं हक्क चालणार नाहीं. कळावे ता. २८-१-१९ इ०

सही.

आनशी मर्द सटवा वारीक सहीची नी०

नो. नं. ५२

## ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत **श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य** याचे उपनिषदावरील भाष्य, **आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास **'वैशेषिक दर्शन'** बक्षीस-

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें—

## आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १ रु० वरील विषयां शिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ याचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात. नमुना मागवां.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट. २४१ सदाशिव पेठ पुणे.

नो० नं० १३

## बालहत्याप्रतिबंधकगृह.

( पंढरपूरची संस्था. )

श्री पंढरपूर हें क्षेत्र ह्मणून जसें प्रसिद्ध आहे तसें ते एक निराळेंच महा पुण्यकार्य करीत आहे. त्या कार्याची ओळख ज्या समाजांत पुनर्विवाह प्रारूढ नहींत त्या समाजाला अवश्य पाहिजे. स्त्रीपुरुष मोहामध्यें जेव्हां पाप करतात आणि पुरुष मात्र त्या पापाचें फळ भोगण्यास तयार नसतो तेव्हां त्या स्त्रीला गर्भधारणा ही मृत्युप्राय होत असते. लोकलज्जा ही राक्षसी प्रमाणें तिच्या पाठीं लागलेली असते आणि अशा संकटांत मार्ग दाखविणारा कोणी ही संत तुकाराम तिला भेटत नाहीं. पंढरपुरीं अशा पतित स्त्रियांना थोडीशी सोडवणूक आहे. ही सोडवणूक जी संस्था देते तिच्या १९१३-१४ सालचा वार्षिक रिपोर्ट आमच्याकडे आला आहे. त्या रिपोर्टाच्या अखेरीस मुंबईच्या प्रार्थना समाजाचे सेक्रेटरी रा. रा. द्वा. गो. वैद्य लिहितात कीं:—वरवर पाहणारास हा आश्रम ह्मणजे एक अनीतीचें माहेरघर आहे असें दिसतें. पण आज ३९ वर्षांपासून तो जें कांहीं पवित्र कार्य करीत आहे, त्याचा विचार शांतपणें केल्यास आश्रमांतील अनाथ बालकांविषयीं त्याचे हृदयांत दया उत्पन्न झाल्याशिवाय रहाणार नाहीं! मग ते किंतीही पाषाणहृदयी असोत!! पाप ह्मणून जें कांहीं होतें तें आश्रमाबाहेरचें आहे. आश्रमांत जी कांहीं कामगिरी बजावित आहे, ती खरोखर पुण्य कारक होय, याबद्दल मुळींच मतभेद होण्याचें कारण नाहीं. आश्रमास मदत करणें ह्मणजे सत्पात्रीं दानच" होईल हें समजस माणूस कबूल करील

ही संस्था अत्यंत उपयोगी आहे इतकेंच नव्हे तर समाजाच्या मोठेपणाच्या मानानें ही संस्थेचीं क्षेत्रें पुष्कळशा भागांतून व्हावयाला पाहिजे आहेत. व्यभिचाराच्या गर्भासंबंधीं जीं समाजचीं पातकें पर्वता येवढीं आहेत तिच्याकडे कानाडोळा करून कांहीं उपयोग नाहीं त्या पापाशीं लढाईच केली पाहिजे आणि समाजाची नीति उच्च कोटीला पोंचेपर्यंत असे **अनाथ बालकाश्रम** कितीतरी ठिकाणीं पाहिजे हें विचारी मनुष्य सहजीं कबूल करील. पंढरपूरच्या आश्रमाचा इतिहास मोठा हृदयद्रावक आहे तो आह्मी खालीं देत आहों त्याचा हेतु एवढाच कीं हें शब्दचित्र पाहून ठिकठिकाणच्या लोकांनीं या कार्याकडे दृष्टी द्यावी. आणि पतितांना पावन होण्याचा मार्ग खुला करण्यासाठीं हा पहिला दरवाजा उघडून द्यावा हा दरवाजा पहिला ह्मणतों याचें कारण यानें समाज पुण्यशील होणार नाहीं पण निदान निष्पाप तरी होईल.

### पूर्ववृत्तांत

इ. स. १८७५ च्या ग्रीष्मऋतूंत एके दिवशीं पहाटेस चंद्रभागेच्या कांठीं फिरत असतां एका सद्गृहस्थास ठेंच लागली. पायास काय लागलें तें नीट न्याहाळून पाहता एक जिवंत मूल आहे, असें आढळून आलें. त्या मुलाचें अंग रक्तानें भरलेलें असून, नाळ न कापतांच एका लुगड्याच्या चिंधींत कोणीं त्याला गुंडाळून टाकिलें होतें. त्या गृहस्थानें त्या अर्भकास मोठ्या प्रेमानें घरीं आणून त्याच्या पालनपोषणाकरितां आपल्या पत्नीच्या देखरेखीखालीं एका दाईच्या स्वाधीन केलें.

वरील सद्गृहस्थ अमदाबाद प्रार्थनासमाजाचे अध्यक्ष प. वा. **रा. ब. लालशंकर उमियाशंकर त्रिवेदी** हे होत. हे त्या वेळीं पंढरपूर येथें सबजज्जच्या कामावर होते. त्यांना वरील मूल सांपडल्यावर असें आढळून आलें कीं, पंढरपूर मुक्कामीं अशीं टाकलेलीं मुलें वारंवार सापडतात आणि पुढें तपासाअंतीं ५—६ महिन्यांत त्यांना अशीं कांहीं मुलें मिळालींही. त्यांचें पालनपोषण करण्यासाठीं त्यांनीं एक लहानसें घर भाड्यानें घेऊन तेथें त्याची सर्व व्यवस्था दायांकडून चालविली. याबद्दलचा सर्व खर्च प्रथम ते स्वतःच करीत असत. नंतर त्यांस ह्या बाबतींत त्याच्या अपदाबादच्या कांहीं मित्रांकडून मदत मिळूं लागली. अशी व्यवस्था कांहीं दिवस चालल्यावर पुढें सन १८७६— ७७ सालीं भयंकर दुष्काळ पडला. त्या दुष्काळांत निराश्रित झालेल्या मुलांच्या पोषणाकरितां प. रा. ब. लालशंकर ह्यांच्याच खटपटीनें **अनाथ बालकाश्रम** नांवाची संस्था स्थापण्यांत आली. तिची हकीकत दुसरीकडे दिली आहे. ह्या दोन्ही संस्थांची व्यवस्था पंढरपूर येथें एक स्थानिक कमिटी नेमून इ. स. १८८१ पर्यंत चालविण्यांत आली. पुढें प. रा. ब. लालशंकर ह्यांची बदली परगांवीं झाली. तेव्हां त्यांच्या पश्चात् आश्रमाची व्यवस्था स्थानिक कमिटीकडून निभावणार नाहीं असें त्यांस वाटल्यावरून ह्या दोन्ही संस्था मुंबई येथील **प्रार्थना समाजाच्या** स्वाधीन करण्यांत आल्या. तेव्हांपासून ह्यांची सर्व व्यवस्था आणि जबाबदारी आजपर्यंत समाजाकडेच आहे.

### इमारत.

संस्थास गृह पाहिजे होतें तें कायमचें बांधण्याकरिता येथील प्रसिद्ध व उदार भाटे गृहस्थ परलोकवासी शेट **चतुर्भुज मुरार**जी यांनीं रु. ११,००० दिले. या रकमेची दगडी इमारत बांधली. तिच्या मध्यभागीं एक मोठा दिवाणखाना असून दोहोंबाजूस चार चार खोल्या आहेत. मागें व पुढें दोन मोठाले ओटे आहेत. मागील बाजूस एक पाण्याचा हौद आहे. त्यांत नळानें पाणी आणून सोडलें आहे. तो सन १८९१ सालीं बांधला. त्याचा कांहीं खर्च प. वा. शेट **लीलाधर शामजी** यांनीं दिला. हींत सुमारें १०० मुलांचा समावेश होण्यासारखा आहे. शिवाय इमारतीच्या सभोंवतीं मोठें आवार ( कांपाउंड ) आहे. पुढील आवारासभोंवतीं भिंत नव्हती, ती सन १८९६ सालीं प. वा. **तुकाराम तात्या** यांनीं आपले मित्र व आश्रमासाठीं झटणारे समाजाचे एक सभासद प. वा. **नारायण महादेव परमानंद** यांच्या स्मरणार्थ बांधून दिली. इमारतीच्या रस्त्याकडील बाजूला एका कोनांत बरीच खुली जागा होती त्यावर हल्लीं एक इमारत "त्रिकोणाकृतीच्या १०+१० च्या १० खोल्या, १२ + १० च्या ६ खोल्या, व २१ × १० ची १ खोली असलेला" बांधण्याचा चालकांचा विचार आहे. या कामास १५००० रुपये लागतील असा अजमास आहे. दानशूर मंडळीच्या मदतीशिवाय हें होणें अगदीं अशक्य आहे.

या इमारतींत बालहत्याप्रतिबंधकगृह व अनाथ बालकाश्रम या दोन्ही संस्थांचा समावेश होतो. पश्चिमेकडील बाजूच्या खोल्यांत बालहत्याप्रतिबंधक गृहांतील विधवा व मुलें यांस राहण्याची सोय केली आहे व बाकीच्या भागांत अनाथ बालकें व आश्रमाचे सुपरिंटेंडेंट राहतात. सालगुदस्त येथें येणाऱ्या स्त्रियां करितां ६ खोल्या नवीन बांधण्यांत आल्या. त्यामुळें एकाच वेळीं १२ स्त्रियांस रहाण्याची सोय झाली आहे

आश्रमाच्या मागील कंपांउंडांत नर्सला रहाण्याकारिता एक खोली चालू सालीं बांधली आहे.

### संस्थेची आवश्यकता.

अज्ञानामुळें व विशेषेंकरून हिंदुसमाजांतील वरिष्ठ वर्गांत चालू असलेल्या जबरीच्या वैधव्यामुळें, ज्या हतभागी बायकांचें पाऊल वांकडें पडतें, त्याजवर संतती होण्याची वेळ आली ह्मणजे मोठा दुर्धर प्रसंग वोढवतो. अशा बायकांपैकीं बहुतेक वयानें लहान व अजाण असतात व कित्येक अब्रूदार घराण्यांतल्या असतात त्यामुळें अशा बायका प्रसूतीच्या अगोदरच आपमतलबी दुष्ट माणसांच्या नादीं लागून गर्भपात करण्यासाठीं नाना प्रकारचे मुर्खपणाचे उपाय करितात आणि या योगें शरीराची हानि करून घेतात; आणि इतकें करूनही त्यांच्या दुष्ट हेतु साध्य झाला नाहीं, तर बालहत्येच्या घोर पातकासही त्या तयार होतात आणि शेवटीं केव्हां केव्हां त्याचे हें सारें कृत्य उघडकीस येऊन त्या आपल्या अब्रूला, समाजाला व अखेरीस स्वतःच्या जीविताला ही मुकतात व आपल्या मागें आपल्या कुळाला काळीमा लाऊन ठेवितात.

अशा बायका यात्रेचें वगैरे मिष करून क्षेत्राच्या ठिकाणीं जातात आणि तेथें नदींत किंवा वाळवटांत आपल्या अर्भकांचें विसर्जन करून मोकळ्या होतात. अशा प्रकारच्या असंख्य बालहत्या होत असलेल्या उघडकीस न येतां आमचीं पुण्यक्षेत्रें हीं अशा घोर अनाचाराच्या जागा झाल्या आहेत, हें बहुतेकांस विदीतच आहे. पहिल्याच पातकाचें निराकरण सहृदय अंतःकरणानें झाले असतां पुढील अनर्थ परंपरा टळण्यासारखी आहे, इतकेंच नव्हे तर ज्या कोणा भोळ्या स्त्रियांचें एकदां चुकून वाकडें पाऊल पडतें, त्यांना पश्चात्ताप घडून अशा संस्थेच्या द्वारें त्या पुनः सन्मार्गास लागण्याचा पुष्कळ संभव आहे.

### एक आक्षेप.

तरुण व अजाण विधवांच्या अब्रूच रक्षण करून त्यांस सदाचाराकडे वळविणें आणि त्यांच्या पोटीं जन्मलेल्या निरपराधी बालकांचे प्राण रक्षण करणें हें प्रत्येक नागरिकाचें पवित्र कर्तव्य असूनही कित्येक असमंजस माणसाकडून घेण्यांत येत असतो तो असा कीं, या संस्थेमुळें अनाचारास उत्तेजन दिल्यासारखें होतें. परंतु हे लोक असा विचार करीत नाहींत कीं, हें गृह स्थापण्यापूर्वी असले अनाचार अनेक घडले ते कां? व अद्यापही ज्या शेंकडों बायकांना ह्या गृहाची मुळींच माहिती नाहीं, त्यांचेकडूनही दुष्कृत्यें घडतात तीं कशामुळें? तेव्हां असे आक्षेप घेणें अविचाराचें आहे, हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. इतर सर्व सुधारलेल्या देशांतही अशाच प्रकारच्या संस्था स्थापाव्या लागल्या आहेत. वरील कारणामुळें आमच्या देशांत तर हिची विशेष आवश्यकता आहे.

---

वऱ्हाडसमाचार

मिति माघ वद्य २ शके १८३६

---

## वऱ्हाडांतल्या सेंट्रल ब्यांका.

आमच्या लोकांना व्यापारी शिक्षण चांगल्या गुरूचे हाताखालीं मिळण्याची सोय झाली तर आह्मी लोक व्यापाराची विद्या तेव्हांच हस्तगत करूं ही नुसती घमेंड नाहीं, तर अनुभवसिद्ध गोष्ट आहे याला प्रमाण पाहणें असेल तर मध्यप्रांत आणि वऱ्हाड यांतील परस्पर सहकारी मंडळांच्या १९१३।१४ सालच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टांत सापडेल. गेलें साल देशी व्यवस्थेखालीं असलेल्या अनेक ब्यांका बुडाल्यामुळें फार खडतर गेलें. लोकांचा ब्यांकांवरचा विश्वास उडाला होता. पैसे ब्यांकांत घालण्यापेक्षां जमीनींत पुरून ठेवलेले पतकरले असें लोकांना वाटूं लागल्यामुळें शेतासारख्या महत्वाच्या कार्याला नेहमी लागणारा भांडवलाचा पुरवठा मिळण्यास अडचण पडूं लागली, मग ब्यांकांत पैसे घालण्याचें नांव कशाला? अशा स्थितींतही आमच्या वऱ्हाडांतल्या सेंट्रल ब्यांकांचें काम प्रशंसनीय व सुरळीतपणानें चाललें व नव्या सेंट्रल ब्यांकाही स्थापन झाल्या ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. या बद्दलचें श्रेय ब्यांकेच्या व्यवस्थापकांस दिलेंच पाहिजे पण त्यापेक्षां ही सरकारी अधिकाऱ्यांची उत्कृष्ट देखरेख आणि काळजी पूर्वक योग्य मार्ग निदर्शन या दोन गोष्टी याच्या मुळाशीं अधिक आहेत हीगोष्ट कबूल केली पाहिजे. आमच्या वऱ्हाड प्रांतांत आकोला, खामगांव, उमरावती व यवतमाळ या चार ठिकाणीं सेंट्रल ब्यांका आहेत. आणि चारी ठिकाणीं उत्तम व्यवस्था दृष्टीस पडली ही अभिमानास्पद गोष्ट आहे. आकोला सेंट्रल ब्यांकेला फार प्रतिकूल परिस्थितींत काम करावें लागलें. लोकांजवळ भांडवल भरपूर असून ते तें भांडवल सेंट्रल ब्यांकेंत ठेवण्यास नाखुष होते. वऱ्हाडांतल्या सहकारी मंडळ्यांवर विशेष नजर ठेवण्याची जरूर आहे असें सरकारी अधिकाऱ्यांचें मुद्दा मत आहे; शेतकऱ्यांमध्यें प्रामाणिकपणाचा अभाव विशेष. अशा स्थितींत स्थानिक गृहस्थांकडून कसून तपासणी करण्याचे बाबतींस चूक झाली. ब्यांकेच्या म्यानेजरानें दौरा करावयाचा ते

केला नाहीं. अशा सर्वतोपरी प्रतिकूळ स्थितींत सुद्धां ना. रा. ब. केशवरावजी दामले, रा. रामभाऊ महाजनी, धर्माधिकारी, भिकाजी परशराम, सूर्यभान जानजी, व कुळकर्णी या बिनसरकारी डायरेक्टरांनीं आपलें कर्तृत्त्व दाखवून त्यांकेचा उत्कर्ष केल्याबद्दल सरकारी अधिकाऱ्यांचा संतोष संपादला ही गोष्ट सामान्य नाहीं. खामगांवच्या ब्यांकेला मदत करण्यास बिनसरकारी गृहस्थ पुष्कळ पुढें आले, व त्यानीं काम चांगलें केलें. अशा गृहस्थांत रा. अणेकर देशमुखद्वय, व रा. आपाजी खंडेराव हे प्रमुख होते. रा देशमुख यांच्या खटपटीनें नऊ नव्या संस्था स्थापन झाल्या ही गोष्ट रिपोर्टीत नमूद केली आहे. देखरेख व हिशोबांची तपासणी हीं दोन कामें ब्यांकांच्या सुव्यवस्थेंत मुख्य आहेत, आणि हीं दोन्ही उमरावतीचे रा. जोशी, केतकर, देशपांडे, दामले, रंगराव पांडे, देवराव चंपतराव बोधनकर व जयवंत या गृहस्थांनीं काळजीपूर्वक केल्यामुळें ब्यांकेच्याहातून चांगली कामगिरी झाली. यवतमाळच्या सेंट्रल ब्यांकेसंबंधानें आम्ही पूर्वी एकवार लिहिलेंच आहे. त्यांत येवढेंच आणखी घालावयाचें कीं या ब्यांकेची भिस्त बाहेरून मिळणाऱ्या सांपात्तिक मदतीवर विशेष असते. तशी तिनें न ठेवतां स्वावलंबन अधिक दाखविलें पाहिजे. वऱ्हाडांतल्या एकंदर सगळ्याच ब्यांकानीं गेल्या सालीं आपलें काम चांगलें केलें, व अत्यंत प्रतिकूळ स्थिति असतांही प्रगतीच्या मार्गात पुढें पाऊल टाकून मतभेद झाला तरी रजिस्ट्रार साहेबांस मनःपूर्वक साह्य केलें. ब्यांकेची व्यवस्था योग्य रीतीनें करण्याचे कामीं सरकारी अधिकाऱ्यांकडून जें महत्त्वाचें शिक्षण देण्यांत येत आहे तें घेण्याचे कामीं कुचराई दाखविणें स्वतःच्याच हिताला अत्यंत अपायकारक असतें. पण तशी कुचराई न करतां सर्वांनी तें शिक्षण घेण्यांत तत्परता दाखविली व ज्या गुरुच्या कृपेनें हें शिक्षण मिळत आहे त्याचे उपकार मानण्यांत स्वतःची मानहानि आहे अशी भलतीच समजूत करून घेतली नाही. याचें फळ यंदाची उत्कर्षाची स्थिति हें तर आहेच. पण या पेक्षां भावी काळांत तें अधिक दिसून येईल.

## फौजदारी कायद्याची अंमलबजावणी.

हिंदुस्थानांत फौजदारी कायद्याची अंमलबजावणी कशी विचित्र रीतीनें होत असते याविषयीं लिहितांना कलकत्याची अमृतबझारपत्रिका ह्मणते कीं ना. मि. दादाभाई यांच्या प्रश्नास दिलेल्या उत्तरावरून असें दिसतें कीं १९१२ सालीं शेकडा ४८ व १९१३ सालीं शेकडा ६० इतक्या खटल्यांत खुनाचे आरोपी सेशन्स जजापुढच्या तपासणींत दोषमुक्त ठरले, ह्मणजे आरोपी ह्मणून धरून आणलेल्या इसमांपैकीं निमे बिचारे खरोखर निरपराधी असतां त्यांना पोलिसकडून होणारा त्रास व छळ मुकाट्यानें सोसावा लागला! अशी विचित्र न्यायाची पद्धति पृथ्वीच्या पाठीवर कोणत्या तरी सुधारलेल्या राष्ट्रांत असेल काय? हिंदुस्थानांतच आढळून येणारा दुसरा विचित्र प्रकार ह्मणजे आरोपी निर्दोषी ठरल्यावर त्या निकाला विरुद्ध अपील करण्याचा सरकारला ठेवलेला अधिकार हा होय यावर पत्रिका आश्चर्ययुक्त उद्गार काढते कीं हा अधिकार युरोपियन आरोपीच्या बाबतींत मात्र सरकार क्वचितच बजावतें, आणि देशी आरोपींच्या संबंधांत हायकोर्टाचे विद्वान् जज्ज सुद्धां फारसा विचार न करतां निर्दोषी ठरलेल्या आरोपीविरुद्ध कल काढून त्यांना पुनः तपासणीच्या भयंकर दिव्यांत खेचून आणितात!

## समंगलम!!

**[ यवतमाळ येथील मराठी शालागृहाचा वास्तुसमारंभ ]**

मुहुर्ताची मेढ जशी यशस्वी माणसाच्या हातून रोंवावी लागते. तसाच वास्तु समारंभही यशस्वी माणसाच्या हातून करविण्याचा परिपाठ आहे. तशांत शालागृह ह्मणजे विद्यानगरी तेव्हां अशा मंगल विद्यालयाचा प्रवेश समारंभ सर्वश्रेष्ठ अशा राजपुरुषाच्या हातून व्हावा यांत योजकाची तारीफ करावी तितकी थोडीच होय. काल मानानें सर्व देवपण अधिकारी मंडळींत उतरलें आहे. तेव्हां पूर्वीचा शास्त्रोक्त वास्तु जाऊन त्या ठिकाणीं आलीकडे शिष्टाचार असा पडला आहे कीं वास्तु सारखे प्राण प्रतिष्ठा करण्याचा बहुमान श्रेष्ठशा अधिकाऱ्याला द्यावा आणि त्याच्या त्या शोभन कृतीनें स्वतःस बहुमान्य करून घ्यावें. यवतमाळ म्युनिसिपालिटीनें असा सुयोग गेल्या मंगळवारीं चांगला साधला आणि सर बेंजामिन रॉबर्टसन सारख्या श्रीमान व उदार अधिकाऱ्यांना मानपत्र देऊन त्यांच्या हातून तेथील नव्या मराठी शालागृहाचे दरवाजे उघडे करून घेतले. असे समारंभ राज्यकर्ते व नागरिक लोक यांच्यामधील एक समास क्रियाच होऊन बसली आहे. आणि असा हा सुयोग घडवून आणल्याबद्दल यवतमाळची म्युनिसिपल कारभारी मंडळी लोकांच्या अभिनंदनाला विशेष पात्र आहे. या प्रसंगीं अलिशान. सर रॉबर्टसन यानीं रा. रॉड्रिग्ज व इतर म्युनिसिपल सभासद यांस उद्देशून मराठी शालागृहाच्या प्रवेश समारंभाला हजर असण्यासंबंधींचा आनंद व्यक्त करून मानपत्राबद्दल आभार प्रदर्शित केले. ते ह्मणाले कीं मानपत्रांत प्रस्तुतच्या महायुद्धासंबंधानें उल्लेख आहे, या युद्धांत पडणें हें साम्राज्याला न्याय्य होत या विषयींचा यवतमाळ येथील लोकांनीं आपला मनोभाव व्यक्त केला आहे. तसेंच श्रीमान् चक्रवर्ती बादशहा विषयीं आपली दृढतम राजनिष्ठा व निःसीम भक्ति याही त्यांत व्यक्त आहेत. असेच मनाचे थोर उद्गार मध्यप्रांत व वऱ्हाड यामधील सर्व भागांकडून जेव्हां जेव्हां निघाले तेव्हां तेव्हां त्यांचा आम्ही सार्वजनिकरीत्या स्वीकार केला आहे. आपल्या डेप्युटी कमिशनरांनीं कळविलें आहे कीं आपण लढाईच्या फंडाला यवतमाळास फार तत्परतेनें मदत केली आहे. आणि आपणांवर अधिक वर्गणी मागण्याचा प्रसंग येईल का कीं ही लढाई पुष्कळ काळ पर्यंत चालेल आणि तिच्या विपत्तिही फारच फार वाढतील. तेव्हां वर्गणीच्या मागणीला आपण आनंदानें रुकार द्याल आणि या मोठ्या हानीलाही मोठ्या नेटानें पाठ द्याल व जे योद्धे आपल्या देशाच्या लढाया लढत आहेत त्यांना यथाशक्ति मदत करण्यास पुढें सरसावाल अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे.

आपला अंदाजा असा दिसतो कीं यवतमाळ पर्यंत येणारी जी नवीन रेल्वे येत्या एप्रिल मध्यें व्यापाराला खुली होईल ती रेल्वे आपल्या नगरीला विशेष महत्त्व आणील आणि त्याच्या योगानें या शहराच्या उत्पन्नाचीही चांगली भरभराट होण्याचा काल आपल्या दृष्टीसमोर समीप येत आहे. रेल्वे स्टेशनाजवळच्या जागा आपण गृहें व दुकानें बांधण्यासाठीं आंखून देण्याच्या योजना चालविल्या आहेत हें पाहून संतोष वाटतो. मी आपणांस सुचवितों कीं ही नवी होणारी वस्ती प्रशस्त व नमुनेवाईक करण्यांत यावी. आणि इमारती ही चांगल्या भरव्या भक्कम उभारण्यांत याव्या. या गोष्टींकडे पूर्वी नीटसें लक्ष दिलें जात नसे त्यमुळें नगराच्या तोंडींच असंगळ वसती झालेल्या आहेत व तेथें समोंवारच्या गोष्टीही आरोग्याला बाधक अशाच असतात. त्यामुळें तेथील सर्व शोभा जाते व या गोष्टी सांप्रतच्या गरजांच्या विरुद्ध आहेत

तरुण पिढीमध्यें खेळांना उत्तेजन रा. चॅपमन् यांचेकडून जें मिळत आहे त्याचा आपण इतका गौरव करतां हें पाहून आह्माला विशेष आनंद वाटतो. नुकतीच केळापूरला शाळेतील विद्यार्थ्यांमध्यें झालेली पोहण्याची शर्यत आमच्या पहाण्यांत आली आणि मुलें कितीतरी उत्कंठेनें निरनिराळे खेळ खेळतात हें पाहून विशेष आल्हाद वाटतो. या मैदानांतल्या खेळांना उत्तेजन मिळाल्यामुळें मर्दानी व पराक्रमी शील प्रसृत होण्याचा मोठा संभव असतो आणि हाच पुरुषकार आमच्या तरुण मंडळी मध्यें वाढावा अशी आपली सर्वांची इच्छा आहे. रा. चॅपमन यांनीं विद्यार्थ्यांची जी „ "लीग ऑफ् ऑनर" (स्वयं सेना ) काढली आहे तिचें वर्णन ऐकून आह्मांस मोठें कौतुक वाटतें. ही कल्पना फार नामी आहे आणि जो जो विद्यार्थी यांत सामील होईल त्यानें आपल्या या संस्थेचे नियमधर्म प्रामाणिकपणें पाळावे असें आह्मी मुद्दाम सांगतों. जेव्हां कोणी शास्ता उभा असेल तेवढ्या पुरतेच हे नियम पाळावयाचे आहेत अशी किंचिन्मात्र कल्पना होऊं देऊं नका. हे नियम ज्या ज्या गोष्टी सांगतात त्या त्या आपल्या दिनचर्येंत उतरल्या पाहिजेत ह्मणजे तसें शील बनेल आणि स्वकर्तव्य आणि स्वाभिमान यांची उच्च कल्पना मनांत उदय पावेल.

यवतमाळास विद्यादाना संबंधानें विशेष कळकळ दिसून येते हें आह्मीं ओळखून आहों आणि आतांच जी सुंदर इमारत खुली करण्यांत आली आहे तीच साक्ष देते कीं मुलांना त्यांच्या पुढील आयुष्याची योग्य अशी तयारी करून देणारें योग्य शिक्षण मिळावें आणि तेंही प्रशस्य अशा परिस्थितींत व्हावें या संबंधानें लोकांची इच्छा मोठी जागृत आहे. हें मराठी शालागृह आजपासून आह्मी खुलें करतों आणि यापासून या शहरच्या तरुणांमध्यें ज्ञानप्रसार करण्यामध्यें ही शाळा सर्वथैव यशस्वी होवो असें आह्मीं इच्छितों!

## सामाजिक परिषद.

महाराष्ट्रांतील प्रांतिक सामाजिक परिषद जेव्हां पुण्यास गेल्या मे महिन्यांत भरली होती तेव्हांच असा संकेत ठरला होता कीं यंदाची वार्षिक बैठक उमरावती येथें भरविण्यांत यावी. या येत्या बैठकीची पूर्व तयारी ह्मणून गेल्या १७ व्या तारखेला सामाजिक सुधारणेची कळकळ असलेल्या गृहस्थांची एक सभा भरून स्वागत कमिटी नेमण्यांत आली. व तिचें अध्यक्षस्थान रा.रा. नामदार मोरो विश्वनाथ जोशी यांस देण्यात आलेलें आहे. ईस्टरच्या सुटीमध्यें एप्रिल ३ व ४ या दोन तारखांस ही सभा भरविण्यांत येईल तेव्हां मुंबई इलाखा, मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील सामाजिक सुधारणेसंबंधानें कळकळ बाळगणाऱ्या सद्गृहस्थांनीं सभेला हजर रहाण्याची योजना आतांपासूनच मनांत योजून ठेवावी. सामाजिक सुधारणेच्या बाबतींत उमरावती अग्रभागीं आहे असा तिचा लौकिक तरी आहे. तेव्हां या लौकिकाला अनुरूप असाच येत्या परिषदेचा सर्व कारभार सुखकर व यशस्वी होईल इतकेंच नव्हें तर स्त्री शिक्षणासारख्या महत्त्वाच्या विषयाला जें मूर्त स्वरूप प्राप्त झालेलें आहे त्याच्या भावी भरभराटीलाही ही सभा विशेष कारणभूत होईल अशी आह्मी आशा करतों. रा० रा० आर० आर० जयवंत, बी० ए० एल्० एल्० बी० वकील, हे पत्रव्यवहाराचे सेक्रेटरी आहेत.

## लढाई.

लढाईचे दोन मासले असतात. प्रत्यक्ष लढाई व अप्रत्यक्ष लढाई. या दोन्ही मासल्याचा अनुभव गेल्या अंकातील तारांवरून चांगला येत आहे. प्रत्यक्ष लढाई पश्चिमच्या बाजूनें संयुक्त सैन्यें सध्यां करीत नाहींत. तूर्त लढाईचा मुख्य भर खुष्कीवर नसून समुद्रावर आहे. उत्तर समुद्रांत आरमाराच्या लढाया चालू आहेत. जर्मन आरमार व ब्रिटिश आरमार हीं परस्परापासून १५ मैलांच्या टप्प्यांत येऊन लढत होतीं. परस्पर आरमारावर तोफांचे गोळे सुटत असत. या गोळ्यांची गती कमीत कमी ७ मैलांपेक्षां अधीक आहे. लायन नांवाच्या जहाजानें ब्लूचर वर सर्व माऱ्याचा भर केला तेव्हां तें बुडालें. ब्लूचर वरील ३०० खलाशांना कैद करून एडिंबरो येथील किल्यात नेण्यात आलें आहे. इकडे काळ्या समुद्रात सिनपी शहराजवळ टर्कीचीं १६ विमानें घेऊन चाललेली १ आगबोट रशियनानीं सफे बुडऊन टाकली. काळ्या समुद्रातच लीबो हें रशियन बंदर आहे. त्यावर शत्रूच्या झेपेलिननें पुष्कळ बॉम्ब गोळे टाकले. तेव्हां तेथील किल्यावरील तोफांनें उलट मारा करून त्या झेपेलीनचा नाश केला. बाल्टिक समुद्रांतील डगेन या रशियन बेटावर ग्याझेली नांवाच्या जर्मनक्रूझराचा टार्पेडो सोडून नाश करण्यांत आला. हें २६०३ टनाचें क्रूझर होतें आणि त्यावर ४ इंची दहा तोफा होत्या त्याची गती २१ नॉट्सची होती. फॉकलंड बेटाजवळ

लिवाझिक नांवाच्या लढाऊ जर्मन जहाजानें पाण सुरुंग टाकून ठेवले होते त्यामुळें "ग्लासो" या ब्रिटिश जहाजाला पाण सुरुंग टाळण्यासाठीं शत्रूचा पाठलाग सोडून रस्ता धरावा लागला. आरमाराची जेव्हां लढाई चालते व गोळ्यांचा जेव्हां भडिमार सुरू होतो तेव्हां क्षितिजावर धुराचे लोळ इतके पसरतात कीं शत्रू कडील जहाज कीं आपल्या कडील जहाज यहा गोष्टी नीटशा कळण्याचा मार्ग नसतो. अशा प्रसंगीं जेव्हां शत्रूची पंचवीस पंचवीस हजार टनापर्यंतची जहाजें समुद्रास्तृप्यंतु होतात त्या वेळेला लढाईच्या जयापजयाची दिशा नीट कळून येण्यासारखी आहे. आतां खष्कीवरील लढायामध्यें संयुक्त सैन्याचा मोर्चा उत्तरोत्तर पुढेंच पडत आहे. परव्हीसच्या भागांत वायप्रेस जवळील शत्रूंचे हल्ले मोठे निकराचे होते. आणि त्या ठिकठिकाणच्या हल्या मध्यें पुष्कळसे लोक मेल्यावर शत्रूंना माघार घेणें भाग पडलें. **सॉयसॉन्स** येथें फ्रेंचावर जर्मन सैन्यानें विलक्षण जोमानें हल्ला केला आणि पुष्कळ सैन्य एके ठिकाणीं केले होते. या हल्यामध्यें जर्मन सैन्यानें आपले पूर्वीचे गमावलेले बरेचसे भाग व खंदक हस्तगत करून घेतले पण त्याच्या उलट ब्रिटिश सैन्यानें **लॅवासी** नावाचें ठाणें सर करून शत्रूंना मागें हटविलें. इकडे रशियन सैन्यानें पूर्वेकडील रणक्षेत्रावर जयामागून जय मिळविले आहेत. पोलंडच्या रण मैदानांत त्यांनीं आणखी आठ लक्ष सैन्य गोळा केलें आहे. आणि **वार्साच्या** पश्चिमेनें जर्मन सैन्य इतकें मागें हटत चाललें आहे कीं रशीयन सैन्य लवकरच जर्मनींत दाखल झाल्याचें आपणास ऐकू येईल. रशियानें टर्कीवर जी लढाई सुरू केली आहे तींत ही कॉकेशसच्या भागात टर्क लोकांना माघार घ्यावी लागत आहे. **सारीकामिश व आर्डहान** येथें तुर्कांचा पराभव झाल्यानंतर ते **कारा ऊरगान** येथें परतले आहेत. या पराभवामुळें टर्कीला अधीक सैन्य देखील मिळण्याची आशा वाटत नाहीं. ही वरील हकीकत प्रत्यक्ष लढाईची झाली. आतां अप्रत्यक्ष लढाई जर्मनी व आस्ट्रिया यांस अगदीं पेंचात आणीत आहे.

ही लढाई म्हणजे उपासमारीची लढाई होय. प्रत्यक्ष लढाईपेक्षां ही उपासमारीची लढाई उत्तरोत्तर भयंकर होत चालली आहे आणि त्यामुळें जर्मन राष्ट्र लवकरच अगदीं टेकीला येईल असा रंग दिसतो. जर्मनीच्या व आस्ट्रियाच्या भूपरिस्थितीकडे पहिले म्हणजे बाल्टिक समुद्रापासून तों दक्षिणेस भूमध्यसमुद्रापर्यंत पसरलेला असा एक सलगच प्रदेश आहे. जर्मनीचे पश्चिमेस हॉलंड, बेल्जयम, फ्रान्स, स्वित्झरलंड हे देश क्रमाक्रमानें असून आस्ट्रियाच्या अगदीं नैऋत्येस इटाली आहे. पूर्वेस आस्ट्रियाच्या सरहद्दीशीं भिडलेला रशीयन भाग आहे. रुमानिया, मॉटेनिग्रो, सर्व्हिया, व बल्गेरिया हीं संस्थानें दक्षिणेस आहेत. यापैकीं हॉलंड, स्वित्झरलंड, इटली, रुमानिया, व बलगेरिया हे देश लढाईत सामील नसून त्यांनी वृत्ती तटस्थ आहे. पण या तटस्थ राष्ट्रांच्या द्वारानें जर्मनीला अमेरिकन व्यापारी अन्नाचा पुरवठा करतात इतकेंच नव्हेतर बंदुकांच्या गोळ्या करण्याच्या तांब्याचाही पुरवठा या त्रयस्थ राष्ट्रांच्याद्वारें होत आहे असा प्रकार ग्रेटब्रिटनच्या दृष्टीस पडल्या बरोबर त्या संबंधानें अमेरिकन राष्ट्राला विचारणा ही करण्यांत आली आहे.

प्रत्यक्ष जर्मनीमध्यें गव्हाचे भाव दुपटी वर गेले आहेत आणि तांबें उपलब्ध नाहीं म्हणून अँटवर्प येथील रेल्वे स्टेशनचे तांब्याचे दरवाजेही गाळण्यात आले तिकडे ही विलक्षण तूट पडली असून त्या बरोबरच डेनमार्क, स्वीडन, नॉर्वे, हॉलंड व इटली या त्रयस्थ राष्ट्रांमध्यें अश्रुतपूर्व असा धान्यांचा पुरवठा व तांब्याचाही संचय करण्यांत येत आहे. अमेरिकन बंदरांतून हा सर्व माल घेऊन तो या त्रयस्थ राष्ट्रांना पोचविण्यासाठीं जहाजें निघतात त्यामुळें त्याच्यावर ग्रेट ब्रीटनला हल्लाही करता येत नाहीं आणि इकडें तर हीं त्रयस्थ राष्ट्रें त्यांच्या पूर्वीच्या इतिहासांत कधींही लागला नाहीं एवढा अन्नाचा व तांब्याचा पुरवठा अमेरिकेकडून मागवीत आहेत. आणि म्हणूनच लढाईचे मुख्य प्रधान सर एडवर्ड ग्रे म्हणतात कीं अमेरिकेकडून योग्य खुलासा न मिळेल तर हा सर्व माल शत्रूकडे जाणारा आहे असें समजून पकडण्यांत येईल. हीं त्रयस्थ राष्ट्रें म्हणजे जर्मनीचीं तोंडेंच बनलीं आहेत तेव्हां त्यांच्याद्वारें होणारा पुरवठा बंद करणें अगदीं भाग झालें आहे आणि हा पुरवठा कडेकोट बंदोबस्तानें बंद पडेल तर लागलीच उपासमारीनें चालविलेली क्रांती जर्मनीला फारच थोड्या काळांत जमीनदोस्त करील असें त्या राष्ट्रांत चाललेल्या अंतःस्थ चळवळी वरून व आपसांतील कलहावरून स्पष्टपणें ध्वनित होत आहे.

## व-हाड वृत्त

हवामान— खामगांव मलकापूर या तालुक्यांतील काहीं भागांत खंडवृष्टी झाली व कित्येक ठिकाणीं गाराही पडल्या. तथापि हे किरकोळ अपवाद वगळतां हवा चांगली निवळली असून रूक्ष व आरोग्यकारक होत चालली आहे. थंडीचें मान पुष्कळ कमी आहे व शिशीर ऋतु प्रसृत असल्या सारखे सर्व फेरफार अनुभवास येतात. रोगराई नाहीं ही ईश्वराची कृपाच होय.

रा. रा. डी. जी. ऑरचर्ड पोलीस सुपरिंटेंडन्ट रायपूर यांस येथें बदल्या कारणानें रा० रा० जी० डब्ल्यू गेअर या मुनन अधिकाऱ्याची येथून नागपुरास बदली झाली आहे.

रा० रा० अवातखान पोलीस इन्स्पेक्टर यांस यवतमाळास बदलण्यांत आलें.

रा० रा० भगवंत नारायण सब इन्स्पेक्टर यांस इन्स्पेक्टर करून बैतूल जिल्ह्यांत बदलण्यांत आलें.

**उतारूंच्या रेलगाड्या** — चालू महिन्यापासून आकोल्यास भुसावळेकडे जाणारी ९ वाजतां सायंकाळीं येणारी गाडी व तसेंच रात्रीं भुसावळेहून निघून येथें रात्रौ ९ वाजता येणारी गाडी अशा दोन गाड्या बंद करण्यांत आल्या आहेत व त्या मानानें उमरावती व खामगांव कडील दोन्ही शाखांच्या ट्रेनी बंद करण्यांत आल्या आहे. रेल्वेचा व्यापार फार मंदावला आहे आणि लढाई बंद होईपर्यंत आणखी किती डिफिशट होईल हें सांगवत नाहीं.

**स्वागत**—रा. रा. क्रास्थवेट सहकारी पेढीचे रजिष्ट्रार यांची स्वारी सध्या येथें आली आहे. आणि पश्चिम वऱ्हाडांतील सहकारी मंडळ्या अधीक यशस्वी व लोकोपयोगी करण्यासंबंधानें त्यांनीं भगीरथ प्रयत्न चालविले आहेत. उमरावती जिल्ह्यांतील सहकारी पेढ्यापेक्षां इकडील काम चांगलें आहे असें म्हणतां येत नाहीं. मुख्य सेंट्रल ब्यांकेचें भांडवल अगदीं थोडें असून लोकांच्या हजारों रुपयांच्या ठेवी येतील असा विश्वासही लोकांमध्यें उत्पन्न झालेला दिसत नाहीं. सहकारी पेढीचें हें मोठें व्यंग्य होय. राजश्री क्रास्थवेट सारखे प्रेमळ, मन मिळाऊ व कष्टे कार्यदक्ष अधिकारी आपणास लाभले आहेत तेव्हां त्यांच्या प्रयत्नानें ही उणीव लवकरच दूर होईल असा आम्हास भरंवसा वाटतो. या बाबतींत लोकमत जागृत करण्यासाठीं व नवीन बनविण्यासाठीं नामदार रावबहादूर दामले आदिकरून गृहस्थ पुढें पुढें येत आहेत ही आनंदाची गोष्ट होय.

कर्नल लेन साहेब तुरुंग खात्याचे इन्स्पेक्टर जनरल हे वार्षिक तपासणी निमित्त येथें आले आहेत तेव्हां ते कैदी लोकांना तुरुंगांतील शिस्तीनें सुधारण्यापेक्षां विद्यामृताचा पेला पुढें करून कैदी मंडळींना अधिक पुनीत करतील तर आम्हास विशेष आनंद होईल. पूर्वी रावबहादुर महाजनी आदिकरून कांहीं गृहस्थ तुरुंगांत जाऊन उपदेश करीत असत. तोच पूर्वीचा क्रम पुन्हा चालू होईल तर विद्यादानाचें अंशतः तरी कार्य सिद्धीस जाईल.

**अभिनंदन** — रा. रा. दामोदर गणेश पाध्ये एम. ए. प्रिन्सिपॉल गोकुळदास हायस्कूल मुंबई हे सध्या विश्रांती साठीं म्हणून येथें आले आहेत. प्रोफेसर वर्डस्वर्थ साहेबांच्या वेळचे हे चांगले शिष्य असून त्यानीं आज वीस वर्षें मुंबईची विद्यासंस्था उत्कृष्ट चालविली इतकेंच नाहीं; तर ते आपल्या राजमान्य लेखांनीं, कधीं कधीं काव्य स्फूर्तीनें देखील, त्याच्या आवडीचीं वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें यांचे रकाने विभूषित करीत आहेत. आणि सार्वजनिक व राजकीय चळवळींत त्याचा मुंबई सारख्या ठिकाणीं पुढाकार आहे व युनिव्हरसिटींत ही हे फेलो म्हणून काम करीत असतात अशा गृहस्थाविषयीं कोणालाही अभिमान वाटेल पण हे वऱ्हाडच्या हायस्कूलचे विद्यार्थी असल्याकारणानें व त्यांच्या इकडील आप्तमित्र मंडळीस या बहादरीच्या कामगिरीचें विशेष कौतुक वाटते आता यांना मुंबई कार्पोरेशननें स्कूल कमिटीचे सेक्रेटरी नेमिलें आहे आणि या नव्या जागीं त्यांचें कार्यक्षेत्र विद्याखात्याच्या डायरेक्टरासारखेंच आहे. या कामींही त्यांस सुयश मिळो व त्यांची कारकीर्द अधिक कल्याणप्रद होवो असें आम्ही इच्छितों.

**सहकारिता** या विषयावर राजश्री क्रास्थवेट यांनीं गेल्या शनिवारीं सायंकाळीं येथील निवडक अग्रणी लोकांसमोर फार सुंदर व्याख्यान दिलें; व श्रोतृ मंडळींत एक निराळाच उत्साह व स्फूर्ती उत्पन्न केली आहे. या विषयांत ते पारंगत आहेत आणि इंडियाच्या सर्वच प्रश्नाची गुरुकिल्ली सहकारितेंत आहे असें उत्तम प्रतिपादन त्यांनीं केलें. या प्रांतात सहकारी पेढ्या यशस्वी होतील तर अशा सारख्या सर्वथैव त्या कार्यी वाहून घेणाऱ्या सद्गृहस्थाच्या पवित्र हस्तानेंच होणाऱ्या आहेत.

**सन्मान**— राजश्री क्रास्थवेट हे आकोल्यास विशेष आवडते झाले आहेत. येथील नव्या बोट-क्लबांत त्यांचा आदरसत्कार करण्यांत आला आणि सेंट्रल-ब्यांके तर्फे त्यांस काल तिसरे प्रहरीं पानसुपारी देण्यांत आली.

स्थानिक सरकारचे चीफ सेक्रेटरी सर आरथर ब्लेनेरहॉसेट बार्ट बी० ए० आय० सी० एस० यांस यवतमाळास दवऱ्यावर असतांना अर्धांगवायूची विकृती होऊन गेल्या गुरुवारीं तेथेंच देवाज्ञा झाली हें कळविण्यास फार दुःख वाटतें. हे फार चांगले अधिकारी होते आणि त्यांच्या आकस्मिक मरणानें नामदार चीफ कमिशनर यांचा उजवा हातच नाहींसा झाला.

**लढाईची वर्गणी**— हा फंड ९ लक्ष १४ हजारा पासून वाढता वाढता चालू माहिन्या अखेर रुपये १०१९११७— ७ आणे ७ पै जमला आहे. मुख्य रक्कम द्रुग जिल्ह्यातून ९१ हजारावर आली आहे. या वर्गणीपैकीं ७६४३१९ रुपये ७ आणे १ पै ही रक्कम दिल्लीच्या सेंट्रल कमिटीकडे पाठविण्यांत आली आहे.

**स्वीकार** — आमचे स्थानिक व्यवसाय बंधू रा० रा० पंढरिनाथ परशराम खेळकर मालक वतनदार छापखाना यांनीं चालू सालचे पाठविलेलें १९१५ चें कॅलेंडर पोंचलें. हे गृहस्थ बहुगुणी आहेत तेव्हां त्यांनीं चालविलेल्या छापखान्याच्या भरभराटीची हें क्यालेंडर जाहीर पत्रिकाच होय.

**भीष्म प्रतिज्ञा**—या नव्या संगीत नाटकाचा प्रयोग भारत नाट्यकला मंडळीनें गेल्या शनिवारीं करून दाखविला. या पडत्या हंगामांतही नाट्यकलेविषयींची लोकाभिरुची विशेष तारीफ करण्यासारखी आहे.

## नोटीस

या नोटीसीनें अकोलें म्यु० कमेटीचे हद्दींतील सर्वत्रास जाहिर करण्यांत येते कीं सन १९१५ ई० साला करितां घर व गाडी जनावर पट्टीच्या करांच्या याद्या तयार आहेत. तरी ज्या कोणास सन १९१४ सालापेक्षां जास्त आकारणी बद्दल अगर ज्यावर नवीन पट्टी बसली असेल त्याबद्दल कांहीं तकरार करणें असेल तीं त्यानें ही नोटिस प्रसिद्ध झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आंत खालीं सही करणार यांज कडेस लेखी करावी. सदर्हु कराबद्दल च्या याद्या म्यु० आफिसांत ऑफीसचे वेळीं पहावयास मिळतील. कळावें ता. ३०-१-१९१५

*R. M. Gupte*
*Vice Chairman*
*Municipal Committee*
*AKOLA.*

नो. नं. ९३

शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

## सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

संधिवात, फेंपरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण,
प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरीयनचें जीवनामिक्श्चर



हजारों लोकांचें प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून
वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ८१२
वी. एच जव्हेरियन कंपनी,
खलासांचकला, मुंबई.

नो० न० २२

मांगलिक प्रसगीं बक्षीस देण्याकरितां


संटचाराजा.

## ओटो—दील—चमन.

हें सर्वोत्तम सेंट मुद्दाम वापरण्यासाठीं हल्लींच्या फॅशनचें हें एकच होय. फक्त २—३ थेंब रुमालावर टाकल्यानें चमेलीच्या आणि बटमोगऱ्याच्या हजारों ताज्या फुलांइतका सुवास ८ दिवसपर्यंत टिकतो एका लहान बाटलींत हा सुगंधी पुष्पांचा भांडार आहे किं, रु. -॥- -॥|- व रु. २ ट. ख. वेगळा. सुवासिक कार्डे दिलचमनचीं दर डझनास रु. -॥|- ”

सोल एजन्ट्स. एच, आर. मोदी आणि कं.
नं. १० प्रिन्सेस स्ट्रीट, मार्केटसमोर, मुंबई.

सतत ९० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला
दूषित रक्त शुद्ध करणारा




शरीराचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळ व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षवातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच **सार्सापरिला** देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१|. टपालखर्च -|- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नकल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक--** डा. गोतमराव केशव, आणि सन्
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई नंबर २.

नो० नं २३

## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनाविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क “सँडो”
व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी साठ्याचें तल,

किंमत रुपये ५ ट्रेड मार्क “सँडो”

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.
सरकारचे अनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

परमा सायरप.

कमरयाही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध. एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,
खबुतरखाना भुलेश्वर मुंबई

नो० नं० २४

## Oriental Government security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER
THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDs 4 CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Extra Assunces. |
|---|---|---|
| | Rs | Rs. |
| 1888 | 8668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8 47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 62 097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36 38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80 [illegible]5,818 |
| [illegible] | 3136,421 | 1.4[illegible],32356 |
| 1903 | [illegible]0709 | 2,1[illegible],95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,2[illegible],79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,4[illegible],61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

“ At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future.”

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL
Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

*M. deSOUZA,*
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh,* NagPUr

N. N. 25

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआत्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd NO. N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख ८ माहे फेब्रुवारी सन १९१५ ई० [ अंक ६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } J. G. Ridland. एजंट

नो. नं २

### केशराचें फूल मुफ्त

पवित्र केशर ॥।= शुद्ध शिलाजीत ॥ असली कस्तूरी २४ ममीरातिनती ३ खालिस हींग ४८ तो० सुंदर कामदार शाल २ व $2\frac{1}{2}+1\frac{1}{2}$ गज ६ शे १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२

नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागले आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ९

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.**

नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ० खर्चासह तीन रुपये. यांत **श्रीशंकराचार्य, शंकरानंद,** व **विद्यारण्य** याचे उपनिषदावरील **भाष्य, आत्मपुराण** व **अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊनें तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास '**वैशेषिक दर्शन**' बक्षीस-

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ८० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात, नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो० नं० १३

### नोटीस

नोटीश बेशमी नागी मर्द गणसा तेली रा० घाट लाडकी ता० मोर्शी

ईसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी लग्नाची बायको आहेस. तुला सुमारे सवावर्ष झाले तुझ्या आईनें भूलथापीनें तुला घरीं नेले. माझा भाऊ भवानसा तुला नेण्याकरितां आलो त्या नंतर मी स्वतः तुला नेण्या करितां आलो परंतु तुझ्या आईनें तुला लपविले. तुझा पत्ताच लागू दिला नाहीं यावरून तुझे आईचे मनांत माझे येथें नांदू देणे नाहीं असे दिसते. तरी ही नोटीस पावतांच तुझे अंगावर असलेले डागीने चांदीच्या गुंडवाळ्याचा जोड १ तोळे ४० व दंडवाळ्या तोळे ३० मुरक्या सोन्याच्या वजन तोळा १ नथ मासे ९ चांदीचे कडे व पाटल्या तोळे १२ व साडी किंमत रुपये ३९ येणें-प्रमाणें डागीने व कपडा यासह माझे घरीं नोटीस पावतांच आठ दिवसाचे आंत नांदण्यास यावें मी तुला नांदविण्यास तयार आहे. न आल्यास कोर्ट मार्फत तुला कबजांत घेईन. कोर्टाची पायरी चढण्याचा प्रसंग तुला व मला येऊं नये ह्मणून अगाऊ सुचाविले आहे. हा सर्व तुझी आई मुंगसाई व तुझा मामा परशराम यांचा फंद आहे. याबद्दल सर्वस्वी तुह्मी तिघेही जबाबदार आहांत. तूं माहेरी गेल्यामुळें तुझा अन्नवस्त्राचा जबाबदार मी नाहीं कबजांत घेण्याबद्दल कोर्ट खर्च व नोटीशीचा तुह्मापासून घेतला जाईल कळावें ता० ३०।१।१९ इ. द० सदाशीव निंबाजी. पटवारी

सही
गणसा गोंपीसा तेली
रा० बोरगांव द० खु०

नो. नं. ९४

### नोटीस.

नोटीस बशेंमी केळो वा॥ [पांड्या जात महार रा० कोकल्ड ता० दर्यापूर पो० कोकल्ड

यांसः—

मी खालीं सही करणार इजकडून या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं, मी तुमची लग्नाची बायको असून मला तुह्मी चार वर्षांपासून टाकून दिले तेव्हांपासून मी माझे आई बापाचे येथें राहात आहे. माझे आईबाप गरीब असल्याकारणानें माझें खाण्यापिण्याची गैरसोय होत होती ह्मणून मी माझे उदर निर्वाहाकरितां लोकाचे कर्ज ३०० रुपये काढले आहे. माझा बाप व मी स्वतः तुमचे येथें पंचास घेऊन आले होते. तेव्हां तुह्मी पंचासमक्ष सांगितले कीं, ही माझेपेक्षां मोठी आहे. तर मी हीला वागवित नाहीं. करितां या नोटीशीनें कळविते कीं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत लोकाचें कर्ज ३०० रुपये देऊन मला घेऊन जावें. तसें न केल्यास हींच नोटीस फारकती समजून मी दुसरा गंधर्वाचा नवरा करीन. मग तुमचा मजवर नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. व माझे गंधर्वाचे नवऱ्यावरही तुमचा कोणतेच प्रकारचा दावा चालणार नाहीं. कळावे ता० ११।१।१९ इसवी.

सही
पुर्णी मर्द केळो रा० पळसोद
बल्याची नि० खु० हिचे
हातचा आंगठा असे

नो० नं० ९९

### नोटीस

वि॥ सीनीअर सबजज्ज सा० बहादुर कोर्ट आकोला अर्ज नंबर १३ सन १४ नेमली ता० १३।३।१९१९

अर्जदार जनाबाई मर्द काशीराम मारवाडी रा० आकोला बिन अर्जदार भीवराज पुरणमल मारवाडी रा० आकोला ज्याअर्थी मयत काशीराम पुरणमल मारवाडी आकोला याचे कर्ज वसूल करता येण्यासाठीं सार्टिफीकीट देण्याबद्दल वरील अर्जदार इनें अर्ज केला आहे. त्याअर्थी सदरहु मयताचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून जे कोणी दावा करतील त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं सदरहु अर्जाचे सुनावणी करितां नेमलेल्या दिवशीं ह्मणजे तारीख १३ माहे ३ सन १९१९ इसवी रोजीं कोर्टांत हजर होऊन आपापले हक्काबद्दल लेखी कैफीयत दाखल करावी.

कळावें. आज तारीख १ माहे २ सन १९१९ ई॥ रोजीं आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशीं दिले आहे.

D. K. Kolhatkar
सीनीअर सबजज्ज
आकोला

नो० नं ९६

**बहिष्कृत भारत.**

वर्ष २ रें. २ ऱ्या वर्षापासून पृष्ठें वाढविलीं आहेत. व पत्र नियमितपणें काढण्याची व्यवस्था केली आहे. वा. व. ट. ख. सह २ रुपये.

म्यानेजर बहिष्कृत भारत
उमरावती.

नो. नं. १७

## नोटीस

नोटीस बेशर्मा बिहारीसींग देवीसींग परदेसी हजाम रा० मलकापूर

यांसः—

मी खालीं सही करणार यांज कडून नोटीस देण्यात येते कीं माझ्या मुलगीचे आपल्यासी लग्न होऊन बरेच दिवस झाले असून तिजला आपण आज्ञानाचे वेळी पोषण केले व आतां ती सज्ञान झाली असून तिजला आपण हल्ली मुळीच वागवीत नाहीं. व तुह्मी संसाराचे योग्य नाहीं. करितां आपणास या नोटिसीचे द्वारें कळविण्यात येते कीं तुह्मी जगाच्या रीती प्रमाणें आपल्या बायकोस वागवावे आणि तीन वर्षापासून मी तिचे पोषणाचे करितां सावकाराचे पैसे काढून पोषण केलें आहे त्याजबद्दल दरमहा पाच रुपये प्रमाणें रक्कम द्यावी. जर आपण ह्या प्रमाणे नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आंत न कराल तर ही फारकत आहे असे समजावे. मग आपला माझ्या मुलीवर कोणत्याही प्रकारें हक्क राहणार नाहीं कळावें ता. २-२-१५

सही.

सुरजु वल्लद पंढोही जात हजाम
निशाणी आंगठा

नो. नं. १८

## नोटीस

रा. नथु वल्लद दवलत पाटील रा. पान्हेरे ता० मलकापूर यांसः—

हरकचंद गुलाबचंद दु. तेल्हारा यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आह्मास ता० १९-४-१२ ई. रोजी सालबंदी गाहाणखत लिहून दिलें असून त्यांत दोन किस्ती टळल्यास सालीम किस्तीचे रुपये एकंदर देईन असे तुह्मी लिहून दिलें आहे त्या प्रमाणें मागील वर्षाची सालबंदी तुह्मी दिली नसून यंदाही अद्याप वसूल दिला नाहीं. सालबंदीचा करार पूर्ण झाला आहे दस्तऐवजाचे कराराप्रमाणे सालीम रक्कम तुमचे कडेस येणे झाली आहे. तरी करारा प्रमाणे सालीम रक्कम व्याजासह नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत चुकती करावी तसें न केल्यास आह्मांस रीतीं प्रमाणे व्यवस्था करणे भाग पडेल मग खर्चाचा बोजा विनाकारण तुमचेवर पडेल या करितां तुह्मास सुचविले आहे कळावे ता० २-२-१५ द. नथु आपा

सही.

हरकचंद गुलाबचंद तेल्हारा तर्फ नथुआपा

नो. नं. १९

## म्युनिसिपालिट्या व लोकोत्साह.

आमच्या लोकांमध्यें सार्वजनिक कामें करण्याची खरी हौस व कळकळ नाहीं असें वारंवार ह्मणण्यांत येते; पण याचीं कारणें काय व त्या संबंधीं प्रतिकार कसा केला पाहिजे याकडे व्यक्तींचें जितकें लक्ष गेलें पाहिजे तितकें गेलेलें आहे असें दिसत नाहीं. राष्ट्राची उन्नति जर राष्ट्रातील घटकावयवांच्या सुशीलावर अवलंबून असेल तर आमच्यामध्यें तशा प्रकारचें राष्ट्रीय शील आलें आहे कीं नाहीं, या संबंधीं विचार करणें जरूर आहे. सांप्रत युरोपखंडांत चालू असलेल्या महायुद्धांत हीच गोष्ट निदर्शनाला येते कीं, ज्या प्रमाणें रणांगणांत चमकणारे शौर्यादि लष्करी गुण नागरिकांच्या अंगांत वसत असले पाहिजेत, त्याचप्रमाणें किंबहुना ज्यास्त प्रमाणानें, निष्कपटीपणा, स्वार्थत्याग, परस्पर प्रेम व देशाभिमान हे राष्ट्रीय गुण ही त्यांचेठायीं असले पाहिजेत. या लढाई मध्यें केवळ लष्करी लोकच लढून राहिले आहेत असे नाहीं, तर राष्ट्रांतील आबाल वृद्ध, स्त्री पुरुष धंदेवाले कसबी, नानाशास्त्रपटु असे अनेक पेशाचे व तऱ्हेचे लोक हेही आपल्या कर्तृत्वाप्रमाणें नेट धरित असून लढाऊ फौजेची हिंमत कायम राहील, अशा तऱ्हेनें, त्यास प्रोत्साहन व मदत देत आहेत. आराम, चैनबाजी, डौल फुकट शोक वगैरे कुगुणास पार फाटा मिळून स्वार्थत्याग व राष्ट्रसेवा, या गुणाची चहासुरू आहे. नाटकी व हौशी लोकही रणांगणांवर जाऊन सैनिकांचें मनोरंजन होऊन त्यांचा उत्साह कायम रहावा, अशी खटपट करित आहेत. बेल्जमची स्थिती पहा. शत्रु हद्दीवर चाल करून आला व गांवातील संरक्षक लष्कर आपला टिकाव लागणार नाहीं ह्मणून निरुपायानें गांव अरक्षित स्थितींत सोडून गेलें तरीही ग्रामस्थ लोक शत्रूंशीं धैर्यानें भिडतात व गांवातील (बर्गो मास्टर्स) किंवा म्युनिसीपालिट्याचे सभासद आलेल्या शत्रू,संकटाशीं झुंजणे, त्या पासून होईल ती पीडा कमी करणे ह्या संबंधीं सर्व जबाबदारी आपले माथीं आहे असे मनांत वागवून शत्रूंच्या सेनानायकाशीं तह करून त्यांच्या अटी पाळण्याची जोखीम आपल्या अंगावर घेतात, व अशा कार्य प्रसंगीं जीव जाण्याचा वेळ आला असता अतिशय मनोधैर्य दाखवून तोही गेला तरी चालेल पण शत्रूस पाठ दाखविणार नाहीं अशी हिंमत धरतात व स्वबळानुसार आपल्यानगराचे सुख संरक्षण आपले हातून थोडे बहुत तरी झालें अशा समजुतीनें सुजन मानसात उत्पन्न होणाऱ्या आनंदाला पावतात. पण आमचे इकडे पहावे तर सर्वच कांहीं विपरीत दिसतें. व्यक्ति व समाज या मधील बंधनें, अजीबात लयाला पावलेलीं दिसतात. अशास्थितींत राष्ट्रीय गुण आमचे मध्यें दिसून पडत नाहींत यांत काय आश्चर्य? जो तो आपले पोळीवर तूप ओढण्यांत चूर. बेपारी लोकांमध्यें संघ [combination] शक्तीनं काम करण्याची संवय नाहीं. रोग, दारिद्र्य, धर्मभोळेपणा वगैरे तऱ्हेतऱ्हेंच्या पीडापासून आपण मुक्त झाले पाहिजे अशा संबंधीं एकजुटीनें कोठें विचार होत नाहींत. पर दुःखाने दुःखित होऊन त्यांची स्थिती सुधरावी, लोकांस ज्ञानदीपानें चांगला मार्ग दाखवावा वगैरे परोपकारी वासना आमचे कित्येक ग्रामपुढाऱ्याच्या मनोराज्यांत उदय पावत नाहींत. इतकेंच नाहींतर आपली स्वतःचा बडेजाव व आपली छोटीं मोठीं कारस्थानें यांची सिद्धी कशी होईल या विचारामध्यें त्यांच्ये आयुष्यांतील उत्तम वर्षें निघून जातात. एवंच स्वार्थ प्रीती मनामध्यें उत्पन्नझाली असतां आपल्या बरोबरीच्या बांधवांविषयीं अनादर हेटाळणी वगैरे त्यानीं करावी व त्यांचा सहवास त्यास नाना तऱ्हेंनें असह्य वाटावा व इतरांनीं आपली बरोबरी करू नये अशी हाव त्यांनीं धरावी, यांत आश्चर्य तें काय? आमचे देशांत म्युनिसिपालिटीमध्यें जितकी खुर्ची दिसते तितकी मेंबर झाल्यावर जबाबदारीनें, व प्रतिज्ञे प्रमाणें लोकसेवा करण्याची तयारी दिसत नाहीं. फार तर काय, म्युनिसिपालिटीची स्थिती सुधरावी. जरठ ह्मातारी प्रमाणेंच तिनें शनैः पंथा न चालता तेजस्वी घोडे प्रमाणें उमेदीच्या भरात चालावे, अशा हेतूनें जर कोणी उमेदवार लोकसेवा करण्यास पुढें आले, तर त्यांच्या शंकेची नाना तऱ्हेचे भ्रम उत्पन्न करण्यासही हे ग्रामपुढारी मागे पुढें पहात नाहींत. अशा स्थितींत त्या नवीन उमेदवार लोकांस व त्यांना निवडण्यास तयार होणाऱ्या मतदारास त्यानीं पाण्यात पहावे व वेळ आल्यास वड्याचें तेल वांग्यावर काढावें यांत नवल काय? खामगांववासी एका विनोदपटु लेखकानें. नमुनेदार म्युनिसिपल मेंबराचें आयुष्य चरित्र डोम कावळ्याचे सादृश्य दाखवून खुबीदार रीतीनें वर्णिलें आहे. तें वाचिलें असतां अशा व्यक्तींचे मनोध्येय कसें असतें हें सहज लक्षात येईल. आपल्या राजकर्त्यांनीं कृपावंत होऊन स्थानिक स्वराज्याचे हक्क आपणा प्रजाजनांस दिलेले आहेत. त्या हक्काची अमलबजावणी करण्यामध्यें, रयतेनें मुळींच वेळाची भीड धरतां उपयोगी नाहीं त्याच प्रमाणें हा छोटेखानी स्वराज्याचा शकट चालविण्याचें सामर्थ्य, एकाच व्यक्ती मध्यें न राहतां ते पुष्कळ व्यक्तींच्या ठिकाणीं वसले पाहिजे अशी खबरदारी त्यानीं घेतली पाहिजे. जर एखादा जुनाट म्युनिसिपल मेंबर ह्मणू लागेल कीं, आह्मी जुने वहिवाटीचे माहितगार अनुभवी लोक असून आह्मास तुह्मी पुनरपि न निवडता नवीन लोकांस निवडाल, तर त्यांचे हातून काम काय होणार आहे? व ऑफिसर लोकांवर या नवशिक्याची छाप तर बसणार नाहींच पण उलट म्युनिसिपालिटीस ते शोभादायक व हितकर होणार नाहींत, तर त्याला एवढेंच उत्तर पुरे आहे कीं दर तीन वर्षांनीं म्युनिसिपालिटीच्या मेंबराची निवडणूक होते ती कशा करितां? जर जुने लोकच कायम ठेवावयाचे आहेत तर मग पुन्हा निवडणूकच करू नये. शिवाय नवीन लोकास. शिक्षण व अनुभव तरी केव्हा व कसा यावा? जुने लोकांस जर म्युनिसिपालिटीच्या इमारतींत प्रवेश केल्यावरच अनुभव आलेला आहे तर नवे लोकांसही त्या परिस्थितींत गेल्याबरोबर त्या अनुभवाचा आस्वाद मिळेल व त्यांचे हातून लोकसेवा घडेल असें कां ह्मणतां येणार नाहीं? दुसरे असे कीं सर्वच आपण खाऊं नये व सर्वच आपण लेऊ नये; कांहीं थोडें दुसऱ्याकरितांही ठेवावें. समाजाची अथवा गांवाची नोकरी बजाविण्याचा हक्क सर्वांचा आहे. व हा हक्क एकट्यानेंच निरंतरचा पटकावला कीं तो त्या समाजाचा जुलमी सुलतानच बनला ह्मणून समजावें. समाजाला अशा सुलतानांच्या योगानें थोडे बहुत क्षणिक फायदे आले तरी ते फायदे त्यांजपासून मिळविण्या करितां लोकास आपल्या मतस्वातंत्र्यास नेहमीचे मुकावे लागते. तर अशावेळीं समाजामध्यें जे पुढारी आहेत त्यांनीं विचार केला पाहिजे कीं आपणच हुशार, शहाणे. व मानाई बनलों व बाकीच्यामध्यें, कार्यक्षमता व उत्साह राहिला नाहीं तर आपणास राज्य तरी कोणावर करावयाचें? जर सचेतन नागरिकांनें प्रमुखत्व संपादन करणें आहे, तर त्या नागरिकांचें चैतन्य कायम राहिलें पाहिजे ही काळजी त्यानीं ठेवूं नये काय? आमच्या बेपारी कंपन्या कशा बुडाल्या? पोकळ डौल, जुनी ऐट, नवीन लोक तयार न करण्याची संवय जुनें तेंच चांगलें हा हट्ट, आपले वशिल्याचे लोक कामगारींत ठेवण्याची तत्परता वगैरे नाना दुर्धर रोगांनीं या कपन्यांच्या चालकाची मतें ग्रस्त होऊन, स्वार्थत्यागातिशयानें व निष्कपटपणानें, काम करण्याचें व्रत त्यांना कधींच मानवलें नाहीं, तद्वत म्युनिसिपल मेंबरांना जर हे दोष जडले, व त्यांनीं एकेमकांची मोहबत ठेऊन कामें केलीं, व लोकमताची पर्वा न ठेवतां स्वप्रमाणें वर्तन केलें तर स्थानिक स्वराज्याचा लोप होण्यास अवकाश कितीसा लागणार? व एकदा अशा अहंमन्य मंडळाचा [body of dictators] अंमल कोणाच्याही समाजावर सुरू झाला ह्मणजे, त्याच्या गुलामगिरीस प्रारंभ झाला असें समजलें पाहिजे, अशा मन्वंतरांत लोक खरें मत देण्यास तयार राहणार नाहींत, एकमेकाविषयीं भरंवसा व आदर मनांत वागवणार नाहींत व आपआपलें घोडें पुढें ढकलून अंध परंपरेनें आपला कालातिक्रम करतील, अशी समाजाची स्थिति फार शोचनीय होय व ही शोचनिय स्थिति नष्ट करण्याकडे व सर्व समाजामध्यें जीव उत्पन्न होऊन त्याचें सर्वांगस्वातंत्र्य त्यास प्राप्त करून देण्याकडे प्रत्येक सूज्ञ मनुष्यानें तन मन धन अर्पण करणें फार जरूर आहे. शिवाय म्युनिसिपालिट्या सारख्या संस्थामध्यें एकाच मेंबराचें अधिष्ठान फार काळ पर्यंत असू नये हें इष्ट आहे हें खालील उदाहरणानें स्पष्ट होईल.

एका माजी मेंबराचे घराचे आसपास दोन म्युनिसिपल कंदील होते. त्यापैकीं एक कंदील जरा दूर लावावा असा विचार मनांत येऊन ता कंदील काढण्याकरितां येथील स्थानिक स्वराज्याच्या सेक्रेटरीनीं कांहीं माणसें पाठविलीं. त्या माणसांस हे माजी मेंबर ह्मणू लागले कीं, हा कंदील काढतां येत नाहीं. कां कीं, या जागेवर हा कंदील बारा वर्षांपेक्षां ज्यास्त काळ पर्यंत आहे. तेव्हां तो कंदील काढण्याचें काम

बंद पडून, त्या मुदतीच्या हरकतीचा विचार होण्यांत कांहीं काळ लोटला; व नंतर कंदील तेथून काढण्याचा आपला हक्क कायम आहे. असें भवती न भवती होऊन ठरल्यावर तो कंदील तेथून हलवून योग्य ठिकाणीं स्थापित करण्यांत आला. जर यःकश्चित कंदिला संबंधीं वहिवाटीचा हक्क दाखविण्याचे धाडस करण्यास लोक मागें पुढें पाहत नाहींत. तर खुद्द म्युनिसिपालिटीची जायदाद व त्या पासून होणारे फायदे या संबंधीचे वहिवाटीचे हक्क आपणास प्राप्त झाले आहेत. असें कांहीं लोक गैरसमजुतीनें म्हणण्याचा संभव आहे. व असें झाल्यास सार्वजनिक हितास धोका लागणे फारसे कठिण नाहीं. कांहीं फकीरही वहिवाटीनें भिक्षा घेण्याचा हक्क दाखवितात हें पुष्कळांस माहित आहे. एवंच स्वार्थसाधु लोकांच्या समजुतीची व वागण्याची मजल कोठवर जाईल. हें सांगतां येत नाहीं, अशा अनेक कारणामुळें लोकांनीं मेंबर लोकांमध्यें फेरबदल करणें जरूर आहे. आमचे येथें नुकतेच सी. पी. लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे इलेक्शन झालें. त्या वेळेस मतदारास स्वतंत्रपणें मतें देतां यावीं, या संबंधानें सरकारानें शक्य तेवढी तजवीज केली होती व मतें देतांना कोणाचें अयोग्य वजन मतदारावर पडूं नये अशी खबरदारीहि घेतली होती व त्याचप्रमाणें अमक्यास मत द्यावें व अमक्यास देऊं नये. अशा तऱ्हेचे कांहींच न बोलतां सौजन्यदर्शक तटस्थपणा सरकारनें धरला होता. त्या वेळीं एक प्रकारची लोक चळवळ आपणामध्यें दिसून पडली. व त्या वेळेपासून स्वतंत्रपणें मत देण्याची पात्रता, व तयारी व संधी या तिन्ही गोष्टींचे महत्व लोकांच्या चांगलेंच निदर्शनास आलें. हें महत्व लक्षांत ठेऊन, त्या मोठ्या चळवळीच्या आधारभूत ज्या लहान म्युनिसिपालीटीच्या वगैरे चळवळी, त्या संबंधीं होणाऱ्या निवडणुकीचे वेळीं लोकांनीं आपआपलीं मतें स्वतंत्रपणें व जबाबदारीनें तयार केलीं पाहिजेत. आकोला येथें रेटपेअर्स असोसियेशन नांवाची संस्था एकदां कांहीं काळपर्यंत होती, व तिला येथील म्युनिसिपालिटीचे हयगयी संबंधीं, मागील डेप्युटी कमिशनर मे. मेजर फ्रीडन साहेब यांजकडे तक्रार करण्याचा प्रसंग पडला होता त्या वेळेस त्या तक्रारीस साहेब मजकुरानीं छोटेखानी पण शहाणपणाचें असें उत्तर दिलें होतें; तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ते म्हणाले म्युनिसिपालिटीच्या मेंबरानीं चांगलें काम करावें अशी लोकांची इच्छा असल्यास त्यांनीं चांगले उमेदवार निवडण्याची काळजी घ्यावी या उत्तरांत सत्य कसें ओतप्रोत भरलेलें आहे या उपदेशाचा लोकांनीं फायदा करून घेऊन चांगले मेंबर निवडणे हा महत्वाची कर्तबगारी हुशारीनें बजावावा. हिंदुस्थानांत जरी लष्करी युद्ध चालूं नाहीं, तरी धार्मिक, औद्योगिक व सामाजिक परिस्थिती जशी पाहिजे तशी नसल्यानें त्या अनिष्ट परिस्थितीशीं आपला सर्वांचा झगडा चालू आहे व त्यासाठीं नेटानें युक्तीनें व स्वार्थत्यागानें, झगडणारे वीर पाहिजे आहेत. ही गोष्ट लक्षांत घेऊन या माहिन्यांत आकोलकर तरी आपण असे महत्वाचे काम करण्यास पात्र आहोत हें जगास दाखविण्यास मागेंपुढें पाहणार नाहींत अशी उमेद आहे.

---

वऱ्हाडसमाचार

मिति माघ वद्य ९ शके १८३६

## सांप्रतच्या युद्धाचें खरें स्वरूप.

आमच्या देशांत अज्ञानामुळें लोक सांप्रतच्या युद्धाविषयीं मतलबी लोकांनीं उठविलेल्या हव्या तशा लोंड्या खऱ्या मानून वारंवार फसतात, किंवा अगदीं त्रोटक आणि संक्षिप्त अशा तारा वाचून त्याचा संबंध नीट न लावतां आल्यामुळें कल्पनाशक्तीस यथेच्छ संचार करू देऊन भलभलते तर्क व कुकल्पना करीत बसतात. अशा वेळीं लोकाचें अज्ञान घालविण्याचा व त्यांना वस्तुस्थितीचें खरें स्वरूप समजावून देण्याचा उत्तम व सोपा उपाय म्हटला म्हणजे ती स्थिति प्रत्यक्ष पाहून आलेल्या माहितगार माणसाकडून कळलेली हकीकत प्रसिद्ध करणें हा आहे आणि या दृष्टीनें ना. आगाखान यानीं मुंबईच्या क्रॉनिकल पत्राच्या संपादकास कळविलेली हकीकत फार महत्वाची आहेत. ना. आगाखान गेल्या आठवड्यांतच विलायतेहून परत आले. त्यानीं सांगितलें कीं जर्मनीनें यापूर्वी जें काय पाऊल पुढें टाकलें असेल तें असेल पण यापुढें एक हातभार सुद्धां त्याला पुढें सरकतां येणार नाहीं. प्यारिसवर चाल करण्याचें तर मुळींच भय उरलेलें नाहीं. फ्रान्समध्यें युद्धामुळें लोकांच्या व्यवहारांत कांहीं गडबड उडालेली दिसत नाहीं, त्या देशाच्या दक्षिण भागांत हिंडणाराला तर युद्ध चाललें आहे कीं नाहीं याचा गंध वार्तासुद्धां कळावयाची नाहीं. नाहीं म्हणायला येवढें मात्र आढळून येईल कीं गांवांतून वृद्ध माणसें व स्त्रिया आणि मुलें येवढींच राहत आहेत. तरुण माणसें कोणी गांवांत नाहींत. इंग्लंडचे समुद्रावरचें स्वामित्व अढळ आहे. जर्मनीनें इंग्लंडच्या किनाऱ्यावर केलेले हल्ले हे केवळ समुद्रांतल्या पाण्याच्या एकाद्या थेंबाप्रमाणें क्षुद्र आहेत. संयुक्त सैन्याला धान्य वगैरे सामुग्रीचा भरपूर पुरवठा होत आहे. जर्मनीला तटस्थ राष्ट्रांतून चोरून मारून होत असेल तेवढाच. इंग्लंड, व फ्रान्स व राशिया ही तीन राष्ट्रें सुरक्षित आहेत. बेल्जियम आणि फ्रान्सचा कांहीं भाग यांच्यांत मात्र आतां कांहीं शक्ति उरलेली नाहीं. इजिप्त विषयीं बोलतांना ना. आगाखान म्हणाले कीं तेथें घडलेली क्रांति फार इष्ट स्वरूपाची आहे. जसा हिंदुस्थान देश तसाच इजिप्त ही सुरक्षित व ब्रिटिशांशीं राजनिष्ठ आहे. या क्रांतीमुळें खलीफाच्या सत्तेचें काय होणार या प्रश्नाचें उत्तर सुनी पंथाच्या मुसलमानालाच देतां येईल व तो प्रश्न धार्मिक स्वरूपाचा असल्यामुळें ख्रिस्ती राष्ट्रांशीं त्याचा संबंध ही येत नाहीं.

---

## युद्धाचा वणवा-

सांप्रतच्या युरोपियन महायुद्धाचा वणवा युरोपखंडांतच पसरून राहिला नसून आशिया व आफ्रिका खंड हीं खंडें ही त्यानें व्यापिलीं आहेत. तथापि येवढ्यावरच हा थांबला तर भाग्य म्हणावयाचें! कारण कीं त्याच्या ज्वाळा अमेरिका खंडालाही स्पर्श करतील कीं काय अशी भीती वाटूं लागली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या बाजूला अमेरिकन लोकाची सहानुभूति आहे यांत शंका नाहीं. त्यांतल्या त्यांत ब्रिटिश राष्ट्र या युद्धांत पडलें आहे तें राजतृष्णेमुळें पडलें नसून न्याय व नीति यांच्या रक्षणासारख्या उच्च हेतूनें प्रेरित होऊन अर्थ व मनुष्य प्राण याचा धर्मकार्यार्थ बळी देण्यास तयार झालें आहे ही गोष्ट अमेरिकन लोक ओळखून आहेत, म्हणूनच जर्मनीनें तेथें ब्रिटिशराष्ट्राविरुद्ध कितीही कांगावा केला. तरी अमेरिकेंत त्याची डाळ शिजली नाहीं. तथापि अमेरिकन लोक कितीही सुधारलेले झाले तरी स्वार्थबुद्धीनें त्यांना सोडलें आहे असें नाहीं. तेव्हां ही त्याची स्वार्थबुद्धि सध्याच्या निकराच्या प्रसंगीं काहीं घोटाळा करते कीं काय तें पाहण्याकडे जगाचें डोळे लागणें स्वाभाविक आहे. अमेरिका युद्धासंबंधानें तटस्थ आहे ही गोष्ट खरी, पण सध्यां एक विलक्षण परिस्थिति उत्पन्न झाली आहे. अमेरिकेला आपल्या जवळचें तांबें किफायतीनें विकावयाचें आहे व जर्मनीला तोफा ओतण्याचे साठीं तांब्याची अत्यंत जरूरी असल्यामुळें तें सोन्याचे भावानें मिळालें तरी घेण्याचा जर्मनीचा निश्चय आहे. पण अमेरिकेतून ही प्राणघातक धातु जर्मनींत जात असलेली ब्रिटिश राष्ट्राच्यानें कशी पाहवेल? धातूच्या प्रचंड तोफा बनून त्या संयुक्त सैन्यावर गोळ्याचा संहार करूं लागतील' त्यापेक्षां आजच त्याला मधल्यामध्यें अडकावून ठेवणें हा श्रेयस्कर मार्ग आहे असें त्या राष्ट्राला वाटलें तर तें अगदीं रास्त व न्यायाचें आहे असें कोण म्हणणार नाहीं? तसें करण्यानें ब्रिटिश राष्ट्र आपल्या अधिकाराचा मर्यादातिक्रमही करीत आहे असें कोणाला म्हणतां येणार नाहीं. तसें झाल्यास व तांबें वाहून नेणारीं अमेरिकन जहाजें इंग्रजांनीं मधल्यामध्यें अडविल्यास अमेरिकेशीं भांडणाचा प्रसंग येणारच. पण अमेरिकन लोक शहाणे असतील तर मागचा इतिहास परंपरा पाहून असा प्रसंगच ते आणणार नाहींत कारण कीं जर्मनीला तांबें विकल्यापासून होणारा फायदा आज अमेरिकेच्या पदरांत ब्रिटिश राष्ट्रानें पडूं दिला नाहीं, तरी त्याबद्दल अमेरिकेला विषाद वाटण्याचें खरोखर कांहीं कारण नाहीं. चाळीस वर्षां पूर्वीं जेव्हां खुद्द अमेरिकेंत अंतर्गत युद्ध सुरू होतें तेव्हां ल्यांकेशायरनें पाठविलेला कापूस अमेरिकेनें असाच अडकावून ठेविला होता, पण ब्रिटिश राष्ट्र तेवढ्यावरून हमरी तुमरी वर आलें नाहीं. तेव्हां इंग्रज जहाजें अडकविण्याचा अमेरिकेला जेवढा हक्क होता तेवढाच आतां इंग्रजांना आहे, याचा अमेरिकेनें नीट शांतपणें विचार करावयास पाहिजे.

---

## वेळ बदलली पाहिजे.

यंदाचें साहित्यसंमेलन मुंबई येथें ईस्टरच्या सुटींत भरविण्याचें ठरलें होतें, पण त्याच वेळीं उमरावतीस सामाजिक परिषदेचें अधिवेशन करण्याचें अगोदर पासून ठरलेलें असल्यामुळें व सामाजिक परिषदेचें पुरस्कर्त्यांपैकीं बरेचसे साहित्यसेवक व साहित्यसंमेलनाचेही पुरस्कर्ते असल्यामुळें साहित्य संमेलनाची बैठक शिमग्याचे सुटींत भरवावी असा विचार ठरून त्याप्रमाणें जाहिर करण्यांत आलें. पण ही बदलून नवी नेमलेली वेळ मुंबई, पुण्याच्या लोकांना सोयीची असली तरी वऱ्हाड, नागपूर, इंदूर, ग्वालेर, वगैरे दूरदूरच्या प्रांतांतल्या साहित्यसेवकांना अतिशय गैरसोयीची असल्यामुळें व शिमग्याच्या दोन दिवसांच्या सुटींत इतका लांबचा प्रवास होणे अशक्य असल्यामुळें उन्हाळ्याच्या सुटींत म्हणजे मे मध्यें हें संमेलन भरविण्यात यावें अशी सूचना आमच्या प्रांतांतल्या बऱ्याचशा लोकांकडून आमचेकडे आली आहे, तिचा विचार साहित्यसंमेलनाचे चालक करतील अशी आम्ही आशा करतों.

उन्हाळ्यांत आमच्या प्रमाणें इतर पुष्कळ प्रांतांतल्या न्यायखातें व शिक्षणखातें या दोन खात्यांशीं संबंध असलेल्या लोकाना व कॉलेजांतील विद्यार्थ्यांना मोठी सुटी असते, व ते उन्हाळ्याचे दिवस पुण्यांत घालवितात. मुंबईंत उष्मा फार असतो, तरी साहित्यप्रेम त्यांना दोन दिवसाकरितां तशा उकाड्यांत ही मुंबईस खास ओढून नेईल, आणि अशा रीतीनें महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र, वऱ्हाड, मध्यप्रांत, मध्यहिंदुस्थान वगैरे मराठी भाषा बोलणाऱ्या बहुतेक प्रांतांतल्या लोकाना मुंबईचें साहित्य संमेलन पाहण्याचा दुर्मिळ योग सहज साधतां येईल. करितां इतक्या लोकाच्या सोयीसाठीं मुंबईच्या संमेलन कमिटीस संमेलनाची वेळ आणखी एकदा बदलावी लागली तरी त्यांनीं कुत्सित टीकेस भीक न घालतां लोकांची सोय प्रथम पाहावी व तसें लौकर जाहिर करावें अशी आमची तीस सूचना आहे.

---

## कान टोंचणारा सोनार.

जुन्या इमारतीचा पाया भक्कम असला तरी तो जुना येवढ्याच सबबीवर तो पाडून नवा पण कच्चा पाया घालून त्यावर टोलेजंगी इमारत उभारून पाहणें हा व्यवहार ज्ञानाच्या दृष्टीनें शुद्ध वेडेपणा आहे. पण आश्चर्य आहे कीं हा वेडेपणा राजकीय गोष्टींत मुत्सद्दी म्हणविणारे, सामाजिक बाबतींत सुधारक या थोर पदवीचा अभिलाष करून पाहणारे व साहित्य आणि कला यांची प्रगति

Regd NO. N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला——सोमवार तारीख १५ माहे फेब्रुवारी सन १९१५ ई० [ अंक ७

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवी ट हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीच दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या रूटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवता येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक अकोला ९।९।०९ } J. G. Ridland. एजंट

नो. न २

**केशराचें फूल मुफ्त**

पवित्र केशर ।।।=शुद्ध शिलाजीत ।। असली कस्तूरी २४ मशीरातिनती ३ खालिस हींग ८० तो० सुंदर कामदार शाल २ व
$2\frac{1}{2}+1\frac{1}{2}$ गज ६ से १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२

नो० न० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. कि रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसात नाहींसा होतो. किं. ८४

हीं आपलें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० न० ९

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडा आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठ मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिच्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ० खर्चासह तीन रुपये. यात **श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य** याचे उपनिषदावरील **भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास '**वैशेषिक दर्शन**' बक्षीस-

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें——

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ८० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधें प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात. नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो० न० १२

वऱ्हाडसमाचार

मिति फाल्गुन शुद्ध १ शके १८३६

## देवस्थानांची व्यवस्था.

देवस्थानें व धर्मादाय कृत्यें यांच्या व्ययनिर्वाहार्थ भाविक व श्रद्धाळु लोकांनीं अर्पण केलेल्या संपत्तीची मोजदाद केली तर हिंदुस्थानांत तरी ती एखाद्या मोठ्या संस्थानिकाच्या राज्याच्या उत्पन्नाहून खास ज्यास्त भरेल येवढी ही संपत्ति केवळ पुजारी, बडवे, सेवाइत वगैरे लोकांच्या हातीं पडून ती सत्कार्याप्रीत्यर्थ अर्पण करणाऱ्या उदार दात्यांच्या इच्छेप्रमाणें देवकार्यास किंवा धर्मकार्यास न लागतां मतलबी लोकांना गिळंकृत करण्यास सापडावी याहून अधिक दुर्दैवाची गोष्ट दुसरी कोणती असणार? पण असा प्रकार सध्या पुष्कळशा देवस्थानांत व धर्मकृत्यांच्या फंडांविषयीं होत आहे ही गोष्ट खरी आहे, व या व्यवस्थेसंबंधानें सरकार मार्फत कांहीं तरी कायदा होणें अवश्य आहे अशा विषयीं सुशिक्षित लोकांत—मग तो हिंदु असो, ख्रिस्ती असो, जैन असो, कीं पारशी असो, सर्व धर्मांत सारखें एकमत आहे. प्राचीन काळीं देवस्थानासाठीं किंवा धर्मकृत्यांसाठीं आपल्या संपत्तीचा अंश अर्पण करण्याची रीत पडली ती मठ किंवा मंदिर यांची व्यवस्था पाहणाऱ्या पंचाचे मार्फत आपण अर्पण केलेल्या संपत्तीचा योग्य विनियोग होऊन आपणास पुण्यलाभ घडेल या श्रद्धेमुळें पडली यांत शंका नाहीं. मनुष्य मरेल, त्याच्या मागें त्याच्या वारदाराची वाताहात कोणत्या प्रकारें लागेल याचा नेम नाहीं, पण देवस्थान ही संस्था अक्षय चालणारी नसली तरी व्यक्तिमात्राच्या जीवितापेक्षां तिचें जीवित खास अधिक आहे व या संस्थेच्या स्वाधिन आपली संपत्ति केल्यास तिची पै न पै सत्कारणीं लागेल ही श्रद्धा या देणग्यांच्या मुळाशीं असे, व याच श्रद्धेवर आज आमच्यांतली अत्यंत प्राचीन देवस्थानें कित्येक शतकें चालत आलीं आहेत. युरोपखंडातही आक्सफोर्ड व केंब्रिजसारखीं प्राचीन विद्यापीठें याच प्रकारच्या देणग्यावर निघालीं व अद्याप विद्यादानाचें सत्कार्य करीत आहेत. आमच्या इकडे सुद्धां नालंदा, विक्रमशिला वगैरे बौद्धकालीन युनिव्हर्सिट्या अशाच प्रकारच्या देणग्यांवर लक्षावधि विद्यार्थ्यांना विद्यादान करीत. या संस्था कालगतीमुळें बदललेल्या परिस्थितीच्या तडाख्यांत सांपडून नष्ट झाल्या. पण अशा देणग्यांचा प्रवाह खंड न पडतां चालू राहिल्यामुळें त्यांच्या जागीं विद्यापीठें जरी नाहींत तरी अन्नछत्रें, धर्मशाळा, वगैरे दुसऱ्या लोकोपयोगी संस्था आल्या व अशा देणग्यांचा अपहार करण्यासारखें घोर पाप नाहीं अशा जुन्या भाविक समजुतीचा अंमल व्यवस्थापकांच्या व समाजाच्या मनावर दृढ होता तोंपर्यंत आह्मी सध्यां मागतों तशा प्रकारच्या कायद्याची अवश्यकताही शेपंनास वर्षांपूर्वी कोणास येवढी न भासतां त्याची व्यवस्था सुरळीतपणें होत आली. पण अलीकडे या श्रद्धेचा लोकांच्या मनावरचा भार हलका होऊं लागला, तशी मनुष्याच्या मनांतल्या पापी लोभवृत्तीनें वर मान करून देणग्याचा अपहार करण्याचे निरनिराळे प्रकार अस्तित्वात येऊं लागले व अखेर सुशिक्षित लोकांच्यानें तरी असले प्रकार डोळ्यादेखत घडलेले पहावेतना ह्मणून त्यांनीं या बाबतींत सरकारपाशीं कायदा मागितला. देवस्थानच्या देणग्याची सुव्यवस्था ठेवण्यासाठीं कायदा करणें ह्मणजे कांहीं लोकांच्या धर्मसमजुतींना धक्का लावणें किंवा त्यात हात घालणें होत नाहीं. पण सुशिक्षित लोक आपल्या पोटावर पाय देण्याची तजवीज करूं पाहत आहेत असा सुगावा लागतांच देवोत्तर संपत्तीवर हात मारणाऱ्या व यथेच्छ चरून गलेलठ्ठ बनूं पाहणाऱ्या मतलबी लोकांनीं धर्म बुडाला व तो बुडविण्यास कारण हें इंग्रजी शिकलेले नास्तिक लोक अशी चोरांची उलटी बोंब सुरू केली. व येवढा मोठा सावळागोंधळ घडघडीत दिसत असतां सरकारी अधिकारी तो खुशाल डोळ्यांदेखत चालू देत आले याला कांहीं अंशीं— किंबहुना सर्वांशीं— ही ओरड कारण असली पाहिजे. पण दयाळु आणि न्यायप्रिय अशा ब्रिटिश राज्याच्या छत्राखालीं असला गोंधळ धर्मस्थानांवाखालीं झाला तरी किती दिवस चालू राहणार? सीलोनच्या सरकारनें या बाबीकडे प्रथम लक्ष देऊन मठ व देवस्थानें यांच्या पंचानीं व व्यवस्थापकांनीं आपल्या ताब्यांतल्या सार्वजनिक पैशाचा हिशोब सरकारास दिला पाहिजे असा कायदा करून हिशोब घेण्यास सुरुवात

केली. त्या सरकारचें उदाहरण पाहून मद्रास इलाख्यांतल्या डिस्ट्रिक्ट बोर्डांनीं आपल्या हद्दींतल्या देवस्थानासंबंधानें अशीच व्यवस्था करून घेतली. हळूं हळूं त्याचे सुपरिणाम दिसल्यावर इतरही कित्येक अधिकाऱ्यांनीं आपापल्या पुरत्या अशा कांहीं तजविजी केल्या पण साऱ्या हिंदुस्थानास लागू पडेल अशी एक पद्धति घालून देणारा सगळ्या हिंदुस्थानाला सारखा असा एखादा कायदा पाहिजे असें सुशिक्षित लोकांना गेल्या दहा वीस वर्षांतच वाटूं लागलें, व ही जाणीव खरी आहे अशी सरकारची खात्री होऊन सरकार असा कायदा करण्याच्या विचारांत आहे असा मनोदय सरकारनें आतां नुकताच जाहिर केला आहे. हा सरकारचा विचार स्तुत्य आहे याविषयीं कोणास ही शंका येणार नाहीं अशी आमची पूर्ण खात्री आहे. हिंदु व मुसलमान सुशिक्षित पत्रकर्त्यांचें— अर्थात् लोकमताचें— सरकारच्या या कृत्यास पूर्ण पाठबळ आहे. पारशी लोकांचे धर्मादायफंड मोठाले आहेत व पंचाच्या मार्फतीनें त्यांची उत्तम व्यवस्था चालली आहे तरी सरकारनें योजिलेला कायदा उत्तम आहे असें उद्गार पारशी पत्रकर्त्यांनीं ही काढले आहेत. सारांश, सरकारच्या योजनेला कोणाकडून ही विरोध येण्याचा संभव नाहीं. लोकांनींच स्वतः हा कायदा मागितला आहे व अशा कायद्याची प्रस्तुतच्या परिस्थितींत अत्यंत अवश्यकता ही कोर्टाच्या फायलींतून प्रस्थापित झालेली आहे. तेव्हां होऊं घातलेल्या या कायद्याचा मार्ग निष्कंटक आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तेव्हां निष्कारण कालावधि न लागतां हा कायदा लवकर पास होऊन जारी होईल अशी आह्मी आशा करतों.

## विवाहपद्धती.

येथवर विवाहपद्धतींचें जें निरीक्षण केलें त्यावरून हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे कीं आर्यांनी ऋग्वेद कालाच्याही पूर्वींच स्त्रिया आणि पुरुष एकजीव करण्याची शक्य ती योजना केली. प्रथमतः पुरुषास एकपत्नि-व्रत आचरण्यास लावण्याचा यत्न केला मग स्त्रियांची एकाच वेळीं अनेक पतिकरण्याची मोकळीक काढून घेतली. इतक्यानें ही स्त्रीपुरुषांचा एकजीव होईना ह्मणून हळू हळू नियोगही बंद केला. तरी हो इष्ट कार्य साधेना तेव्हां स्त्रिया व पुरुषांस एकदा जो संबंध जडला त्या पासूनच सुखोत्पति होईल तर करून ध्यावी व प्राप्त झालेल्या साधनाचा त्यांतील कोणा एकानें अव्हेर करू नये ह्मणून विधवा पुनरुद्वाह ही बंद केला. या सर्व कृत्रीम योजनांस धार्मिक रूप देऊन प्रबल जातीस देव, ब्राह्मण, आणि अग्नि या समोर शपथा आणा घेऊन एकाच स्त्रीशीं अव्यभिचरित जोडण्याचा प्रयत्न केला. इतर सर्व धर्मांत विवाहांस करारानिर्मित नात्याचें किंवा प्रजोत्पादनार्थ आणि संततीस कायदेशीर ठरविण्यासाठीं एकत्र होणाऱ्या जोडप्याचें रूप दिलें आहे. हिंदुधर्मांत धर्मार्थ कामांसाठीं, समान धर्माचरण करण्यासाठीं साहचर्य नियमानें इहलोकीं व परलोकीं एकत्र जुडण्याचें नातें विवाह पद्धतींत ग्रथित केलेलें आहे.

ही पद्धति शास्त्रकारांनीं ऋग्वेदकालाच्या आरंभापासून स्थापीत स्थापीत भारत कालापर्यंत स्थापिली. हिनें संततीच्या जोपासनेची जबाबदारी स्त्रीवरून पुरुषाकडे आली. इनें पुत्रास नरका पासून रक्षण करणारा, पित्यास मोक्ष देणारा निदान स्वर्ग लोक तरी प्राप्त करून देणारा बनविलें. विवाहपद्धति मनुष्य जातीची उत्क्रान्ति दाखविते. तीवरून एकपत्नीव्रताचें व पातिव्रत्याचें धार्मिक सामाजीक आणि व्यवहारीक दृष्ट्या महत्कार्य घडून राहिलें आहे जर पती पासून धर्म कार्य घडतें, जर पतीस देवस्थान द्यावें अशा आज्ञा आहेत तर स्त्रियांनीं परपुरुषांस गुरु केलें असतां विवाहपद्धति ह्मणजे शास्त्रकार जें एकजीवत्व घडवून आणण्याचा यत्न करतात तेंच एक जीवत्व नाहींसें करणारा हा गुरुशिष्य संबंध नाहीं काय?

### एवमपि अनवस्था स्याद्यामूल क्षाति कारिणी

एक गुरु अयोग्य ह्मणून दुसरा, तो अयोग्य ह्मणून तिसरा याप्रमाणें गुरुमालिका भटकावयास लावणारा आणि त्या योगानें मूल उद्देश निदान पतिपत्नीस तरी एक जीव करण्याचा जो वेदप्रणीत आहे तोच मूलहेतु खोडून टाकणारा उर्फ उध्वस्तकरणारा हा स्त्रियांस मंत्रोपदेश देणाऱ्या शहाण्या आधुनिक गुरूंचा उपक्रम आहे. यानें आपण विवाहपद्धतीचें वर्म न समजतां उच्छेदन मात्र करूं. स्त्रियांस इतर बाबींत स्वातंत्र्य द्यावयाचें नाहीं. ग्रंथ वाचन द्यावयाचे नाहींत. चारचौघांत अगर शेजार पाजारणींत देखील मिसळू द्यायचें नाहीं. मत्सराग्नि इतका प्रबल कीं एखादें स्त्रीस प्रत्यक्ष भावाबरोबर बोलतांना पाहिल्यास उदारबुद्धीचे लोक कर्णकटु अनुमानें खुशाल काढतात. व जनश्रद्धा इतकी तीव्र असते कीं नुसत्या अनुमानांस सत्य मानून त्यास सिद्धांतरूप देतात. अशा स्थितींत वेदांतबोधामृतासाठीं आधुनिक गुरूंस मात्र आपल्या स्त्रियां बरोबर यथेच्छ एकांत करू देणारे पति निर्मू लागले आहेत.

या एकांतानें स्त्रियांस साहजीकच परमार्थ आवडू लागला आहे. ऐहीक पती त्याज्य वाटू लागले आहेत. ही स्थिती उन्नतीची का अवनतीची हें आह्मास तरी समजत नाहीं.

येथवर संतवचनें झालीं. विवाहपद्धतीवरून निघणारीं अनुमानें झालीं. समाजस्थीतिनिरूपणही झालें. तिन्ही हेंच सांगतात कीं स्त्रियांस शिष्यत्व, विभूति फासणें अनुचित, अयुक्त, पूर्वमार्ग विरुद्ध, आणि निंद्य आहे.

### शास्त्राज्ञा काय आहेत

हें पाहूं. हें कबूल केलें पाहिजे कीं स्त्रियांस मंत्र देऊ नये असा स्पष्ट आधार कोठेंच नाहीं. उलट स्त्रियांस शिष्यत्व द्यावें असा ही पण आधार कोठें मिळत नाहीं. ऐतिहासीक पद्धतीचा द्वेष करणाऱ्या सर्व वेदांती आधुनिक गुरूंची पूर्ण भिस्त चुडालिकाख्यानावर. त्या आख्यानाचा आधार घेऊन हे गुरु छातीवर हात ठेवून शिष्यिणींस बरोबर घेऊन एकयानांत हिंडवून वादविवादास नेतात. चुडालिकाख्यानाचें मुख्य वर्म हें आहे कीं चुडालिकेचा उद्धार होण्याइतकी तिची योग्यता झाली तरी पतीच्या उद्धाराशिवाय तिचा उद्धार होईना. तिच्या द्वारें पतीचा उद्धार झाल्यावर तिचा उद्धार झाला. हें आख्यान हेंच सांगतें कीं स्त्रियांस स्वतंत्र मोक्षमार्ग नाहीं. पतीचा उद्धार होत नसेल तर स्त्रियांचा उद्धार होऊ शकत नाहीं. लिंग पुराणांत कलावती व बहुला याचीं आख्यानें देखील हेंच प्रतिपादन करतात. कलावतीस मंत्रोपदेश बालपणींच झाला होता. विवाहानंतर पति तिच्या बरोबरीचा अधिकारी झाला. नंतर उभयतां आनंदानें नांदू लागलीं.

वर, जी विवाहपद्धतीची त्रोटक मीमांसा केली तीवरून सहज कळून येईल कीं शास्त्रकारांचा प्रयत्न स्त्री पुरुषांचें पुर्णैक्य करण्याचा होता. विभक्त कुटुंबांत संततीत ह्मणजे पुत्र पौत्र आणि प्रपौत्र नसेल तर स्त्रीस पतीचे श्राद्ध करण्याचा अधिकार नारद वशिष्टादि शास्त्रकारांनीं दिलेला आहे. मनु स्त्रियांस पुरुषांचें अर्धांग मानतो. स्त्रियांस पतीचे अर्धपुण्य मिळतें. स्त्रियांस वेदाध्ययनाचा अधिकार नाहीं. त्यामुळें त्यांस ओंकार उच्चारतां येत नाहीं. उच्चार त्यास त्यांस फळ नाहीं उलटा दोष मात्र आहे. त्यांस दरमहिना विटाळांत रहावें लागतें. शिवाय प्रसूति काळीं निदान चाळीस दिवस विटाळांत रहावें लागतें. संन्याशास ज्याप्रमाणें कांहीं कर्माचा निषेध असतो त्याच प्रमाणें विधवा स्थितींतही त्यांना कांहीं कर्माचा निषेध आहे. सवाष्णींचीं व गृहस्थाश्रमी पुरुषांचीं कर्में निराळीं तशींच वैधव्यदग्ध स्त्रिया आणि चतुर्थाश्रमी पुरुषांचीं कर्में पृथग्विहित आहेत. स्त्रियास गुरूपदेश दिल्यानें त्यांचा पतीवरील आलेब कमी होतो. सर्व शास्त्राज्ञा मानावयाच्या असतील तरच स्त्रियांस उपदेश करूं नये अशी स्पष्ट आज्ञा नसल्यामुळें अभाव नियमावरून नियमाचें अनुमान काढतां येईल. गुरु करणें हें स्वातंत्र्योपभोगार्थी आहे पण नस्त्री स्वातंत्र्य मर्हति. अशी आज्ञा आहे. मग स्त्रिया गुरू मात्र कसा निवडू शकतात! बरें धर्मार्थ कामांत ज्यांचें नाशिवंत पतीच्या आधीन झालें आहे तें त्यांस अन्य पुरुषास कसें अर्पण करितां येईल. गुरुस तर सेवेची चटक असते एकदां दुसऱ्यास अर्पण झालेल्या स्त्रियांची सेवा गुरु कशी घेऊ शकतात? यास कोणता आधार? बरें यद्यपि युद्धं लोक विरुद्धमना करणीयम् नाचरणीयम् ह्या आचार्योक्तीस बोळ फिरऊन यथेच्छ एकांत करावयाचा काय? ज्या पुरुषानें एकवार कन्यादान घेतल असेल त्यास पुनः कितीही विवाह झाले तरी प्रथम स्त्री निवर्तली असतांही कन्यादान घेतां येत नाहीं. मग गुरु तरी विवाहित स्त्रीचा कसा स्वीकार करतात? सर्वच मूर्खपणा आणि बष्कळपणा. असो, पतिरेको गुरुः स्त्रीणाम वर्णानाम ब्राह्मणोगुरुः इत्यादि आज्ञांचा विवाह पद्धतीच्या उत्क्रांति इतिहासाकडे ह्मणजे पांचव्या वेदाकडे लक्ष देऊन अर्थ केला पाहीजे.

अपूर्ण

## शाळांच्या जागा

विद्यार्थ्यांची संख्या झपाट्यानें वाढणें हें जर प्रगतीचें एक लक्षण असतें तर 'प्रगति' हा शब्द मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील विद्याखात्याच्या गेल्या सालाबदलच्या रिपोर्टाविषयीं लिहितांना ठळक अक्षरांनीं छापला पाहिजे. कारण, प्राथमिक, दुय्यम, व उच्च या तिन्ही प्रकारच्या शिक्षणाचा लाभ घेऊं इच्छिणाऱ्या मुलांची व मुलींची संख्या गेल्या सालीं वाढत्या प्रमाणांत होती. इतकी कीं आता शाळांसाठीं नव्या इमारती बांधतांना सध्या पेक्षां विद्यार्थ्यांची संख्या अधिक होणार हें लक्षांत घेऊनच इमारतींची रचना करावी अशी सूचना सरकारला करून ठेवावी लागली आहे. शाळांच्या इमारती विषयीं लिहितांना आह्मांला एक सूचना करणें अगत्याचें दिसतें. ती ही कीं शाळांच्या इमारती गांवापासून दूर बांधण्याकडे जी प्रवृत्ति दिसत आहे ती लोकांच्या सोयी व आरोग्य यांच्या दृष्टीनें आह्मांस हानिकारक वाटते. लहान मुलांचा बहुतेक काळ शाळे पेक्षां घरींच— अर्थात् दाटवस्तींतच जातो. तेव्हां शाळेंतले चार तास तरी उघड्या स्वच्छ हवेंत जावे अशा उदात्त इच्छेनें प्रेरित होऊनच अधिकारी शाळांसाठीं गावापासून दूर असलेली जागा पंसत करतात ही गोष्ट आह्मांस मान्य आहे. पण याचा परिणाम मात्र मूळ हेतूच्या विरुद्ध होत असतो. शाळा दूर असल्यामुळें वेळेवर शाळेंत पोंचण्यासाठीं विद्यार्थ्यांना घाईघाईनें जेऊन जेवण झाल्या बरोबर धावपळ करीत जावें लागतें व याचा परिणाम त्यांच्या पचनशक्तीवर अनिष्ट प्रकारें घडत असतो. यासाठीं शाळांना लागूनच असलेल्या बोर्डिंगांत जोंपर्यंत सगळ्या विद्यार्थ्यांची सोय झालेली नाहीं, तोंपर्यंत तरी शाळांच्या इमारती गावच्या वस्तींतच ठेवणें आरोग्याच्या दृष्टीनें सुद्धां इष्ट आहे असें आह्मांस वाटतें, सरकारी अधिकारी इकडे लक्ष देतील काय?

## हिंदुस्थानांतली महर्घता.

गेल्या पांचसात वर्षांपासून आह्मां हिंदुस्थानवासी लोकांना महर्घतेची आंच ज्यास्त भासू लागली आहे ही गोष्ट आबालवृद्धांना विश्रुत आहे. त्यापूर्वीं ह्मणजे महर्घता नव्हती असें नाहीं. पूर्वीं जेव्हां आमच्या देशांत स्वराज्य होतें, तेव्हां ह्मणजे पेशवाईच्या काळांत दहा वीस वर्षांनीं अति वृष्टि, अनावृष्टि वगैरे ईश्वरी क्षोभामुळें दुष्काळ पडत प्रांतचे प्रांत उजाड होत ही गोष्ट इतिहासांत नमूद आहे. पण दुष्काळ निघून गेल्यावर लवकरच सुबत्ता होऊन धान्यादि पदार्थांचे भाव पूर्वस्थितीला येत. इंग्रजांचें राज्य परमेश्वर कृपेनें आमच्या वर झाल्यापासून देशांत शांतता झाली आहे; पेंढाऱ्यासारखे लूट मार करणाऱ्या लोकांचा उपद्रव नाहींसा झाला आहे; कदाचिच्या वेळीं सैन्यांची येणारी टोळ धाड बंद झाली आहे; सारांश, धान्यादि पदार्थांचे भाव चढण्याला पूर्वीच्याकाळीं ईश्वरी क्षोभा शिवाय जीं अवांतर कित्येक कारणें होतीं तीं दूर झालीं आहेत; तरी हिंदुस्थानांत अलीकडे महागाईनें कायमचें ठाणें दिलें आहे, इतकेंच नाहीं, तर दिवसेंदिवस महागाईची चढती कमान आहे. अशी स्थिती कां असावी हा राज्यकर्त्यांनीं व लोकांनीं अवश्य विचार करण्यासारखा प्रश्न आहे. या प्रश्नाचा विचार करण्यास लागणाऱ्या साधनाच्या अभावीं

लोकांनीं सामान्यतः स्थिरवंतर पावलेली देशाची राज्यपद्धति लक्षांत आणून या महागाईचें खापर जर जमीनमहसूल, धान्यांची अप्रतिबंध निर्गत इ. कारणांवर फोडलें होतें. पण सरकारी आफिसरांनीं रिपोर्टीतल्या आंकड्यांच्या जादूनें लोकांचे हे समज चुकीचे आहेत असें दाखविण्याचा क्रम सुरू ठेविला होता. पण अशा रीतीनें या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून चालावयाचें नाहीं ही गोष्ट हिंदुस्थान सरकारच्या लक्षांत येतांच त्यांनीं १९१० सालीं या प्रश्नाचा सांगोपांग विचार करण्या साठीं फायनान्स खात्यांतील मि. दत्त नांवाच्या एका हुषार बंगाली आफिसराची या कामावर नेमणूक केली, व त्यांच्या कडे पुढील प्रश्नांची चौकशी करून विस्तृत रिपोर्ट करण्याचें काम सोपविलें. चौकशी करण्यासाठीं जे मुद्दे ठरविण्यांत आले ते हेः—

हिंदुस्थानांत गेल्या पंधरा वर्षांत किंमती किती वाढल्या? नुसत्या धान्यांच्याच पुरती ही वाढ झाली कीं एकंदर सर्व जिनसांसंबंधानें झाली? कांहीं विशिष्ट प्रांतांपुरतीच झाली कीं एकंदर देशांत झाली? २ या महर्घतेचीं कारणें सर्व जगाच्या व्यवहाराशीं संबद्ध असतील तर तीं कोणतीं? स्थानिक असल्यास तीं कोणतीं? ३ ही महागाई कायमच्या स्वरूपाची आहे कीं तात्पुरती आहे? ४ कायमच्या स्वरूपाची असल्यास तिचा देशांतल्या सांपत्तिक स्वरूपावर कोणते परिणाम घडण्याचा संभव आहे? महागाई सारख्या महत्त्वाच्या व बिकट प्रश्नाची मिमांसा एकट्या दुकट्या आफिसराच्या मतानें करण्याचा सरकारनें केलेला विचार कितपत योग्य होता हा प्रश्नच आहे. कारण कीं या प्रश्नाचें बहुविधत्व, त्याचा विस्तार, आणि दूरवरचे परिणाम यावर कोट्यवधि लोकांचें हित अवलंबून होतें. शिवाय हा प्रश्न इतका बिकट आहे कीं नेमिलेला आफिसर किती ही हुषार असला तरी तो गोंधळून जावयाचा. तेव्हां एका आफिसराकडे हें येवढें बिकट काम न सोपविता सरकारी नोकरींतले पांच चार हुशार अधिकारी व खासगी धंदा करणारे पांच चार विद्वान व अर्थशास्त्रज्ञ गृहस्थ यांचें मिश्र कमिशन नेमिलें असतें तर अधिक चांगलें झालें असतें असें प्रत्येकास वाटणें साहजिक आहे. तथापि फुटक्या डोळ्यापेक्षा काणा डोळा बरा या न्यायानें मि० दत्त यांची या कामावर नेमणूक झाल्याबद्दल संतोष वाटून लोक त्यांच्या रिपोर्टाची उत्कंठेनें वाट पाहूं लागले. मि० दत्त यांनीं तीन वर्षें हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांत हिंडून परिश्रमपूर्वक माहिती मिळविली आणि ती व्यवस्थित रीतीनें मांडून आपला रिपोर्ट सादर केला. हा रिपोर्ट सरकारकडून दोन अडीच महिन्यापूर्वी प्रसिद्ध करण्यांत आला आहे. या रिपोर्टाचीं पांच कमी एक पृष्ठें असून पहिल्या पुस्तकांत खुद्द रिपोर्ट व महागाईच्या कारणांसंबंधानें मि० दत्त यांचीं अनुमानें हीं आहेत व बाकीच्या चार पुस्तकांत कोष्टकें, नकाशे वगैरे आहेत. एकंदर सगळी माहिती अत्यंत परिश्रमपूर्वक मिळविली आहे, आणि हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीच्या विचारपूर्वक अभ्यास करणारास मि० दत्त यांचीं हीं पुस्तकें बहुमोल वाटतील यांत शंका नाहीं. मि० दत्त यांनीं केलेल्या मीमांसेसंबंधानें कोणाच्या किती ही मतभेद असला तरी मि० दत्त यांनीं केलेले परिश्रम बहुमोल आहेत व त्यांनीं विषयाची केलेली मांडणी सुव्यवस्थित आहे याविषयीं कोणाचा वाद नाहीं. हिंदुस्थान-सरकारनें खुद्द याबद्दल मि. दत्त यांची तारीफ केली आहे व ती सर्वथा यथार्थ आहे.

पण केवळ विद्वत्तेचे प्रदर्शनानें बुभुक्षित लोकांचें समाधान होण्यासारखें नसल्यामुळें हातीं वेतनल्या महागाईच्या प्रश्नाचा निकाल मि. दत्त यांनीं कोणत्या प्रकारें लाविला आहे, महागाई होण्यास कोणतीं कारणें त्यांच्या मतें झालीं आहेत, व त्या कारणांचे निरसन करण्याचे कोणते व्यावहारिक उपाय त्यांनीं सुचविले आहेत हें पहाण्याची वाचकांना प्रथम उत्कंठा होते ह्मणून प्रथम मि. दत्त यांनीं केलेल्या चौकशीची फलश्रुति सांगितली पाहिजे. ही फलश्रुति पहिल्या पुस्तकाच्या चौदाव्या प्रकरणांत १८७ व्या पृष्ठावर दिली आहे ती मुद्दाम वाचकांनीं पहावी. ज्यांना हा रिपोर्ट प्राप्य नसेल त्यांचेसाठीं आम्हीं येथें ती संक्षेपानें सांगतों—मि. दत्त ह्मणतात कीं महागाईचा परिणाम कोणत्या प्रांतांवर किती प्रमाणानें झाला याची चौकशी करतांना हिंदुस्थान सरकारच्या हुकुमानें ब्रह्मदेश मुद्दाम वगळला आहे महागाईचें स्वरूप १८९७ सालीं दृग्गोचर झालें. त्यावर्षीं भावाचे प्रमाण १०६ वरून एकदम १२१ वर गेलें. १९०० सालीं १२२ झालें १९०८ मध्यें १४३ पर्यंत चढलें व पुनः उतरून १९१० मध्यें तें १३२ वर आलें. ह्मणजे १८९० पासून पुढच्या वीस वर्षांत सुमारें तीस पासून ३६ पर्यंत ही वाढ नुसत्या धान्याच्याच भावांत झाली नसून, चामडीं इमारती सामान, व तेलें यांच्यांत ही झाली आहे. या पदार्थांच्या किंमतींत ही वाढ शें. ४० पर्यंत सुद्धां गेलेली आहे. कापूस व ज्यूट शे. ३१ पासून ३३ पर्यंत या प्रमाणानें महाग झाला आहे. चहा व काफी, आयात साखर, कोळसा, रंगविण्याचे कामीं उपयोगीं पडणारीं द्रव्यें—विशेषतः नीळ—यांच्या किंमती मात्र उतरल्या आहेत. ही महागाई दुष्काळीडीत प्रांतांतून विशेष झाली असून आसाम प्रांत त्यांतून बचावला आहे. बुंदेलखंड, वऱ्हाड, सिंध, मद्रासचा दक्षिण भाग, पूर्व पंजाब, व दक्षिण इ. प्रांतांना महागाईचा चटका विशेष बसला आहे. ह्मणजे अर्धे अधिक हिंदुस्थान या महागाईनें पोळलें आहे. याबद्दलचीं कारणें देतांना मि. दत्त ह्मणतात कीं हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें सुरू झाल्यापासून त्याचा साऱ्या जगाशीं व्यापारसंबंध दृढ झाला आहे. दुसरी गोष्ट ऋतुमानांत स्वच्छंदीपणा अधिक दिसू लागल्यामुळें धान्यादिकांच्या पुरवठ्यांत अनिश्चितपणा आला आहे. पर्जन्यमान कमी झाल्यामुळें धान्याचा पुरवठा व्हावा तसा होत नाहीं. लोकसंख्येच्या वाढीचें पाऊल धान्याच्या पुरवठ्याच्या पुढें पडत आहे. हिंदुस्थानच्या मालाला जगाच्या बाजारांत अधिक मागणी येऊं लागली आहे. खुद्द हिंदुस्थानांत लोकांची भरभराट होत असल्या मुळें व लोकांना ऐटीनें राहण्याची चटक लागल्यामुळें खर्चाचा कडून ही मागणीची वाढ झालेली आहे. दळणवळणाचीं साधनें वाढलीं व रेल्वेचें भाडें कमी झालें यामुळें मालाची आयात निर्गत ज्यास्त होऊन किंमती चढल्या. लोकांची पत वाढली व नाणें वगैरे पैशाच्या देव घेवीचीं साधनें हीं वाढलीं यामुळें हिंदुस्थानांतच नव्हे तर इतर देशांतून सुद्धां पदार्थांच्या किंमती वाढल्या आहेत. जगांत सोन्याची पैदास ज्यास्त होऊन व्यापाऱ्यांशीं तारण ठेवण्याची अधिक सोय झाली हें ही महागाईचें एक मोठें कारण आहे. याशिवाय युरोपांतल्या राष्ट्रांनीं वाढविलेला लष्करी खर्च व हानिकारक युद्ध याचा ही भावावर अनिष्ट परिणाम घडलेला आहे.

आतां पर्यंतची ही स्थिति झाली. यापुढें मि. दत्त हे असें भविष्य वर्तवितात कीं हीच स्थिति आणखी कांहीं काळपर्यंत हिंदुस्थानांत राहणार आहे हें भविष्य प्रस्तुतचें युद्ध सुरू होण्याच्या अगोदरचें आहे हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें. चालू युद्धानें मि.दत्त यांच्या या निराशाजनक भविष्याचा रंग अधिकच खुलविला आहे हें सांगावयास नकोच.

येथपर्यंत मि. दत्त यांच्या रिपोर्टांत विशेषसा वादग्रस्त असा मुद्दा नाहीं. पण या महागाईचे हिंदुस्थानावर घडणाऱ्या परिणामाविषयींचे .मि. दत्त याचे विचार कोणालाही विचित्र किंबहुना विक्षिप्तपणाचे वाटल्यावाचून राहणार नाहींत. ते ह्मणतात कीं ही महागाई एकंदरीनें हिंदुस्थानच्या पथ्यावरच पडली आहे. हिंदुस्थानच्या मालाच्या किंमती चढल्यानें तो माल पूर्वी सारखा जगाच्या दूरदूरच्या भागांत निर्गत होण्याचें कमी झालें आहे जमिनीच्या मालकांना जमिनीचें भाडें अधिक मिळूं लागलें आहे. शेतकऱ्यांना शेतकी अधिक किफायतशीर झाली आहे मजुरांना अधिक मजुरी मिळत आहे ज्यांचे पगार निश्चित झाले आहेत किंवा गहाणाचा व्यापार करणारे, फी घेऊन रोजगार करणारे, शेअरांचें उत्पन्न खाणारे वगैरे थोड्याशा लोकांचें मात्र यामुळें नुकसान झालें आहे.

याप्रमाणें मि. दत्त यांनीं प्रस्तुतच्या महागाईसंबंधाचा 'अलबेल' सरकारांत पोंचविली आहे. मि. दत्त याचे हे विचार प्रामाणिकपणाचे आहेत हें आह्मी कबूल करतों. पण तसेंच ते निर्दोष, व पायाशुद्ध आहेत कीं काय हें पाहणें जरूर आहे. पण आजच्या या लेखाचें मर्यादातिक्रमण झाल्या असल्यामुळें मि. दत्त यांच्या विचारांचें परीक्षण पुढच्या लेखावर टाकणें भाग आहे.

## वादाचें पिलूं-

ऋतु प्राप्तीनंतर झालेला विवाह कायदेशीर ठरावा ह्मणून ना. शास्त्री यांनीं मद्रास कायदे कौंसिलापुढें आणिलेल्या बिलानें दुसरें कांहीं कार्य अद्याप केलें नसलें तरी एक मोठें कार्य केलें आहे. त्यानें सुशिक्षितांचें लक्ष हिंदुधर्माच्या सद्यःस्थितीच्या विचाराकडे वेधिलें आहे, तीन चार वर्षांपूर्वीं मद्रासच्या जी. नटेशन कंपनीनें' हिंदुधर्म ह्मणजे काय? या प्रश्नावर निरनिराळ्या प्रांतांतल्या विद्वान हिंदुलोकांचीं मतें मागवून त्यांचें एक छोटेंसें पुस्तक प्रसिद्ध केलें होतें हें पुस्तक ज्यांनीं वाचलें असेल त्यास हें सांगावयास नकोच कीं हिंदुधर्माच्या अवश्य तत्त्वांसंबंधानें विद्वानांमध्यें इतका मतभेद आहे कीं हिंदुधर्म ह्मणजे काय या विषयीं अखेर वाचकाचें मन अखेर गोंधळून जातें. ही स्थिति शोचनीय तर खरीच; पण ती कशाची द्योतक आहे? हिंदुधर्माची इमारत इतकी जुनी पुराणी झाली आहे कीं ती आहे तशीच उभी ठेवण्यांत कांहीं अर्थ राहिला नाहीं. तिचा पाया शाबूत ठेवून त्या पायावर सध्याच्या आपल्या समाजाच्या गरजा भागविण्यास पूर्णपणें समर्थ व सोयीची अशी नवी इमारत उभारणें जरूर आहे असें ना. शास्त्री यांच्या बिलावरील वादानें अगदीं स्पष्ट केलें आहे. या नव्या इमारतीचा नकाशा तयार करण्याचें काम अतिशय बिकट आहे, आणि ह्मणूनच आजपर्यंत जुन्या मताच्या किंवा प्रागतिक सुधारणा मताच्या कोणाही विद्वानानें या कार्याला हात घातला नाहीं. तथापि मद्रास हायकोर्टाचे माजी जज. सर सुब्रह्मण्यम् आयर यांनीं हें अवघड काम हातीं घेऊन सदर नकाशाची रूपरेखा लोकांपुढें मांडिली आहे, आणि ना. शास्त्री यांचें मूळ बिल बाजूलाच राहून सर सुब्रह्मण्यम् यांची ही रूपरेखाच वादाचा विषय होऊन बसली आहे.

## अभिनव हिंदुधर्म.

सर सुब्रह्मण्यम् यांच्या अभिनव हिंदुधर्माचें स्वरूप थोडक्यांत असें आहे—हिंदुधर्माचा पाया ह्मणजे शास्त्रग्रंथ होत. तेव्हां प्रथम त्यांचें संशोधन झालें पाहिजे. त्यांचा सारभूत अंश तेवढा घेऊन केरकचरा फेकून दिला पाहिजे. हीं नवीं शास्त्रें संस्कृतांत लिहून त्यांचीं भाषांतरें इंग्रजींत व देशी भाषांतून व्हावयास पाहिजेत. एक पत्नीत्वाचा कडक निर्बंध असावा आहे. प्रौढ विवाहाची पद्धतिच असली पाहिजे. कुटुंबांतल्या माणसाचे परस्पर संबंध आणि वारसत्व यांच्या विषयींचे नियम ठरले पाहिजेत. अगदीं जवळच्या माणसांनाच वारसाचे हक्क मिळावे. मुलांना व मुलींना घरीं आईबापांनीं शिक्षण देणें हें त्यांचें कर्तव्य त्यांच्या मनावर पूर्णपणें बिंबविलें पाहिजे. ईश्वराचे ठिकाणीं श्रद्धा, व पुनर्जन्म आणि कर्म यांवर भाव ही त्या शिक्षणांत अवश्यमेव पाहिजेत. वर्गधर्माचें बंड अजीबात खोडून काढलें पाहिजे. आश्रमधर्माची मूळची उदात्त कल्पना तेवढी कायम ठेविली पाहिजे ह्मणजे ब्रह्मचर्यांत विद्यासाधन, गार्हस्थ्यांत ममता, वानप्रस्थांत कर्माचरण, आणि संन्यासांत त्याग या चार गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्यांना मात्र धक्का लावूं नये. सनातन धर्मांतली सारभूत कल्पना ह्मणजे निर्गुण सगुणाची उपासना ही ठेविली पाहिजे. सच्चिदानंदरूपी परमात्म्याची तेवढी उपासना कायम ठेवून इतर देवतांच्या व शक्तींच्या

पुनेस बहिष्कार घातला पाहिजे. या तत्वांवर नव्या हिंदुधर्माच्या इमारतीची पुनर्घटना झाल्यास समाज जोरदार होऊन त्याच्या पायांत निष्कारण पडलेल्या नानाविध शृंखला गळून पडतील, व नव्या राजकीय परिस्थितीस अवश्य असणारें हिंदूंचें ऐक्य होऊन राष्ट्राच्या उन्नतीस त्याचें फार मोठें साह्य होईल असें सर जुत्रह्मण्यम् यांस वाटत आहे. सर साहेबांच्या या रूपरेखेसंबंधानें सुशिक्षितांत चर्चा सुरू आहे. अशा वेळीं या संबंधाचे आमचे ही विचार आम्ही लवकरच प्रकट करणार आहों.

## स्वार्थसाधन आणि राजनिष्ठा.

चालू युरोपियन महायुद्धाचे प्रसंगीं हिंदुस्थानानें राजनिष्ठ प्रजेचें कर्तव्य पूर्णपणें बजाविल्याबद्दल सारें जग त्याची प्रशंसा करीत आहे; अशा वेळीं पायोनियर, इंग्लिशमन प्रभृति इंग्रजी पत्रें म्हणत आहेत कीं ही राजनिष्ठा स्वार्थसाधनेच्या इच्छेनें प्रेरित असल्यामुळें तिची खरी योग्यता इंग्रजीराष्ट्रानें पुढें मागें योग्य प्रसंग येईल तेव्हां ठरविली पाहिजे. या म्हणण्याचा गर्भित अर्थ हा कीं निष्काम भक्तिसारखी ही राजनिष्ठा कांहीं अव्वल प्रतीची नाहीं. इंग्लिशमन पत्रानें तर या राजनिष्ठेचें बक्षीस म्हणून जीं पत्रें स्वराज्याचे हक्क मागत आहेत त्यांना या बद्दल दोष ही दिला आहे. तेव्हां या प्रश्नाचा थोडासा खोल विचार करणें जरूर आहे. हा विचार तात्विक दृष्टीनें केल्याशिवाय या प्रश्नाचा निकाल लागणार नाहीं. मनुष्याचे व्यवहार ऐहिक व पारमार्थिक अशा दोन प्रकारचे असतात. पारमार्थिक क्रिया निष्काम असूं शकतील व त्या असाव्या असें आमचें गीताशास्त्रही सांगतें. पण ऐहिक व्यवहार त्याच निष्काम तत्त्वावर चालवा असा उपदेश करणें म्हणजे शुद्ध वेडेपण आहे. स्वार्थसाधन हें तत्व तर ऐहिक व्यवहाराचें मुख्य अंग आहे. त्यावर कुऱ्हाड घालणें म्हणजे सगळे व्यवहार बंद पाडण्यासारखें आहे. राजनिष्ठाही ऐहिक व्यवहाराचें एक अंग आहे पारमार्थिक व्यवहाराचें नाहीं. हा भेद विसरतां कामा नये. निष्काम राजनिष्ठा ही खपुष्पाप्रमाणें काल्पनिक वस्तु म्हटली पाहिजे. तिला या जगांत वस्तुभूत पाया नाहीं. अर्थात् तिला व्यावहारिक अस्तित्वच असणें शक्य नाहीं. सेव्यसेवकभाव हा व्यवहाराच्या अर्थात् स्वार्थसाधनाच्याच पायावर उभा राहणार, व तो तसा असल्याशिवाय त्याला स्थायित्व ही राहणार नाहीं. तेव्हां हिंदुस्थानची राजनिष्ठा स्वार्थबुद्धिप्रेरित आहे असें म्हणून तिची योग्यता निकृष्ट प्रतीची ठरवूं पाहणारांना परमार्थ व ऐहिक व्यवहार यांच्यांतला भेद कळला नाहीं असें म्हटलें पाहिजे.

## अमेरिकेचा पुण्य प्रकोप.

ग्रेट ब्रिटन जवळचा समुद्राचा भाग हा युद्धक्षेत्रांत अंतर्भूत समजावा व त्या भागांत सांपडणारीं सगळीं जहाजें मग तीं ब्रिटिश असोत, कीं तटस्थ राष्ट्रांचीं असोत, त्यांचा नाश करावा अशा अर्थाचा एक हुकुम केसरनें नुकताच काढलेला ऐकल्या पासून त्याच्या संबंधानें सान्या जगांत चर्चा सुरू झाली आहे. खुद्द इंग्रजांना हा केवळ नाटकी आविर्भाव वाटत आहे. समरभूमीवर झालेली फजीती छपवून जर्मन लोकांनां प्रोत्साहित करण्याची ही युक्ति आहे या पक्षीकडे तिच्यांत अर्थ नाहीं अशी पक्की खात्री असल्यामुळें जहाजांचा विमा उतरणाऱ्या कंपन्यांनीं आपले विम्याचे दर चढविले नाहींत, किंवा जहाजांची आयात निर्गत करणारांनीं आपले व्यवहार बंद ठेविले नाहींत परंतु अमेरिकन लोकांचा मात्र हा हुकुम ऐकून अंगाचा तिळपापड झालेला दिसतो. हा हुकुम अमेरिकन राष्ट्राला अपमानकारक आहे व या वेळीं हा अपमान गिळून बसणें योग्य नाहीं, तर अमेरिकेनें आपल्या अंगचे पाणी जर्मनीला दाखवून त्याच्याकडुन या अपमानाचें परिमार्जन करविलें पाहिजे असे पुण्य प्रकोपाविष्ट उद्गार अमेरिकन पत्रांनीं काढले आहेत अगोदरच जर्मन लोकांच्याहातून घडलेल्या अनन्वित कृत्यांमुळें अमेरिकेच्या ठायीं जर्मनी विषयीं असलेली सहानुभूति मावळली आहे; तशांत जर निर्दिष्ट केलेल्या हुकमानें आगीत तेल ओतल्याप्रमाणें करून अमेरिकेला चिडविल्यास प्रस्तुतच्या युद्धाच्या शेवटास लवकर आरंभ करून दिल्याचें श्रेय जर्मनी मिळवील असें दिसतें. ' अधोधो गच्छन्तां भवति विनिपातः शतमुखः ' हीच गोष्ट खरी.

## न्युझीलंडचें उदाहरण.

हिंदुस्थान ब्रिटिश अंमलाखालीं आपली सर्व प्रकारची ऐहिक उन्नति करून घेऊं इच्छितो व प्रस्तुत प्रसंगीं दाखविलेल्या उच्चप्रतीच्या राजनिष्ठेबद्दल ब्रिटिश राष्ट्राकडुन योग्य प्रसंगीं पारितोषिकाची अपेक्षा करीत आहे या बद्दल त्याला शरम वाटण्याचें बिलकुल कारण दिसत नाहीं. न्यूझीलंड काय करीत आहे तेथें तर खुद्द हाय कमिशनर सारख्या उच्च पदाधिष्ठित सरकारी अधिकाऱ्यानें स्पष्टपणें बोलून दाखविलें कीं प्रस्तुतच्या युद्धांत न्यूझीलंडनें केलेल्या मदती बद्दल अधिक हक्क मागण्याचा अधिकार प्रजेला प्राप्त झाला आहे. प्रजेनें आपलें रक्त व धन अर्पण केलें तें निष्काम बुद्धीनें केलें नाहीं तर फलशेनें केलें हें स्पष्टपणें बोलून दाखविण्यांत जर हायकमिशनरला आपण कांहीं अपराध करीत आहो असें वाटत नाहीं, तर हिंदुस्थानांत तसेच उद्गार एखाद्या देशीपत्रकर्त्यानें काढल्यास त्यावर तुटून पडण्यास इंग्लिशमनला काय अधिकार आहे ?

## वऱ्हाडवृत्त

हवामान— गुलाबी थंडी, गार वारा व तीव्र ऊन यांच्या संयोगानें सध्यांचा ऋतु फार नामी व आरोग्यकारक झाला आहे. रोगराई नाहीं.

प्लेग— नागपुरास या रोगानें कहर उसळला असून दररोजच्या मृत्यूचें प्रमाण दीडशे दोनशेच्या आंकड्यापर्यंत चढलें आहे. नागपुरास तो आता शमत जाईल असा रंग दिसतो पण तो इतरत्र फैलावेल अशी भिती वाटते.

रा. ब. बाळकृष्ण काशीनाथ जोशी हे स्थानिक मित्रमंडळींच्या भेटीच्या निमित्तानें आकोल्यास आले आहेत. गृहस्थ फार आनंदी व प्रेमळ असल्या मुळें त्यांच्या आप्तमित्रां मध्यें त्यांची चहा विशेष आहे.

रा० रा० माणिकजी दादाभाई पांडे एल. सी. इ. थिआसफिकल सोसायटी चे इन्स्पेक्टर असून त्यांचा मुक्काम आकोल्यास आहे. गेल्या रविवारापासून त्यांची व्याख्यानें चालू आहेत. लोकांपुढें विचार मांडण्याची पद्धति अगदीं साधी, बाळबोध व मोहक आहे, कर्माच्या सिद्धान्ता पासून व्यवहाराला कसा पदोपदीं लाभ होतो हें त्यांनीं चार व्याख्यानांत फार स्पष्ट केलें. ते उद्यां इलिचपुराकडे जात आहेत. त्यांनीं आपलें आयुष्य या सत्कार्यी वाहिलें आहे तेव्हां अशांचा बोध कां फलद्रूप होणार नाहीं बरें.

रा० रा० रामचंद्र वासुदेव परांजपे बार–ॲट– ला, सबजज्ज, उमरावती यांस सागर येथें बदलण्यांत आल्यामुळें त्यांच्या उत्तम न्यायाप्रियतेला मोडून असणाऱ्या गोड सौजन्या मुळें उमरावतीच्या मंडळीस त्यांची विशेष आठवण राहील.

रा० रा० फ्रामरोझ रुस्तुमजी सबजज्ज, वाशिम यांस १ महिन्याची हक्काची रजा देऊन मलकापूरचे मुनसफ रा० रा० शिवराम कृष्ण करबरकर यांस वाशिमास सबजज्ज नेमण्यांत आलें.

रा० रा० ए० बी० स्कॉट आफि० पोलीस सुपरिंटेंडंट यांस पुनः असि० सुपरिंटेंडंटच्या जागेवर वाशिमास धाडण्यांत आलें. रा० रा० कृष्णराव पुरुषोत्तम भट ए० अ० क० यांची बदली सागरहून दमोला झाली.

रा० रा० शहामहमद अब्दुर रहीमान तहशीलदार, आकोट यांस तीन महिन्याची हक्काची रजा देण्यांत आली आणि त्या जागीं रा० रा० रामराव बंधुजी चौबळ नायब तहशीलदार यांस आकोटास तहशीलदारीच्या जागेची बदली देण्यांत आली हें कळविण्यास आनंद वाटतो.

ढोहारें ता० बाळापूर येथील काइजातीची पन्नाशीच्या वयातली बनो नांवाची विधवा व मारुती नांवाचा वृद्ध गडी हे व्यभिचाराच्या कैात्रीं खेळले आणि शेवटीं १४ नोव्हेंबरला त्यांस मुलगी झाली. त्या बाईनें त्या मुलीचा खून करून व मारुतीनें तें घेऊन पुरून टाकलें. या गुन्ह्या बद्दल त्यांस अनुक्रमें जन्मठेप व १८ महिने कैद अशा शिक्षा चालू सेशनांत झाल्या. उमेदीत असले प्रकार थोडे घेतात, आणि खोटी अविचाराची कारकर्दी शेवटीं धातुक होते.

## नोटीस

नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें दिवाणी मुकदमा नंबर १११ सन १९१४ इ. दियमान डि० जज साहेब वेस्ट बेरार डिस्ट्रीक्ट यांचें कोर्ट मुक्काम आकोला

नांव लक्ष्मी मर्द मारोती

जात कुणबी राहणार मोहोगांव

तहसील मुर्तिजापूर जिल्हा आकोला

ह्या अल्पवयी नामा मारोती कुणबी उमर वर्षें ११ राहणार मोहोगांव त० मुर्तिजापूर तहसीलीचे [२] नामा व. मारोती कुणबी साठीं पालन कर्ता [१] लक्ष्मी मर्द मारुती ईसनेमण्या विषयींच्या अर्जा संबंधीं सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं सदहू अर्जदाराने सदहू अल्पवयीचें [२] स्वतःचे आणि त्याचे मिळकतीसाठीं पालन कर्ता लक्ष्मी मर्द मारुती ईस नेमण्याविषयीं अर्ज केल्या वरून सदहू अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख १३ माहे मार्च सन १९१५ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदहू अर्जदाराच्या अर्जाबद्दल कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊ शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्रतिनीधीच्या मार्फत या कोर्टात हाजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख ११ माहे २ सन १९१५ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्क्या-निशीं दिली.

शिक्का

K. K. Thakur.

नो० नं० ९६ डि० जज आकोला

## नोटीस

१ रामचंद्र सावोजी २ कीसन गणपत ३ येशवंता मर्द विठू ४ बाबन परशराम ५ अमृत परशराम पाटील राहणार सर्व वाकळ तालुके आकोट यांस

नोटीस देणार मानाजी जानजी माळी राहणार वळेगांव ता० आकोट नोटीस देतो कीं मी तुमचे शेत वळेगांव येथील स० नं ४९ एकर १८।१८ आकार रुपये १८ हे सालीम सन १३२४ फसली एक सालाकरितां सं. मिरूपये २७० दोनशें सत्तर देणें कबूल करून वहितीस घेतलें. व शेतास लागवड लाउन माल ज्याचा तयार केला तो माल मार्गशीर्ष शुद्ध १५ च्या आत बाहेर सर्व माल कणसाच्या गाड्या ९॥ मुगाच्या गाड्या ४ त्यांत मुगमण दहा व कडबा पेंड्या ११०० दर शेंकडा रुपये ५ प्रमाणें रकम ८० चा व कुळाव मुजाचे ढाळे किंमत रुपये १० चे व मुगाचें कुटार ढाळे ४ किंमत रुपये २० व हरभऱ्याचे वेलेस हरभऱ्याभरे सात ७ किंमत रुपये ७ चे असे तुम्हीच नेले आहेत. माल नेल्याबद्दल मी तुमचे घरीं जाऊन पुष्कळ विनवणी केली परंतु तुम्ही न ऐकतां मजला बोलुन हाकून काउन दिले करितां यानोटिसीनें कळवितों कीं माझा वरील रकम रु० २१० चा व मालाची रकम रु० जी होईल ती असे तुम्ही आले मालकीचे रु० जमा करून पटा माझे स्वाधीन करावा. व जी रकम माझी तुमचे कडेस बाजवी निघेल ती देऊन माझी पावती घ्यावी. तसें न केल्यास रीतीप्रमाणें दावा करून खर्चा सुद्धा रकम भरून घेईन हे पक्के समजावें कळावें तारीख ८।२।१९१५ .

द० विष्णु माधव रा० आकोला

सही.

मानाजी जानजी माळी रा० वाकळ

गो० ना० आकोट नि. गुरु

नो. नं. ९६

# युरोपांतील महायुद्ध.

—:*:*:*:—

## उपयुक्त व विविध माहितींचा संग्रह.

( रंगीत नकाशे व विविध चित्रें यांसह. )

सांप्रत युरोपांत जें महायुद्ध चाललें आहे, त्यासंबंधांत लागणारी सर्व प्रकारची माहिती थोडक्यांत वाचकांस समजावी, अशा उद्देशानें हें पुस्तक तयार केलेलें आहे. वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या लढाईच्या बातम्या या पुस्तकांत घेतलेल्या नसून, हल्लींच्या महायुद्धाचें ज्ञान सुलभ रीतीनें होईल अशा प्रकारची संगतवार हकीकत घेऊन, शेवटीं वेगवेगळ्या रणभूमींचे २ नकाशे; आणि सर्व जगाचा व युरोपांतील सर्व रणसंग्राम-भूमीचा एकत्र असे दोन रंगीत नकाशे, आणि लढाईंत सामील झालेल्या राष्ट्रांच बलाबल दाखविणारा नकाशा, याप्रमाणें पांच नकाशे या पुस्तकास जोडले आहेत. ह्या नकाशांत लढाईचीं मुख्य ठिकाणें, आरमारांच्या जागा, किल्ले मुख्य शहरें, नद्या, रेल्वे इत्यादि माहिती स्पष्ट करून दाखविली असून, शिवाय स्पष्टीकरणार्थ ३ कोश जोडले आहेत. या कोशांच्या आधारानें लढाईंतील शहरांची, बंदरांची, गावांची, त्याचप्रमाणें लढाईंत भाग घेणारे थोर पुरुष आणि शस्त्रास्त्रासंबंधानें वापरण्यांत येत असलेले पारिभाषिक शब्द इत्यादि माहिती थोडक्यांत समजेल अशी योजना केली आहे. पुस्तकांतील विषयांचीं ४९ प्रकरणं केलीं असून त्यांत युरोपांतील राष्ट्रांची परिस्थिति, लढाईचीं कारणें, जर्मनी इंग्लंड, रशिया, फ्रान्स, आस्ट्रेलिया, सर्विया, टर्की, बेलजम इत्यादि राष्ट्रांचा परस्परांत झालेला पत्रव्यवहार नाकेबंदीचीं ठाणीं, व्यापाराचा प्रसार, वेगवेगळ्या राष्ट्रांच्या परिस्थितीची माहिती, लढाईशीं संबंध असलेल्या थोर पुरुषांची माहिती, आतांपर्यंत लढाईत घडलेल्या गोष्टींची त्रोटक माहिती, अशा प्रकारें विषयांची योजना करून पन्नासांवर चित्रेंहि घातलीं आहेत. कापडी पुठ्यांत बांधलेल्या पुस्तकाची किंमत १॥ रुपया, आणि साध्या कागदी पुठ्यांत बांधलेल्या पुस्तकाची किं. १ रु. आहे. परंतु '**इंदुप्रकाश**' आणि '**श्रीसयाजीविजय**' या पत्रांच्या वर्गणीदारांस हें पुस्तक सन १९१९ सालची भेट म्हणन देण्यांत येतें. इंदुप्रकाश रोजचें पत्र असून त्याची वार्षिक वर्गणी टपालसह ९ रु. आहे, आणि सयाजीविजय हें साप्ताहिक पत्र असून त्याची वार्षिक वर्गणी टपालसह रु. २॥ आहे. वाटेल तेव्हां नांव दाखल करून वर्गणीदार होतां येतें. नमुना अंक फुकट मिळेल.

**ठाकुरद्वार, मुंबई, दामोदर सांवळाराम आणि मंडळी**

---

### नोटीस

नोटीस बेशमी संपत वा॥ बाजी पाटील रा० मौजे सावरें ता० आकोट जि० अकोला.

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते का तुमचें शेत स० नं० १४८ ए० गु० आ० हे यांतील

१६ १७ ३४

तीन हिस्से तुमचेजवळून एक पीका करितां बाहेतीस रुपये १२० एकशे वीस ला कबूल कले होते त्याप्रमाणें आह्मी वाही पेर वगैरे करून पीक घराकडे नेत असतां ते आह्मांस न नेऊ देतां तुह्मी स्वामित्वाचे रकमे करितां अडवून धरिलें त्यामुळें ते उभें पीक परस्पर उत्तारी मद्धां तुमचे स्वाधिन तुमचे स्वामित्वाचे रकमेत करून दिलें आतां स्वामित्वाचे रकमेबद्दल अगर महाराची भीक पायली बद्दल आह्मी मुळींच जबाबदार नाहीं उलट आमचें नफ्याची रकम आपले जवळून भरून घेतला जाईल. कारण त्यांत मला नफा होत होता तो अंदाज रुपये ५० पन्नास तो मला नोटीस पावल्यापासून आठ दिवसाच आंत चुकती रकम करून घ्यावी न दिल्यास योग्य कोर्टमार्फत दावा करणें भागपडेल. व विनाकारण मला नोटीस देण्याचा त्रास दिला सबब नोटीस खर्च तुह्मांस द्यावा लागेल कळावें ता० १८।१।१९

सही.

नामदेव सुर्यभान रा. सावरे द. खु.
नो. नं. ६०

### नोटीस

नोटीस बेशमी तुळपाई मर्द गोविंदा टिकार रा. आंबेटाकळी ता. बाळापूर

ईस.

खालीं सही करणार नोटीशीचें उत्तर देते कीं त्वां ता. ४ माहे जानेवारी १९१९ चे वऱ्हाड समाचारांतून दिलेली नोटीस पावली. तींत बराच खोटा मजकूर आहे. १ वर्ष त्वां मला अन्न वस्त्र दिलेंस व त्यावर पुनः हा काल पर्यंत कांहीं दिलें नाहींस दोन वर्षे मी मागून थकले शेवटी निरुपाय म्हणून नथ १ व गुंडवाळ्या जोड१ मोडून निरवाह केला. करदोडा मला माहीत नाहीं व असें खोटें तुफान घेण्यांत हंशील नाहीं. तरी आतां पुनः कळविते कीं मागील दोन वर्षांचा अन्न वस्त्र खर्च व चालू सालचे मागील वहिवाटीनुरूप अन्नवस्त्र मला द्यावे म्हणजे झाले यावर माझें मागणें नाहीं. परंतु तेंही न देतां अशा वाकटानें जर तें चुकऊ पहाल तर मात्र मला कोर्ट मार्फत दाद मागावी लागेल व त्या बद्दल खर्च पुनः तुह्मासच द्यावा लागेल. माझी खरी मालकी असतां मला खाण्या पर्यंत तंग केलें आहे. माझा वृद्धापकाळ असल्यानें माझे कडून मोल मजुरी ही होत नाहीं व माझा फारच विपन्नावस्था आहे हे जाणून नोटिस पावल्या पासून १९ दिवसांत योग्य व्यवस्था करावी नाहीं पेक्षां वरील प्रमाणें तजवीज केली जाईल कळावे ता. ९।२।१९

सही

नि. आंगठा चिमाई मर्द गोविंदा टिकार रा. आंबेटाकळी ता. बाळापूर नि. खुद.
ना. नं. ६१

---

## *Notice*

Notice is hereby given to the public that the Municipal Committee of Ellichpur City propose to make the following rules under Section 116 [1] (a) (') and (2) of the Berar Municipal Law, 1886, on all vehicles and animals plying for hire within the limits of the Ellichpur City Municipality.

The rules will be taken into consideration after the expiry of one month from today. Any objection or suggestion in respect thereof must be forwarded to the undersigned before the expiry of the said period; after which no objection will be taken into consideration.

RULES.

Rules under Section 116 [1] (a) (b) and (2) of the Berar Municipal Law, 1886. for vehicles and animals plying for hire within the limits of the Ellichpur City Municipality.

I. The proprietor of every vehicle or animal plying for hire within the limits of the Ellichpur City Municipality shall provide himself with the necessary license from the Municipal Committee or from such person as the Municipal Committee may authorize in this behalf

The license shall be obtained on payment in advance of the fees prescribed below:———

| Description. | for a year or a portion of a year exceeding 6 months | for six months or less |
|---|---|---|
| **LICENSES TO CARRY PASSENGERS.** | | |
| Four—wheeled cart | 10-0-0 | 5-4-0 |
| Two—wheeled cart or Tonga ( with springs ) | 6-0-0 | 3-4-0 |
| ..............do.................. (without springs ) | 6-0-0 | 3-4-0 |
| Per animal | 1-0-0 | 0-10-0 |
| **LICENSES TO CARRY GOODS.** | | |
| Four—wheeled cart | 10-0-0 | 5-4-0 |
| Two—wheeled cart | 6-0-0 | 3-4-0 |
| Per animal | 1-0-0 | 0-10-0 |

Note 1. Vehicles and animals thus licensed shall during the period covered by the license be exempt from the tax on vehicles and animals assessed under Section 41 (1) A (c) and (d) of the Berar Municipal Law, 1886.

II. The maximum load to be carried by any vehicle licensed to carry passengers shall be as follows:———

An ordinary khāndesh Damni exclusive of driver...................... 4 passengers
A large damni or khachor exclusive of driver...................... 6 ......do.-
Two—horse carriage...........do ...................................... 4 ......do.-
one—horse ......................do ...................................... 3 ......do.-
A four—wheeled large sized carriage or omnibus exclusive of the driver ................ 8 ......do.-

III. The maximum load of any vehicle licensed to carry goods shall not exceed 16 maunds. One maund is equivalent to 40 seers and one seer being equivalent to 80 tolas.

(1) provided that any such vehicle which may occasionally be used to carry passengers shall not carry more than 6 passengers exclusive the driver.

IV. No person shall drive a licensed vehicle unless he is licensed as competent to do so. The fees for a driver's license shall be one rupee if taken out for a whole year and annas ten if for a half year.

(1) The license is to be granted with a badge containing the number of the license of the vehicle and the driver. The badge granted shall be worn on the right arm. The badge must be returned when the license is cancelled. Badges shall be transferable in case of a driver being dismissed or otherwise removed. The number of badges shall not exceed the number of licensed vehicles.

V. As regards forms &c: to be issued and the registers to be maintained the Municipal Committee shall follow the procedure laid down in rule 135 and 136 of the Municipal Account rules published in Hydrabad residency orders Notification No 276 dated the 22 nd August 1896, and confirmed by the Resident in Hyderabad Residency Orders Notification No 106 dated the 29th March 1897. Every vehicle licensed must have the number of its license clearly marked on both sides of the vehicle.

VI. Licenses shall be issued yearly and half yearly, the year being reckoned from 1st April to 31st March both days inclusive and the first half of the year being reckoned from 1st April to 30th September, both days inclusive, and the second half from the 1st October to 31st March, both days inclusive. No license shall be issued for periods other than those specified.

VII. Licenses may be taken out and renewed at any time on application to the Municipal Committee. The first application under these rules shall be made within one month from the date on which they come into operation.

VIII. Every proprietor or person in charge of a vehicle or animal shall produce his license for inspection when called upon to do so, by any Magistrate or police Officer or officer or servant of the Municipality duly authorized in this behalf or by any person engaging the vehicle.

IX. When a license is defaced, torn or lost, a duplicate copy of it may be obtained on payment of a fee of 8 annas in respect of a license pertaining to

a vehicle and annas 2 in respect of a license pertaining to a driver or animal. The original one shall not be in force thereafter. No refund of license fee for vehicle, animal or driver shall be granted for any cause whatever.

X. Every driver shall keep to the left hand side of the road and every vehicle shall be provided with a light between sunset and sunrise.

XI. All vehicles and animals plying for hire shall be presented in the month of March and September of each year at the Municipal office for inspection by a sub committee composed of two or three members appointed by the General Committee.

(1) No vehicle or animal shall be licensed or have the license for it renewed unless it is cosidered fit for plying.

XII. The license of any licensee, who breaks any of these rules may, for reasons recorded in writing, be suspended by the Chairman, Vice-Chairman or the Secretary of the Municipality for a period not exceeding 6 months and may be subsequently cancelled by the Municipal Committee if the cause for its suspension continues to exist at the end of that period. The license of any licensee whose vehicle or animal becomes unfit for plying may also be similarly suspended by the Chairman, Vice-Chairman or the Secretary of the Municipality, until the vehicle or animal is replaced or has otherwise become fit for plying.

(1) Any vehicle or animal of which the license is suspended shall, during the period of such suspension, be considered as without license and the proprietor of such vehicle or animal shall be liable to prosecution and conviction, under rule XIII. if he plies for hire during such suspension, and any licensee repeatedly infringing any of these rules shall be liable to a prosecution before a Magistrate and on conviction to a fine not exceeding Rs. 20/.

XIII. Any person plying a vehicle or animal for hire within the limits of the Ellichpur City Municipality without obtaining a license as provided for in these rules shall be liable to a presecution before a Magistrate and on conviction to a fine not exceeding Rs 20/.

XIV. The Municipal Committee may at its discretion grant or refuse a license to any licensee, who has been repeatedly convicted under rules XII and XIII or whose license has been repeatedly suspended under rule XIII.

XV. The licenses are not transferable without the previous permission of the Municipal Committee or of such person as the Municipal Committee may authorize in that behalf but when the ownership of a licensed vehicle or animal is transferred, during the currency of that license, notice shall be given by the transferee, in writing, within one week of the transfer to the Municipal Secretary, who will then, on payment of a fee of annas 8 in the case of a vehicle and annas 2 in the case of an animal, make the necessary alteration in the register and the license; if such notice be not given within 7 days as required above, the new proprietor shall, if the vehicle or animal plies for hire within the Municipal limits, be liable to pay the yearly license fee and shall also be liable to be prosecuted and convicted under rule XIII.

XVI. The following shall be maximum rates of hire within the Municipal limits in the absence of any express contract.

| | From Railway Station to any place or to | |
| --- | --- | --- |
| | In town or from | To the other side of the river or— upto cercuit house or from |
| For passengers per seat in horse tonga | 0-1-6 | 0—3—0 |
| ......do......bullock cart | 0—1—0 | 0—1—0 |
| RATES FOR VEHICLES | | |
| drawn by bullocks and carrying four— passengers | 0—4—0 | 0—6—0 |
| ......do......carrying 6 passengers | 0—6—0 | 0—8—0 |
| Horse tonga drown by one horse | 0—6—0 | 0—9—0 |
| ......do......by two horses | 0—8—0 | 0—12—0 |
| Rates of hire for a whole cart or tonga for any time within and not exceeding one hour | | 0—8—0 |
| Rates of hire for a whole cart or tonga for any time for every hour beyond one hour | | 0—4—0 |

The rates for carrying goods may be settled between themselves by the owner or the driver of a cart and the person hiring it.

XVII. Nothing contained in these rules shall prevent the proprietor of a licensed cart, from entering into a private contract for the hire of such cart by the day or a month.

XVIII. Every owner or a driver of a licensed vehicle or animal shall be bound at all times to make his licensed vehicle or animal or both available to persons requiring the same, povided the requisite hire is paid or agreed to be paid by the hirer.

Ellichpur city
3rd February 1915

Sd/ K. V. Mhaskar.
Secretary M. C.
Ellichpur city.

## नोटीस

नोटीस घेणार लक्ष्मण आपा वा॥ कोंडवाणी रा० भुली प्रगणे गिरोली ता० मगरुळ जि० आकोला. यांस:—

नोटीस देणार अहल्याबाई मर्द भगाजी तायडे रा० भुली प्रगणे गिरोली ता० मंगरुळ जि० आकोला नोटीस देतो कीं गुदराई मी भगाजी व मी असें आम्ही दोघांनी मिळून तुम्हांस अंदाजे तीन वर्षे झाले असतील तुम्हाला कुलमुखत्यार नेमीले होते परंतु तुम्ही मला पैसे केल्याबद्दल हिशेब देत नाहीं व माझे विरुद्ध सर्व कामे करितां व माझ्याशी तंटे करून मारहाण करितां यामुळें मी आपले तर्फे कुलमुखत्यार नेमीले होते ते मी कुलमुखत्यार नोटीस केल्यापासून रद्द समजावे व माझे तर्फे स्थावर मालाची व जंगम मालाची विक्री केल्यास ती रद्द समजावी व आज तुम्ही तीन वर्षापासून पैसे जे वसूल केले त्याचा हिशेब १५ दिवसात दाखवून माझे हिश्याचे पैसे मजला द्यावे न दिल्यास दिवाणी कोर्टांत दावा करून पैसे घेतले जातील कळावे तारीख १६ १-१५ इसवी

सही.

अहल्याबाई मर्द भगाजी तायडे रा० भुली निशानी बांगडी असे

नो. नं. ६२

## नोटीस

नोटीस घेणार धनाजी वा॥ महादु धोबी रा० कुटासा ता० आकोला

यांस

खाली सही करणार कळविते कीं तूं माझा चुलता असून माझ्या बापाची सर्व इस्टेट समाईक होती. माझ्या बापाला अपत्य म्हणून मी एकच मुलगी असून तुलाही तीन मुली आहेत. व सांप्रत तूं महारोगानें पीडित आहेस. दुसरी माझी १ सखी चुलती असून तिलाही सर्व मुलीच आहेत, या तुमच्या तिघाभावांत माझा बाप वडील होता. तो वारल्यावर त्याच्या मागें त्याच्या मालाच्या तुरूप त्वां मला ३ तिफणीची जमीन देऊन त्या बद्दलचें कागदपत्र पंचां समक्ष झालें. परंतु ते तुझ्या जवळच राहून जमिनीच्या कबजाचा प्रश्न आज देऊं उद्या देऊं म्हणून आजवर तसाच राहिला. आतां तुझें वय जास्त झाल्यानें व तुला मुलगा नसल्यानें ही इस्टेट दुसऱ्याच्या घरांत जाणार असें दिसतें वरूनकळविते कीं मागच्या कराराला स्मरून ती तीन तिफणची जमीन मला द्यावी. व तसें केल्याबद्दल नोटीस पावल्यापासून १५ दिवसांत सूचना द्यावी. नाहीं पेक्षां योग्य कोर्टांत दावा आणून मला आपला निकाल करून घ्यावा लागेल. कळावें ता० ५।२।१९१५

सही

तुळशी मर्द कृष्णाजी धोबी राहणार डवल ता० आकोट हिचे करितां मुलगा पांडु वा॥ कृष्णाजी धोबी नि० आंगठा

साक्ष

सखाराम वा॥ महाजन धोबी रा० हात ता० बा० द० खुद

नो० नं० ६३

## नोटीस

नोटीस घेणारी ठुणकी मर्द रावजी धनगर रा० बोरगांवमंजू ता० आकोला २ रावजी बालाजी धनगर रा० बळेगांव ता० आकोट ३ मारोती पांडुरंग रा. खंदळ ता. आकोट

यास:—

खाली निशानी करणारा कडून कळविण्यांत येते कीं तूं माझी भावजई असून तुला मुलगा नामें किसन हा आहे. तुझा नवरा म्हणजे माझा सखा भाऊ मयत झाला त्याला अजमासे १॥। वर्षे झालीं. वडिलोपार्जीत इस्टेट एकत्र असून तिजवर सुमारें ६६०० चा कर्जाचा बोजा आहे सदरहु इस्टेट अलीकडे कांहीं लबाड लोकांच्या नादानें तूं अफरातफर करू पहातेस तरी असें तुझें करणें मला तुझ्या खुद्दमुलाला व मावकाराला तिघांनाही अनिष्ट आहे. तुझ्या मनांतून गंर्धव करून जाण्याचे आहे. म्हणून त्वां ही अफरातफर चालविली आहे तरी तुला बजाविण्यांत येते कीं तूं कोणतीही अफरातफर आमच्या स्थावर जंगम इस्टेटीची करशील तर त्या बद्दल ती इस्टेट वगैरे कोणतेच तऱ्हेनें जबाबदार न होतां तुला जबाबदार धरले जाईल. तसेच सर्वत्रास ही कळवितो कीं वरील बाईजवळून कोणी इस्टेट गहाण, खरेदी, पट्यानें वगैरे घेऊं नये घेतल्यास रद्द समजले जाईल तसेच तुलाही सल्ला देणारे आसामी नंबर २-३ यांस ही कळवितो कीं तुम्हां अशा सल्ला देण्याचें बंद करावें नाहींपेक्षां तुम्हावर हे योग्य काम चालविण्यांत येईल. मैत भावाच्या दोन्ही स्त्रियांस अन्नवस्त्र देण्यास माझी तयारी आहे. मुलगा सज्ञान झाल्यावर कर्ज फिटल्यावर कायदेशीर हिस्सा देण्यास मी तयार आहेच. मुला जवळून कांहीं कर्म जास्त खोटे कागद वगैरे करून घेतल्यास तुम्हावर फौजदारी करण्यांत येईल. क. ता. ३।२ सन १९१५

सहीची निशानी आंगठा
सखाराम कृष्णाजी मोरे धनगर
रा० बोरगांवमंजू ता. आकोला
यांचाखुद्द
नो० नं० ६४


## अनुभवुन पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमींट, सुंठ, पुदीना हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध याच्या अप्रतीम गोळया किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा आगपैण, व्रण, चिखली, मुकी, ओली खाज, जखम, नखाविषयीं, तमाम रोगाव चालणारा १ च 'दिलखुष' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो पैष्टीक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे, विंचवावर पूड किं. १ रु० व डोळयांतील वेगळे सोडण्याचे औ. कि ४ आणे, वि० खु० पत्रद्वारें, वंग प्रवाळ हा भद्रीचे किं० तोळयास २ रु०

पत्ता — व्ही० आर० मुळे,
नांदुरा. जी० आय० पी०
नो० नं० ९.


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाड समाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला—सोमवार तारीख २२ माहे फेब्रुवारी सन १९१५ ई० [ अंक ८

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमाच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. G. Ridland.
आकोला ९।९।०९ } एजंट

नो. न २

केशराचे फुल मुफ्त

पवित्र केशर ॥।=शुद्ध शिलाजीत ॥ असली कस्तूरी २४ ममीरातिनती १ खाजिस हींग ८= तो० सुंदर कामदार शाल ३ व $1\frac{1}{2}+1\frac{1}{2}$ गज १ ते १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२

नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १०८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दतमंजन मायफळाशीं कांहीं इग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसात नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषवें सर्व औषधी विक्रणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ९

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारची सुबक व घाटदार भांडी आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठ मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**
नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यात श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य याचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस.

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें—

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्मसंबंधें प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० नं० १३

### नोटीस

नोटीस बेशमी सोनाजी वा॥ निंबाजी देवढे जात कुणबी राहणार मौजे दुबळवेल तालुके वाशीम जिल्हा आकोला

यांस

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यात येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून लग्न झाल्यास सुमारें सोळा १६ वर्षें झालीं आहेत. आणि मी शहाणी होऊन सुमारें ४॥ वर्षें झालीं आहेत. मी तुम बरोबर वागण्यास कबूल असून नेत नाहीं. मी बरेच वेळां निरोप पाठविले त्याकडेस लक्ष देत नाहीं यावरून तुह्मांस मला वागविण्याचे नाहीं. असें स्पष्ट दिसतें. मी माझे आईबापाचे येथें सतत सोळा १६ वर्षांपासून आहे. तुह्मी मला मुळींच नेले नाहीं माझे आईबापाची स्थिती फारच गरीबीची आहे. त्यांनी मला लोकांचे कर्जकाढून पोसले आहे माझे बद्दल अन्न वस्त्रा संबंधानें रुपये ३०० बिनशें सावकाराचें कर्ज देणें आहे. सबब या नोटिसीनें तुह्मांला कळवि. ण्यांत येते कीं ही नोटीस पावल्यापासून एक १ महिन्याचे आंत तुह्मी माझे सावकाराचे कर्ज रु० ३०० तिनशें देऊन मला वागण्यास घेऊन जावे. तसें जर वरील मुदतींत तुह्मी न केल्यास मी दुसरा घरठाव करीन मग तुमचा नवरे पणाचा हक्क कोणत्याही प्रकारें चालणार नाहीं. ही नोटीस पूर्णपणें लक्षांत आणावी व त्याप्रमाणें करण्यास चुकू नये. ह्मणून मु.न कळविलें आहे कळावें.

ता० १०।२।१९१५ ह० द० दामोदर महादेव अर्जनविस वाशीम

सही

जनी मर्द सोनाजी देवढे जात कुणबी रा० हल्लीं तामसी ता० वाशीम इची निशानी खु० बांगडी असे दस्तुर वर प्रमाणें

साक्ष

१ सोनासा रतनसा भाट रा० मौजे कारली द० खुद

१ राघा वा॥ सटवाजी कुणबी रा० तामसी नि० रेव द० सोनसा

नो० नं० ६८

### नोटीस

नोटीस बेशमी बिसमिल्लाखां वा॥ गरीबशा मु० राहणार कमरे पातुर्डाबु० ता० मळगांव नि० बुलडाणा

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते मी तुह्मांला ता० २८।११ सन १९१२ ई० रोजीं माझ्या स्थावर जंगम इस्टेटचें जनरल मुखत्यारपत्र लिहून दिलीं त्यास अजमासें आज २ वर्षें २ महिने १३ दिवस झाले. या शिवाय तुह्मी मनजवळून ता० २८ नोव्हेंबर सन १९१२ ई० रोजीं गहाणखत कर्जरोखे व १०० शंभर रुपये रोख नगदी असामींवर फिर्याद करण्या करितां नेले. तरी नेल्यातारखेपासून आजपर्यंत देखील एकही असामीची तोड जोड न करतां तुह्मी मज बायको जातीला धोका देऊन विश्वासघात केला. त्याच काळा मध्यें तुह्मी माझें दत्तकपत्र लपवून कांहीं दिवसा नंतर सांगितलें कीं तुझें दत्तक पत्र चोरी गेले आहे. मला १० दहा रुपये दे ह्मणजे आणून देतो. त्यावेळेला मी तुला गळ्यांतील पुतळी सोन्याची १ मासे ४ किंमत रुपये ८ व घरांतील कवेलू हजारदोन किंमत ८ रुपये असे दिले. मी दोन्ही डोळ्याची आंधळी असून मज बायको जातीला तूं थाप देऊन वरील सामान नेले. व दत्तक पत्र दिलें नाहीं. आतां तुझ्यावर माझा कोणत्याही प्रकारें भरंवसा नसून तुह्मी वर्तणूक वाईट आहे असें दिसून आलें. सदरहू नोटीस पावतांच चार दिवसाचे आंत तुं गहाणखत कर्जरोखे व रोख नगदी दीलेले रुपये १०० गळ्यांतील पुतळी १ सोन्याची वजन ४ मासे व कवेलू दोन हजार व तुह्मास लिहून दिलेले मुखत्यारपत्र असे सर्व आणून द्यावे. व माझी सही बांगडी करून घ्यावी, असे न करतां तुझ्यावर कोर्ट मार्फत दावा केला जाईल. नोटिसीचा खर्च व कोर्ट खर्च सर्व तुला द्यावा लागेल. तुला लिहून दिलेलें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. कळावें.

सही

भागाई मर्द जानूजी पाटील राहणार पातुर्डा ता० जळगांव जि० बुलढाणा नि० खु० बांगडी असे.

नो० नं० १९

### नोटीस

रा० गणपत वा॥ तुकाराम हांडे माळी राहणार देगांव तालुके बाळापूर

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे टाकळी खुरेशी तालुका बाळापूर येथील शेत सर्वेनंबर ४६ पैकीं ६ ची कबजेदारीण उमाई मर्द मानाजी हजाम ही होती. ती मरण पावल्यानें तीचा योग्य वारस मी असून तिनें मरतांना मला सदरहू शेत मिळणें बद्दल माझे नांवचें

मृत्युपत्र करून ठेवलें आहे. ह्या दोन्ही गोष्टीचें आधारें वरील शेताची मालकी पूर्णपणें मजकडे आली आहे. सदर्हु शेत तुह्मी बटाईनें केले आहे. तरी त्या शेतांत झालेलें उत्पन्न निम्मे एकद्वीतीयांश तुह्मी घेऊन निम्मे एक द्वितियांश उत्पन्न मला ही नोटीस पावले पासून ८ आठ दिवसाचे आंत पळशीबु० ता० खाम गांव येथें आणुन देऊन माझी पावती घ्यावी. असें न केल्यास तुमचेवर दावा करून या नोटिसींचे खर्चासह उत्पन्न भरून घेईन कळावें. ता० १३।१।१९१५ इसवी द० दामोदर लक्ष्मण कारेगांवकर

सही

झुमकाई मर्द सीताराम हजाम रा० पळशीबु० नि० खु० हातची बांगडी द० नोटीस लिहिणार

नो० नं० ६५ १२२

## नोटीस

नोटीस बेशमी पुंडलीक वल्द भगवान माळी रा. देवरी ता० आकोट अगर वरोळ ता० आकोट

यांसः—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं माझी सखी बहीण नामें जनीही तुमची लग्नाची बायको असून तिचे हल्लीं वय १८ वर्षांचें आहे. मी तिला २-३ वेळ तुमचे घरीं आणुन घातली परंतु तुह्मी वेडे असल्यानें तिला इतकी जबर मार हाण करितां कीं ती शेवटीं त्रासुन २ वेळ आमचे शेजारचें गांव पारसूळ येथें आली व तेथील चार संभावीत मंडळींनीं तिला माझे घरीं पोचाविलें. तुमच्या एकंदर वर्तनावरून तुमच्या मनांतून तिला वागवावयाचें नाहीं असें दिसतें. तुह्मी कोणताच धंदा करीत नसल्यानें स्वतःच्या पोटाचीच तुह्माला मारामार आहे अशा स्थितींत बायकोचा सांभळ करणें आणि त्यांत ही वेडाच्या अवस्थेंत सर्वथा अशक्य आहे हें आह्मी जाणतो. परंतु माझीस्थती तशी मुलीला कायम पोसण्याची नसल्यानें व ती तरुण असल्याने तिची मला कांहीं विल्हेवाट लावणें जरूर आहे. पांच वर्षें पर्यंत मी तिच्या पोषणाचा खर्च केला आहे. आतां मला या पुढें सामर्थ्य नाहीं हें तुह्मास कळावयास पाहिजे. होते तरी नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत मुलीस चांगले रितीनें वागविण्याबद्दल योग्य पंच जामिन देऊन तुह्मी स्वतः तिला आमचे येथून घेऊन जावे असे मुदतींत न केल्यास नोटीस हीच फारकती समजून मी तिचें कोणत्यातरी योग्य मनुष्या बरोबर गंधर्व लाऊन देईन व मग तसें करण्या बद्दल मजवर, माझे बहिणीवर अगर तिच्याशीं गंधर्व लावणारावर कोणत्यांच तऱ्हेची जबबदारी राहणार नाहीं. कळावे ता० १३-२-१९१५

सही.

तुकाराम बचु माळी राहणार झेसांग दस्तुर खुद.

नो. नं. ६६ १२३

## नोटीस

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं मौजे टाकळी खुराशी ता. बाळापूर येथील शेत सर्व्हे नंबर ४६६ ची कबजे दारीण उमाई मर्द मानाजी हजाम रा. देगांव ही होती. ती मरण पावलेमुळे तिची योग्य वारस ह्मणजे मुलगी मी आहे. शिवाय तीनें मरताना हें शेत मला मिळणेविषयीं माझे नांवानें मृत्युपत्र करून ठेवले आहे. या दोन्ही गोष्टीचे आधारे सदर्हु शेताची मालकी पूर्णपणे मजकडे आली आहे. तरी सदर्हु शेत ज्यास पट्यानें वहीतीकारितां करणे असेल त्यांनें मजकडे येऊन शेत वहीतीस करावे. दुसरे कोणाकडून माझे संमती शिवाय या शेता संबंधीं कोणताही व्यवहार केल्यास तो रद्द समजला जाऊन कायद्याविरुद्ध होउन दाव्यास पात्र होईल कळावे ता. १३ १ १५ इ. दस्तुर दामोदर लक्ष्मण कारेगावकर

सही.

झुमकाई मर्द सीताराम हजाम रा. पळशी बु ता खामगांव निशाणी खुद हातची बांगडी दस्तुर नोटीस लिहीणार

नो. नं. ६७ १२४

वऱ्हाडसमाचार

मिति फाल्गुन शुद्ध ८ शके १८३६

## हिंदुस्थानची महर्घता—२

मि. दत्त आणि त्यांचे सहकारी अधिकारी यानीं फार कसोशीनें आणि परिश्रमपूर्वक माहिती मिळवून ती व्यवस्थित रीतीनें रिपोर्टांत दाखल केल्याबद्दल योग्य ती प्रशंसा मागील अंकांत केलीच आहे, व या माहितीच्या आधारानें त्यांनीं काढलेला निष्कर्ष ही सारांशरूपानें गेल्या खेपेस दिला आहे. हा त्यांचा निष्कर्ष विचाराच्या व अनुभवाच्या कसोटीला लावून पाहणें हा या लेखाचा उद्देश आहे.

मि. दत्त यांचे इतर सिद्धान्त बाजूला ठेवून प्रथम प्रस्तुत महागाईच्या परिणामाविषयीं त्यांनीं केलेलें सामान्य अनुमान घेऊं. हें अनुमान असें आहे. मि. दत्त ह्मणतात कीं या महागाईमुळें थोड्या लोकांची हानि व पुष्कळांचा फायदा झालेला आहे. मि. दत्त यांचा सबंध रिपोर्ट आह्मी काळजीपूर्वक तपासून पाहिला, पण या त्यांच्या विधानाला पुष्टि देणारा असा पुरावा आह्मांला तरी कोठे आढळला नाहीं. महागाईमुळें नुकसान झालें आहे अशांची संख्या लहान आहे असें मि. दत्त यांस कां वाटावें? रोजच्या रोज मिळणाऱ्या मजुरीवर निर्वाह करणारे कामकरी, व गुलामगिरींत जन्म घालविणारे नोकर चाकर यांची संख्या हिंदुस्थानांत मोठी आहे. यांचा फायदा महागाईमुळें झाला आहे काय? शेतांत अहोरात्र खपून मिठ भाकर मिळवितो. तरी तींत समाधान मानणारे शेतकरी महागाईचें अभिनंदन करतांना कोणाला आढळला आहे काय? महागाईमुळें त्यांनीं पिकाविलेल्या धान्याला जर अधिक किंमत येऊन त्यांच्या हातांत अधिक रुपये खुळखुळूं लागले तर त्यांनीं अशा सुप्रसंगाचें अभिनंदन कां करूनये असें मि. दत्त विचारतील आणि जर ते करीत नसतील तर ते अडाणी किंवा खुळे आहेत असें ही कदाचित ते ह्मणतील. 'पण' जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे,' हे त्यावर उत्तर आहे. आज शेतकऱ्यांच्या हातांत धान्य विकून आलेले रुपये अधिक खुळखुळत आहेत, त्यांनीं त्या रुपयांवर घरेंदारें बांधलीं आहेत किंवा बायका मुलांच्या अंगावर डागदागिने चढविले आहेत अशी स्थिती त्यांना कोणत्या प्रांतांत आढळली आहे? कशी आढळेल? धान्याचे भाव चढल्यामुळें रुपयांच्या जमेंत वाढ झालेली दिसते खरी; पण त्याबरोबरच खर्चाच्या प्रत्येक रकमेंत वाढ झालेली नाहीं काय? गुराढोरांची वगैरे, मजुरांची मजुरी, कपडा लत्त्याची किंमत, वगैरे प्रत्येक खर्च उत्पन्नाच्या वाढीच्या प्रमाणा बाहेर वाढल्या मुळें लंकेतल्या सोन्याच्या विटां प्रमाणें जमाखर्चाची तोंडमिळवणी करतां करतां शेतकऱ्यांच्या नाकीं दम आलला दिसतो या ही गोष्टीचा मि. दत्त यांनीं विचार करावयास पाहिजे होता. सरकारी व रेलवे कंपन्यांचे नोकर यांचे हाल महागाईमुळें वाढले आहेत ही गोष्ट खुद्द सरकारी अधिकाऱ्यानींही कबूल केली आहे. जी सरकारी नोकरांची स्थिती तीच रेलवे कंपन्या व इतर खाजगी कारखान्यांतून काम करणाऱ्या नोकरांची स्थिती आहे सारांश, मजूर, शेतकरी, व नोकर यांचा तरी महागाईपासून फायदा झालेला नाहीं. यांची संख्या हिंदुस्थानच्या लोकसंख्येंतून वजा घातल्यावर बाकी किती संख्या राहणार ? पुष्कळ लोकांचा फायदा झालेला आहे असें मि. दत्त ह्मणतात ते याच बाकी राहिलेल्या लोकासंबंधानें असलें पाहिजे. आणि ही बाकीची संख्या एकंदर संख्येच्या मानानें शेकडा १० या प्रमाणांत सुद्धां खात्रीनें पडणार नाहीं. ही बाकाचा संख्यो ह्मणजे व्यापारी वर्ग. या वर्गांत मात्र धान्याचा साठा जवळ ठेवून मुद्दाम त्याचे भाव चढविणारे, व धान्याची निर्गत करून हिंदुस्थानांत धान्य दुर्मिळ करून सोडणारे असे कांहीं असतील. पण त्यांत ही बहुसंख्या विदेशी कंपन्यांचीच बहुधा आढळेल. तेव्हां मि. दत्त ह्मणतात त्याप्रमाणें जर कोणाचा फायदा या महागाईमुळें झाला असला तर तो कदाचित् या लोकांचा झाला असेल. कदाचित् ह्मणण्याचें कारण कीं त्यांचा तरी खरोखर फायदा झाला आहे कीं नाहीं या विषयीं आह्मी साशंकच आहो. प्रस्तुतची महर्घता ही मगवंताच्या विराटस्वरूपामुळें विश्वव्यापक असल्यामुळें तिची आच याही वर्गाला लागली असली पाहिजे. फरक इतकाच कीं इतर लोकाप्रमाणें ते तिनें होरपळून गेले नसतील. तेव्हां महागाईच्या या सामान्य परिणामाबद्दल मि. दत्त यांनीं जे शेवटीं गोडवे गाइले आहेत ते कशाच्या आधारावर ते त्यांनाच विचारलें पाहिजे.

आमच्या बहुतेक सगळ्याच लोकांची राहणी पाश्चात्यांच्या संसर्गामुळें थाटाची झाली आहे ही गोष्ट मि. दत्त यांचा गैरसमज होण्यास कारण झालेली दिसते. आमचा हा भपका पाहून विदेशी लोक फसतात, आणि हिंदुस्थानची भरभराट होत आहे असा त्यांचा गैरसमज होतो ही गोष्ट खरी आहे. पण मि. दत्त हे आमच्यांतलेच असल्यामुळें त्यांना अंत स्थिती चांगली ठाऊक असावयास पाहिजे. 'उपरसे तो खूप बनी, अंदरका राम जाने' अशी आमची खरोखर स्थिती आहे पूर्वींचा आमच्या वाडवडिलांचा पोषाख व हल्लींचा आमचा पोषाख यांच्यात जमीन अस्मानाचें अंतर पडलें आहे. चहा, सोडावाटर वगैरे पेयाचें सेवन करण्याची चटक अलीकडच्या लोकांना लागली आहे. शरीर दुर्बळ झाल्यामुळें व स्वस्त किंमतीची काष्टौषधींचीं औषधें आतां दुर्मिळ झाल्यामुळें उठल्या बसल्या डाक्तरांचे दवाखाने लोकांना पहावे लागत आहेत' या दवाखान्यांतलीं सगळीं औषधें परदेशी व महाग असल्यामुळें औषधाचा खर्च मनस्वी वाढला आहे. हा वाढता खर्च ज्या अर्थीं आमचे लोक करीत आहेत, त्या अर्थीं तो करण्याचें सामर्थ्य ही वाढलें असलें पाहिजे असा जर मि० दत्त यांचा ग्रह झाला असेल तर तो मात्र खास चुकीचा आहे असें आह्मी त्यांस निक्षून सांगतों. पूर्वींच्या लोकांची धनसंचयाकडे दृष्टि असे, व त्यांना निष्कारण व्यसनें लावून घेण्याची व उधळेपणानें राहण्याची संवय नसल्यामुळें त्यांच्या जवळ धनसंचय ही बरा असे. त्या वडिलोपार्जित धनसंचयावर अलीकडच्या पैकीं कित्येकांच्या गमजा चालल्या आहेत व कित्येक धनसंचयाविषयीं बेफिकीर आहेत. 'यावज्जीवेत् सुखं जीवेत्' अशी कांही दृष्टि ठेवून उद्याची फिकीर न ठेवण्याची विचित्र दृष्टि आमच्यांतल्या बहुतेकांची असल्यामुळें पूर्वी दरमहा २० रुपयाची प्राप्ति असलेल्या माणसा जवळ जेवढा धनसंचय असे तेवढा हल्लीं १०० रु. दरमहा मिळविणाराजवळ सुद्धां नसतो, ही अंदरकी बात लक्षांत न घेतां केवळ आमच्या पोषाखाच्या व एकंदर राहणीच्या भपक्याकडे पाहून मि. दत्त यांनीं आपला गैरसमज करून घेतलेला दिसतो. ही भपक्यानें राहण्याची पद्धति इंग्रजांच्या सहवासानें आमच्यातल्या वरिष्ठ प्रतीच्या वर्गानें प्रथम उचलली, मग मध्यम स्थितींतल्या वर्गानें तिचें अनुकरण केलें व होतां होतां ती आता दरिद्री लोकांपर्यंत जाऊन त्यांची कष्टमय दशा अधिक कष्टमय करून सोडीत आहे. तरी आमच्या लोकांचे डोळे उघडत नाहींत. हें पाहूनच कीं काय परमेश्वरानें हें महर्घतारूपी अंजन पाठविलें आहे. पण हे चरचरीत अंजन आहे, सुरम्यासारखें शीतल व आनंद दायक नेत्रसुखाची वृद्धि करणारें साधन नाहीं हें विसरतां कामा नये.

पाश्चात्य राष्ट्रांची सांपत्तिक स्थिति हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीच्या मानानें शेकडो पटीनें अधिक चांगली आहे ही गोष्ट लॉर्ड कर्झन पासून अगदीं खालच्या प्रतीच्या भूगोल संच्यारी लेखकापर्यंत प्रत्येकानें

कबूल केली आहे. शिवाय पाश्चात्य राष्ट्रांचें जीवन उद्योग धंद्यासारख्या निश्चित संपत्ति साधनाच्या उपायावर अवलंबून आहे, शेतकी सारख्या अनिश्चित उपायावर नाहीं. तेथील लोकांच्या हातांत सत्ता असल्यामुळें आपल्या देशास हिताहित वाटणारे कायदे व निर्बंध त्यांना करतां येतात. याही बाबतींत हिंदुस्थान देश पंगु आहे. असें असूनही सांप्रतची विश्वव्यापी महर्घता हा ईश्वरी प्रसाद मानणारे मि. दत्त यांच्या सारखे हरीचे लाल त्या देशांतून कोणी निघालेले दिसत नाहींत. आपल्या देशांत मात्र ते आहेत, त्या लोकांना ही महागाई राष्ट्रीय संकट वाटत आहे व तिच्या प्रतिकारार्थ त्यांचे यत्न चालले आहेत. धान्याची निर्गत कमी करीत आहेत, मजुरीचे दर वाढवून गरीब मजुरांची स्थिति कमी कष्टमय करण्याकडे आणि संप करून थोड्या लोकांतली संपत्ति पुष्कळांमध्यें वाटली जाईल असें करण्याकडे पाश्चात्यांची प्रवृत्ति आहे. आमच्या इकडे ही महागाई ईश्वरी प्रसाद समजणारे अधिकारी अशा प्रश्नाचा विचार करून सरकारला सल्ला देण्याच्या कामगिरीवर नेमिले जात आहे! तेव्हां हें आमचें दुर्दैवच म्हटलें पाहिजे!

## ऐतिहासिक माहितीचीं टांचणें.

आपल्या रोजच्या वाचनांत पुष्कळ वेळां अनेक विषयांसंबंधानें माहिती देणारीं लहान लहान वाक्यें येत असतात हीं वाक्यें संगृहित करून ठेवल्यास त्यां पासून इतिहासाचा शोध करणारास पुढें मागें पुष्कळ काम देण्याचा संभव असतो. आमच्या एका सुशिक्षीत मित्राला अशा वाक्यांचा संग्रह करण्याचा नाद लागल्यापासून त्याच्या जवळ अशा अनेक ऐतिहासिक चुटक्यांचा बराच मोठा संग्रह झालेला आहे. या टाचणां पैकीं कांहीं आमच्या वाचकांसाठीं वेळोवेळीं देण्याचें त्यानें उदार भावानें कबूल केलें आहे. या टाचणांचा पहिला हप्ता आज आम्ही मोठ्या आनंदानें प्रसिद्ध करीत आहों— संपादक

हल्लीं अंगाच्या स्वच्छतेसाठीं स्नानाचे वेळीं साबणाचा उपयोग करण्याचा प्रघात पडला आहे. हा प्रघात आम्ही इंग्रजांपासून उचलला आहे असें पुष्कळ वेळां उद्गार निघालेले आपण ऐकतों पण ही समजूत चुकीची दिसते. कित्येक शतकांपूर्वीं रचिलेल्या 'कामशास्त्र' नामक संस्कृत ग्रंथांत स्नानाचे वेळीं' फेनक' नामक पदार्थाचा उपयोग करावा असें सांगितलें आहे. हा फेनक म्हणजे साबणच असला पाहिजे. हा पदार्थ कसा असे व तो कशाचा करीत तें सांगता येत नाहीं. तरी पण त्याच्या नांवावरून व उपयोगावरून फेस उत्पन्न करणारा व स्वच्छतें साह्यभूत असा साबणासारखा कांहीं पदार्थ असला पाहिजे असे दिसत.

उत्तर हिंदुस्थानांत' क्लब' या अर्थानें 'गोठ' हा शब्द आज शेकडों वर्षें प्रचलित आहे.' गोठ' हा शब्द संस्कृत भाषेतल्या' गोष्ठी' या शब्दाचा अपभ्रंश उघड उघड दिसतो. दहापांच मित्र मंडळी एकत्र होऊन कोठें सहलें करण्यास निघाली कीं तिला गोठ म्हणतात. यावरून असें 'क्लब' पूर्वीच्या काळीं असत असें दिसतें.

एखाद्याच्या स्वतःच्या नांवानें हाक न मारतां त्याच्या लाड नावानें हाक मारण्याची चाल मुंबई, पुणें वगैरे प्रांतीं फार आहे. ही चाल इंग्रजापासून आलीं घेतली असें समजण्यांत येतें. पण भासकर्वाच्या काळीं सुद्धां अशी गोत्राच्या नांवानें परस्परांविषयीं बोलण्याची चाल होती असें अलीकडे प्रसिद्ध झालेल्या त्याच्या कित्येक ग्रंथावरून दिसतें.

तक्षशिला ही गांधार देशाची राजधानी होती. काशीनगरी हें संस्कृत विद्येचें अतिपुरातन पीठ म्हणून प्रसिद्ध आहे. पण काशीनगरी प्रसिद्धीस येण्याच्या पूर्वीं तक्षशिला हें विद्यापीठ होतें. चरक, कौटिल्य वगैरे सुप्रसिद्ध संस्कृत शास्त्रवेत्ते व लेखक तक्षशिला येथील विद्यापीठांतूनच तयार झालेले विद्यार्थी होते.

सुप्रसिद्ध शिकंदर बादशा हा (अलेक्झांडर) यानें तत्कालीं ज्ञात असलेलें सारें जग जिंकलें होतें व आता कांहीं जिंकण्यासारखें राहिलें नाहीं म्हणून तो रडला असें युरोपियन इतिहासकार लिहितात. पण या दिग्विजयी बादशहाची मगधदेशच्या लहानशा सैन्यानें एके प्रसंगीं कशी हबेलंडी उडवून दिली होती त्याचें वर्णन एका युरोपियन इतिहासकारानें दिलें आहे. मगधाच्या नंदराजाच्या सैन्यानें शिकंदराचा पराभव करून त्याला समरभूमिवरून पळून जावयास लाविलें व त्याठिकाणीं एक जयस्तंभ रोविला. हा जयस्तंभ त्या इतिहासकारानें स्वतः पाहिला होता, व संबंध स्तंभ पितळेचा होता. हल्लीं तो कोठें आहे तें कळत नाहीं.

## अमेरिकेशीं लढाईचा प्रसंग.

ग्रेट ब्रिटनच्या आसपासचा दर्या समरक्षेत्र समजला जाईल व त्यांत सापडणारीं जहाजें, मग तीं प्रतिपक्षाचीं असोत कीं तटस्त राष्ट्राचीं असोत, त्यांचा सत्यानास करण्यांत येईल अशा अर्थाचें एक जाहिरपत्रक जर्मन बादशहानें काढल्यामुळें अमेरिकन लोकाना मोठी चीड आली आहे, हें मागें एका अंकांत आम्ही कळविलेंच आहे. आतां असें कळतें कीं हालंड, स्वीडन, नॉर्वे वगैरे इतर तटस्थ राष्ट्रांनीं ही या जाहिरनाम्याविषयीं आक्षेप घेणारे खलिते जर्मनीकडे पाठविले आहेत. अमेरिकेचे प्रेसिडेंट डॉ० विल्सन यांनीं पाठविलेल्या खलित्याचा सारांश तारेनें आला आहे त्यावरून अमेरिकन लोक जर्मनीची ही गुरकावणी मुकाट्यानें गिळून बसतील असें दिसत नाहीं. त्याच्या खलित्याची भाषा कोठें ही शिष्टाचाराला सोडून नाहीं, तथापि हा अपमान गिळून स्वस्थ न बसण्याचा आपला कृतनिश्चय अमेरिकेनें त्यांत स्पष्टपणें व्यक्त केला आहे. जर्मनीनें निवळ दुराग्रहपिशाच्चाचे केल्या अंकित होऊन अर्ध्या जगाला समरभूमीवर खेचिलें आहे. आता राहिलेलें अर्धें जगही समरांगणावर आणण्याची त्याची इच्छा आहे कीं काय तें कळत नाहीं. सध्याच्या युद्धामुळें केसरनें आपल्या देशावर ओढून आणिलेल्या संकटपरंपरेला जर्मन लोक कंटाळले आहेत व तशांत युद्धक्षेत्राच्या पूर्व व पश्चिम या दोन्ही बाजूंना जर्मनीची फजीती उडाली आहे. ती झाकण्याकरितां व पडलों तरी आपण मिशांना पीळ भरीतच आहों हें दाखविण्याकरिताच केसरनें हा जाहिरनामा काढला असला पाहिजे. कारण, अमेरिकेशीं युद्धप्रसंग आल्यास काय परिणाम होतील याची जाणीव नसण्या इतका मूर्खपणा किंवा अविचारीपणा केसरच्या अंगीं खास नसेल. अमेरिकेच्या या बाणेदार खलित्याला जर्मनीकडून काय उत्तर जातें तें पाहण्याकडे सार्‍या जगाची दृष्टी लागून राहिली आहे. बहुधा जर्मनी खालीं नांगी टाकील असा रंग दिसतो.

## ऑफस!

जर्मनीच्या जोरावर तुर्कस्थाननें ईजिप्तवर स्वारी करून सुएझच्या कालव्यापर्यंत तर सैन्य आणून पोंचविलें. पण तेथें झालेल्या एक दोन चकमकींतच कच खाल्यापासून त्याला आपल्या बळाचा खरा अंदाज होऊन चुकला व तुर्की सैन्यानें आतां तेथून पळकाढला असल्याची खबर आली आहे. सुएजचा कालवा हस्तगत करून ईजिप्त दश पादाक्रांत केल्यावर हळूं हळूं इराण, अफगाणिस्थानातून हिंदुस्थानकडे मोर्चा फिरवावयाचा असें मनोराज्य तुर्कस्थान करीत होता, पण हें मनोराज्य इंग्रजांच्या तोफांच्या गर्जनेनें पार वितळून लयास गेलें व तोबा तोबा करीत तुर्कांना सैरावैरा पळत सुटण्याचा प्रसंग आला!

## बालबोधाचा अस्त.

आज चौतीस वर्षें ज्यानें महाराष्ट्रीय बालवाचकांना व तरुणांना सुविचारामृत सतत पाजलें त्या बालबोध मासिकाचा त्याच्या जनकाच्या मागें सार्‍या तीन महिन्यांत अस्त व्हावा ही अत्यंत शोचनीय गोष्ट आहे. महाराष्ट्र वाङ्मयाची ही हानी आहे येवढेंच नाहीं, तर विद्यमान महाराष्ट्रलेखकांना तें एक लांछन आहे. कारण, बालबोधाचे प्रकाशक व निर्णयसागर छापखान्याचे मालक रा. तुकाराम जावजी शेट हे फेब्रुवारीच्या अंकाच्या शेवटीं बालबोधाच्या अखेरच्या अंकांत लिहितात कीं रा. ओकांच्या इतक्या " सरळ, नमस्त, व सफाईदार लेखणीनें नियमितपणें बालबोध चालविणें आम्हांस अशक्य झालें आहे.' परलोकवासी रा. ओक यांच्यांतल्या सारखी डेमी द्वादशपत्री आकाराचीं दरमहा २४ पृष्ठें भरतील इतके लेख सुद्धां लिहिण्याची धमक हल्लींच्या कोणा लेखकांत नाहीं हा त्याचा उघड उघड अर्थ आहे. आम्हांला तरं ही रा. तुकाराम शेटजीची निवळ धृष्टता दिसते. त्यांना रा. ओकांच्या मागें बालबोध चालवावयाचा नव्हता, तर त्यांनीं ही भलतीच सबब पुढें आणण्याचें कारण नव्हतें. पण आतां जातां मराठी लेखकांवर जो शिंतोडा उडविला आहे तो अगदीं निष्कारण आहे. बालबोध बंद करण्याचा मनाचा निश्चय करण्यापूर्वीं त्यांनीं सदर पुस्तकाचें संपादकत्व घेण्यास कोणी कबूल आहे कीं नाहीं याची चौकशी केली होती काय? आमची खात्री आहे कीं रा. ओक यांनीं घातलेलें ज्ञानसत्र त्यांच्या मागें तसेंच चालविण्यास पूर्णपणें समर्थ अशा लेखकांची वाण पडण्याइतकें दैन्य महाराष्ट्राला खास आलेलें नाहीं. महाराष्ट्र वाङ्मयाशीं निकट परिचय असलेल्या चार दोन विद्वान गृहस्थांची सल्ला त्यांनीं विचारली असती तर त्यांनीं अशा योग्य संपादकांचीं एक दोन नावें तरी खास सुचविलीं असतीं. अस्तु, बालबोध पुढें चालविण्याचें रा. तुकाराम शेटजींनीं नाकारिलें तरी महाराष्ट्रीय तरुणांना सुविचारामृत पाजण्याचें पुण्यव्रत उचलण्यास दुसरे कोणी प्रकाशक पुढें येतील अशी आम्हांस अद्याप आशा आहे.

## समेटासाठीं भांडण.

गेल्या डिसेंबरांत मद्रास येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या बैठकींत मवाळ आणि जहाल या दोन्ही पक्षामध्यें समेट होण्याचें कार्य एकदम घडून न येतां एकवर्ष लांबणीवर कां पडलें याविषयीं नवे नवे गमतीचे किंबहुना अत्यंत शोचनीय प्रकार उघडकीस येऊन दोन्ही पक्षांच्या पुढाऱ्यांकडून वर्तमानपत्रांतून वाग्युद्ध सुरू झालें आहे. अगदीं थोडक्यात या युद्धाची हकीकत अशी आहे मद्रासची राष्ट्रीय सभेची बैठक होण्यापूर्वीं काँग्रेसकमिटीकडून मि. सुब्राव हे पुण्यास दोन्ही पक्षांच्या पुढाऱ्यांस भेटण्यासाठीं गेले होते. त्यांनीं रा. टिळक यांची मुलाखत घेऊन त्यांचें सगळें म्हणणें ऐकून घेतलें, व तिन्हाईत परत आल्यावर तें रा. गोखले यांस सांगितलें. त्यांत विशेषतः ही एक गोष्ट मुख्य होती कीं राष्ट्रीय सभेंत आपला प्रवेश झाल्यावर आपण जहाल पक्षाच्या उद्देशाप्रमाणें काँग्रेसच्या कार्यसाधनाच्या पद्धतींत क्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न करूं असें रा. टिळक यांनीं रा. सुब्राव यांस स्पष्टपणें कळविलें होतें व गेल्या ८।१० वर्षांच्या अनुभवावरून ही गोष्ट घडून आल्यास राष्ट्रीय सभेनें आजपर्यंत केलेल्या कार्याची माती होईल असें वाटून समेटाविषयीं मि. सुब्राव हे निराश होऊन मद्रासला परत गेले. इकडे ना. भूपेंद्रनाथ बसु व ना. गोखले यांचा या च विषयासंबंधानें कांहीं पत्रव्यवहार चालला असतां ना. गोखले यांनीं मि. सुब्राव यांनीं सांगितलेल्या माहितीच्या आधारावर ना. बसु यांस लिहिलेल्या खासगी पत्रांत असे उद्गार काढले कीं समेट व्हावा अशी आपली अत्यंत इच्छा आहे खरी, पण रा. टिळक म्हणतात त्याप्रमाणें त्यांचा राष्ट्रीय सभेच्या कार्यपद्धतींत क्रांति घडवून आणण्याचा उद्देश असेल तर समेट न घडलेलाच बरा, व हे लिहितांना जहाल पक्षाचें उद्दिष्ट व त्यांच्या पद्धति यांच्या संबंधानें थोडासा खुलासाही त्यांनीं त्या पत्रांत केला होता. त्यांत रा. टिळक हे सरकारवर बहिष्कार घालावा असें म्हणणार आहेत अशा अर्थाचें एक वाक्य होतें. पुढें मद्रासेस सबजेक्टस कमिटीपुढें समेटाच्या प्रश्नाची चर्चा चालली असताना सदर प्रश्नावर प्रकाश पडावा या शुद्ध हेतूनें ना. बसु यांनीं सदर पत्राचा व त्यातल्या सरकारच्या बहिष्काराबद्दलच्या

बाऱ्याचा उल्लेख केला. तेव्हां सगळी मंडळी चपापली, आणि ही गोष्ट तडकाफडकी निकालास न आणतां योग्य विचारासाठीं वर्षभर पुढें ढकलावी असें तिनें ठरविलें. इकडे ना. बसु यांच्या पत्रांत म्हटल्याप्रमाणें खरोखरच तुम्ही बहिष्कार वादी आहां काय? असें मिसेस बिझांटबाईंनीं तारेनें रा० टिळक यांस विचारलें असतां मी सरकारवर बहिष्कार घालण्याचा उपदेश केव्हांही केला नाहीं असा साफ जबाब रा० टिळक यांनीं दिला. हा जबाब येण्याचे पूर्वीच राष्ट्रीय सभेंत सभेसंबंधीचा ठराव घेऊन तो विचारासाठीं वर्षभर तहकूब ठेवण्यांत आला होता. झालेल्या या प्रकाराबद्दल मिसेस बिझांट, मि० सुब्राव, व मि० गोखले यानीं आपापलें म्हणणें जाहीर केलें आहे. त्यांत समेट न घडल्याचा सगळा दोष अर्थात रा० टिळक यांच्यावर टाकण्यांत आला आहे. हल्लींची कांग्रेसची कार्यपद्धति रा० टिळक यांस पसंत नसून तींत ते क्रांति घडवून आणण्यास इच्छित आहेत व सुरत कांग्रेसच्या वेळच्या त्यांच्या लेखावरून व भाषणांवरून त्यांच्या पद्धती कोणत्या तें सर्वांना कळतें व त्यामुळें समेटाची आशा आतां बहुतेक नष्ट झाली आहे असें यांस वाटत आहे. उलटपक्षीं रा० टिळक यांनीं ही आपलें म्हणणें वर्तमानपत्रांतून जाहिर केलें आहे व त्यात ते सगळा दोष ना. गोखले व मुंबईचे मेथाप्रभृति मंडळी यांचेवर टाकीत आहेत. त्यांचें म्हणणें कीं प्रस्तुत युद्धाचे वेळीं लोकांना सरकाराशीं सहकारिता ठेवावी असा उपदेश आपण केला असतां रा० गोखल्यांनीं आपणास बहिष्कारवादी म्हणवें हां आपली बदनामी आहे व त्याबद्दल त्यानीं आपली क्षमा मागितलीच पाहिजे समेट घडून यावा अशी आपली इच्छा होती असें रा० गोखले यांचें म्हणणें आहे, पण त्यानींच सगळा घात करून समेटाचा न्यूज हातळला व मि० सुब्राव यांची समेटाविषयींची निराशा होण्याचें कारण ते मुंबईस गेले होते तेव्हां मेथा प्रभृति पुढाऱ्यानीं त्यांचें मन आपणाविषयीं कलुषित करून ठेवलें हें होय. या वादासंबंधानें पुढील महत्वाच्या मुद्यांचा निकाल लागेल तरच हा वाद मिटेल. ते मुद्दे येणें प्रमाणें—

१ रा० टिळक यांनीं सरकारवर बहिष्कार घालण्याचा उपदेश कधींच केला नाहीं ही गोष्ट खरी आहे काय?

२ पूर्वीं जरी केला असला, तरी आज त्यांचें मत खरोखर पालटलें असून ते सरकाराशीं सहकारित्व ठेऊन राष्ट्रीय सभेचे मूळ उद्देश तिच्या आजपर्यंत ठरलेल्या पद्धतीनें साधण्यास तयार आहेत काय?

या दोन्ही मुद्यावर रा० टिळक यांचे कडून 'हो' कारयीं उत्तर आल्यास आजच समेट घडून येण्यास कांहीं हरकत नाहीं. पण निषेधार्थी उत्तर आल्यास पुढील मुद्दे निघतात. ते हे—

१ ज्या पद्धतीनें राष्ट्रीय सभेच्या कामांत आपण क्रांति घडवून आणूं असें रा० टिळक म्हणतात त्या पद्धति कोणत्या?

२ त्या पद्धतींत सरकारवर बहिष्कार ही एक पद्धति आहे काय?

३ ही बहिष्कारपद्धति हल्लींच्या स्थितींत राष्ट्रसभेच्या उद्देशसाधनास कितपत अवश्य किंवा हितकारक आहे?

४ व तिला दोन्हीपक्षांकडून मान्यता मिळण्याचा कितीसा संभव आहे?

५ मेथा; गोखले प्रभृति मंडळी ज्यांनीं या बहिष्काराविषयीं उघड उघड प्रातिकूलता दाखविली आहे ती मंडळी रा० टिळक यांच्या या क्रांतीनें रुष्ट होऊन कांग्रेसमधून अंग काढून घेणार नाहीं काय?

६ त्यानीं अंग काढून घेतल्यावर बाकीची कांग्रेस एकपक्षीय होणार नाहीं काय? मग समेट केल्याचा काय उपयोग होणार?

७ सरकाराशीं अशा तऱ्हेचे विरोधी वर्तन ठेवून कांग्रेसचे स्वराज्य साधनाचे उद्देश सफळ होतील असें रा. टिळक यांस वाटत आहे काय?

८ मी बहिष्कारवादी नाहीं या रा. टिळकांच्या म्हणण्याचा व मी राष्ट्रीय सभेच्या कार्य पद्धतींत क्राती घडवून आणीन या म्हणण्याचा मेळ कसा घालावयाचा?

९ या प्रश्नाच्या समाधान कारक निकालावर समेटाचा प्रश्न सर्वथा अवलंबून आहे व तो निकाल लागल्या शिवाय समेट घडून आला, तरी तो कच्च्या पायावर उभारलेल्या इमारती प्रमाणें अल्पायुष होणार हें उघड आहे.

---

## दिव्य पुरुष .

### ( अजरामर गोखले )

महाराष्ट्राचाच काय पण सर्व हिंदी राष्ट्राचा कोहिनूर हिरा हरपला किंवा काळाच्या गर्तेत पडला हें कळविण्यास अत्यंत दुःख वाटतें. नामदार गोपाळ कृष्ण गोखले बी. ए. सी. आय. ई. हे गेल्या शनिवारीं पहाटेस पुणें मुक्कामीं स्वर्गस्थ झाले. ही बातमी परवा सायंकाळीं तारेनें कळली. त्या बरोबर एक राजकीय वातावरणांतील साधुसंत आपणांस सोडून गेला किंवा या दुर्बल शरीर यष्टीनें हिंदी राष्ट्राचें राजकीय ध्येय लवकर संपादतां येत नाहीं म्हणून त्या थोर सत्पुरुषानें उच्चतम कोटींतल्या देवांचाच फक्त अंगिकार केला आहे. कैलासवासी न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांच्या विचारांनीं हिंदी राष्ट्राला जोमदार प्रगती दिली होती त्या विचारांना राजकीय बाबतींत मूर्त स्वरूप देण्याचें पुण्यकार्य नामदार गोखले यानीं दिव्य दृष्टीनें पत्करिलें. आणि गेल्यावीस वर्षांच्या अवधींत त्यांनीं पुष्कळशा गोष्टी कार्याच्या क्षेत्रांत आणून सोडल्या किंबहुना त्यांच्या चरित्राचा उत्तरार्ध हिंदी राष्ट्राचा इतिहासच बनवीत होता असे वाटे. वादविवादाचीं रत्नें यांनीं पुष्कळ निर्माण केलीं आहेत. त्यांच्या वाणीमध्ये जो विलक्षण मधुरिमा व मोहक वक्तृत्व असे त्यामुळें त्यांचे परिपक्व अनुभव व विचार सरकारलाच काय पण त्यांच्या कट्ट्या शत्रूनांही माना डोलविण्यास लावीत राजकीय कार्य अंगावर घेण्यापूर्वीं त्यांनीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें फार नामी कामगिरी बजावेली आहे तेथून स्वतंत्र विचारांच्या स्फूर्तीनीं हा वीर राष्ट्राच्या मैदानावर उभा राहिला आणि त्यांना यशश्रीनें जी माळ घातली तशी फार थोड्यांच्याच वाट्यास आली असेल. नामदार गोखले हे उत्तम मुत्सद्दी व करारी मंत्री आहेत असा गौरव विलायत सरकार ही यांचा करीत असत. पुण्याची सर्व्हेंटस आफ इंडिया सोसायटीची संस्था त्यांचे चिरंतन स्मारक होय. व्हाइसरायांच्या कायदे कौसिलांत तर नामदार गोखल्यांचा शब्द बहुमोल मनीत असत. प्राथमिक शिक्षणाचे दरवाजे सर्वत्र खुले ठेवण्यासाठीं तर त्यांनीं आपली पराकाष्ठा केली अलीकडे २।१ वर्षें कांहींना कांहीं तरी आजारामुळें त्यांचें शरीर त्यांच्या कार्याला मदत करीत नसे. तरी असा हा परिचयांतला थोर पुरुषाचा चेहरा अदृश्य झाला म्हणून सर्व राष्ट्र हळहळत आहे तथापि या थोर सत्पुरुषाचा आत्मा आपले हिंदी राष्ट्राचें कार्य सिद्धीस नेण्यासाठीं विद्यमान राजकीय मंडळीस आपल्या विचारांनीं व उत्तम शासनांनीं नकळत निरनिराळे धक्के देईल असें त्यांचें जीवनामृतच सांगत आहे. पत्नाशाच्या सुमाराला अशलीं मोठीं माणसें हा लोक सोडतात तेव्हां हें राष्ट्राचें दुर्भाग्यच होय पण असें म्हणून हताश होण्यापेक्षां आपल्या चिरंतन मार्गांतील पुरुषांकडे हा मृत्यु जणू निशाण दाखवीत आहे हें विसरतां कामा नये. ईश्वर नामदारांस सद्गति देवो असें म्हणण्यापेक्षा ते आपल्या स्वर्लोकावरून ही राष्ट्र नौका पैल तीराला नेवोत.

---

## व-हाडवृत्त

**हवामान**—थंडी व उष्णता यांच्यामध्यें लढाई चालली असून कधीं एकाचा व कधी दुसरीचा विजय असतो पण अशा क्रमाक्रमानें साम्राज्य पद उष्ण कालाकडे येत चाललें आहे. रोगराई नसून आरोग्याची अभिवृद्धि दिसत आहे.

**अबकारी हराश**—मदतखोर, व्यसनी व दारूबाज लोकांप्रमाणेंच मक्तेदारांची ही पैंमे दोन तीन दिवस हराशांत दिसून येईल. त्यांच्या मधील स्पर्धा व कलह हे सरकारी खजीन्यांत पैसा ओतणारे नळ आहेत. या जिल्ह्याचे अबकारी हराश आज पासून सुरू होणार आहे. लढाईमुळें हें उत्पन्न कदाचित कमी होईल तर कोणजाणे.

**वगरटेडिंग** कंपनीचा संवत १९७० चा अहवाल प्रसिद्ध झाला आहे आणि तारीख २१ फेब्रुवारी रोजी कंपनीची वार्षिक सभा भरावयाची आहे. सध्याच्या रिपोर्टा वरून २५ रुपयाच्या शेअरमागें ११ रुपया नफा वाटण्याचा अंदाज दिसतो.

श्री अकोला मिल इंडिया स्पिनिंग विव्हींग कंपनीची एक विशेष सभा मुंबईस २६ फेब्रुवारीस भरावयाची आहे. कंपनीचा कारभार आकोल्यास चालतो आणि तिच्या सभा मात्र मुंबईस चालतात. त्या मुंबईच्या ऐवजीं जिल्ह्यांत भरल्या तरी भागीदारांचें कल्याण साधेल कदाचित् अधिक होईल.

मध्यप्रांत व वऱ्हाड यांच्या वारफंडाची रकम गेल्या जानेवारी अखेर १०४४९४१ रुपये २ आणे ७ पै जमली आहे. वर्गणीच्या आकड्याच्या मानानें २२ जिल्ह्यांची प्रतवारी लावतां रायपूर, नागपूर व बुलढाणा इ. जिल्हे अग्रस्थानीं आहेत, रायपूर जिल्ह्यांत संस्थानिकांचा समावेश होतो तेव्हां तो वजा करतां नागपूरच्या तोडीला आमच्या वऱ्हाडचा बुलढाणा जिल्हा आला आहे ही विशेष आनंदाची गोष्ट होय.

**सुट्टी**— येत्या सोमवारीं हुताशनीचा महोत्सव असून त्यानंतर या सप्तकांत रंग पंचमीचा ही सण आहे. त्यानिमित्त सालाबादच्या नियमा प्रमाणें ता. १ मार्च १९१६ चा वऱ्हाड समाचारचा अंक प्रसिद्ध होणार नाहीं.

---

## नोटीस

शेट मदनगोपाळ शेवाराम रा० तेल्हारा ता० आकोट मदनगोपाळ दुकान तेल्हारा या दुकानचे मालक

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं, आमचे अशील रामधन गोवर्धनदास रा० तेल्हारा यांस तुम्ही हुंड्या नग ३" पैकीं एक ८०० आठसें रुपयांची, दुसरी ८९० ची व तिसरी १६०० ची" आमचे अशीलाचे नावच्या तुम्ही आपलेवर मिति आश्विन शु० १ संवत १९७० का म्हणजे ता० २०।९ १९१४ ईसवी रोजी लिहून दिल्या. सदरहु हुंड्याची मुदत पुरी झाल्यावर तुमचेकडे त्याचे रकमेची मागणी आमचे अशीलांनी बरेचवेळां केली. परंतु तुम्ही चाळवा चाळव दाखवून अजून पर्यंत हुंड्याची फेड केली नाहीं. सबब तुम्हास ह्या नोटिसीनें कळविण्यांत येत आहे कीं, सदरहु हुंड्यावरून आमचे अशीलास येणें असलेली रकम ही नोटीस प्रसीद्ध झाल्यापासून आठ दिवसाचे आंत तुम्ही अदा करून द्यावीत. त्याप्रमाणें तुमचे कडून न झाल्यास आमचे अशीलास तुमचेवर कोर्टांत दावा करणें भाग पडेल. त्या बद्दल होणाऱ्या सर्व खर्चा बद्दल व ह्या नोटीसीचे खर्चाबद्दल तुम्ही जबाबदार राहाल कळावें. अकोला ता० २०।२।१६

आपला

विनायक कृष्ण रानवाडे वकील

रामधन गोवर्धनदास तर्फें.

नो० नं० ७७

## नोटीस

नोटीस बेशमी लक्ष्मण वा। पांडु तेली राहणार कनबे जैपूर ता. मलकापूर यांस.

नोटीस देणार मानकाई मर्द लक्ष्मण. तेली राहणार जयपूर ता. मलकापूर नोटीस देण्यात येतें कीं मी तुमची लग्नाची बायको आहे मी तुमचे येथें लग्न झाल्यापासून राहिले परंतु आतां हल्लीं ९ वर्षांपासून तुम्ही मला वागवीत नाहीं व खावयाप्यावयास देत नाहीं मी कर्ज काढून खाऊन राहीले आहे. वरून मी तुम्हास फारकती मागितली असतां देत नाहीं तेव्हां आतां मी असें तळगत किती दिवस राहावे. तरी आतां या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत माझा निकाल करावा म्हणजे फारकती द्यावी नाहींतर मी हीच फारकत समजून गंधर्वाचा दुसरा नवरा करीन मग तुमचा नवरेपणाचा कोणत्याच प्रकारचा हक्क राहणार नाहीं ही नोटीस दिली आहे कळावे ता. १०-२-१५ इ.
द. खुशाल यदु तेली राहणार जैपूर द. खु.

सही

मानकाई मर्द लक्ष्मण तेली राहणार जैपूर ता. मलकापूर नि. खु. बागई दस्तुर खताळ येडु तेली राहणार जैपूर

नो. नं. ७०

## नोटीस

खालीं सही करणार यांजकडून नारायण वा। हरी जात कुणबी रा० पळसो ता० व जिल्हा आकोला

यांस

नोटीस देण्यांत येते कीं तुम्हास दिवाणी कोर्टाचे कामा संबंधानें साहासात महिन्यापासून कुलमुखत्यारपत्र दिले होतें परंतु तुम्ही आमचे म्हणण्याप्रमाणें ऐकत नाहीं सबब या नोटीसीद्वारे तुम्हास दिलेले कुलमुखत्यारपत्र रद्द केलें आहे तूं हल्लीं माझे संबंधानें कोणताही व्यवहार मुळींच करूं नये ही नोटीस दिली तारीख १८।२।१५

सही

विठुजी राणोजी सरटे राहणार सिरसगाव नि. रेघ

नो० नं० ७१

## नोटीस

रा०रा० देव किसन ऐदान मारवाडी राहणार आकोले यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येते कीं आकोले मे. थर्ड अ. डि. ज्जसा० यांचे कोर्टात इनसालव्हन्सी नंबर १६९-१३ चे काम तुमचे विरुद्ध रामधन गंभिरराम व मोतीलाल बनसीलाल आकोले यांनीं काम चालविले होते त्या कामात खालीं सही करणार यांस कोर्टानें रिसीव्हर नेमलें होते. तो अर्जदाराचा अर्ज कोर्टानें नामंजूर केला आहे. सबब रिसीव्हर नात्यानें तुमचे घर व कोठा व घरांतील जंगममाल वगैरे जो विकला तो वजा जाता बाकी तुमचे ताब्यांत देण्या विषयीं आम्हास कोर्टानें हुकूम दिला आहे तरी कोर्टात ३।११।१३ पासून तुमचा हिशेब आम्ही दाखल केला आहे तो तपासून पाहून तुमची शिल्लक रकम व घर व कोठा व जंगम माल तुम्ही आपले ताब्यात घ्यावा अगर तुमचे तर्फे कोणी लायख मनुष्य पाठऊन हिशेब पाहून घेऊन शिल्लक व स्थावर जंगम ही नोटीस पावल्या पासून २० वीस दिवसाचे आत आपले ताब्यांत घेऊन आम्हास पावती द्यावी जर वर प्रमाणें मुदतींत तुम्ही अगर तुमचा खात्रीचा मनुष्य न आल्यास कोर्टात दाखल केले हिशेब बरोबर आहेत असे धरून तुमचा स्थावर माल व घरांतील जंगम माल आम्ही कोर्टाचे कबजांत देऊ कळवे ता. १९।२।१५ सही

लक्ष्मण गोविंद ओक वकील रिसीव्हर आकोले (वऱ्हाड)

नो० नं० ७२

## नोटीस

चि. ग. रा. अबदुल गनी वल्लद गफूर रा. मूर्तिजापूर यांस —

या लेखानें कळविण्यांत येतें कीं तुम्ही आमच्या इच्छाविरुद्ध वागतां तुम्ही आमच्याशीं भांडणाऱ्या व मला नको असलेल्या लोकांशीं सलगी ठेवतां आणि इतके दिवस तुम्ही मला न विचारतां वेगळे राहून आतां पुन्हां जबरदस्तीनें घरीं येऊन राहिलां आहां ही गोष्ट तुम्ही माझ्या भावाच्या लबाडांच्या सल्ल्यानें केली आहे. तुमच्यावर माझा आतां विश्वास राहिला नाहीं व तुमच्या पासून माझ्या जीवाला केव्हां आणि कसा धोका पोहचेल याबद्दल नेम वाटत नाहीं. मग माझ्या हातानें भाकरतुकडा करून गुजरण करावी लागत आहे. घरीं न येण्याविषयीं तोंडीं ताकीद दिली होती. तरी ती न जुमानतां तुम्ही मोगलाई मानविली आहे. तरी तुम्हास या जाहीरलेखानें घरीं येण्याविषयीं मनाईचा हुकूम देत आहे. तुम्ही सुखानें घराच्या बाहेर न निघाल तर हात धरून हाकलून दिलें जाईल. ही नोटीस पोहचल्यापासून सहा महिने तुम्हास मुदत देतों. तेवढ्या मुदतींत तुम्ही वेगळे राहून चांगल्या वर्तणुकीबद्दल माझी खातरी करून द्यावी. असें करण्यास चुकाल तर तुम्हास बेवारस करण्यासाठीं जरूर ते कागदपत्र मी करणार आणि मग तुम्ही पस्तावु लागल्यास माझा काहीं इलाज रहाणार नाहीं ही नोटीस पोहचल्यानंतर जर तुम्ही घरात तसेच रहाल तर तुम्हावर फौजदारी करण्यांत येईल. कळावे ता. १८ २ १९१५

सही.

(सही उर्दूत) अबदूल गफूर वा। शेखचांद

नो० नं० ७३

## नोटीस

सितागम रंगय्या तेलंगी शिंपी रा० आकोला मंगळवारा यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येते कीं तुम्ही माझे मालकीचे मंगळवाऱ्यांतील घरांत शेवटचे खोलींत १॥ रुपया भाड्यानें राहत आहां ह्या घराचें भाडें सरासरी तीन वर्षापासून दिलें नाहीं. व बरेच वेळ खालीं करण्यास मागतां घर खालीं केले नाहीं वरून नोटीस दिली आहे शिवाय आमचे दुसरे भाडेकरी लोकांशी तंटे करता व त्यांचे पायखाने ही बंद करतां. असे नानाप्रकारचे उपद्रव तुम्ही मांडले वरून तुम्हावर फौ० मु० चालू केला आहे तरी या नोटीशीनें तुम्हांस व सर्वांना जाहीर करितो कीं कोणी ही ते घर गहाण अगर विक्री घेऊं नये. घेतल्यास जबाबदारी आम्हावर नाहीं ही नोटीस दिली ता. १८-२-१५

सही

गोविंद गणेश मुनसी

नो० नं० ७४

## नोटीस

नोटीस बेशमी गंगी मर्द सदाशिवनाथ हल्लीं रहाते बाप म्हादूनाथ रा० सेगांव याचे घरीं. यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येथें कीं तूं माझी लग्नाची बायको असून लग्न झाल्यावर व वयात आल्यावर ही माझे घरीं चांगल्या रितीनें वागलीस हुशार झाल्यावर तुझे बापाचे सल्लेने मला त्रास देणें सुरू केलें म्हणजे एक वेळ मला जाळून मारण्याचा प्रयत्न केला त्याचप्रमाणें माझे आईमही जाळले व तीन चार वेळ पळून गेलीस. फंद फितुर करून मजवर अन्नवस्त्राचा दावा बि० सब डिव्हीजनल माजिस्ट्रेट साहेब बहादूर खामगांव यांचे कोर्टात केला. चौकशीअंती तूं लबाड ठरून साहेब बहादुरांनीं तुला माझे हवाली केलें त्यास अजून दोन महिनेही झाले नाहींत तोंच पुन्हा त्रास देणें सुरू केलें. मी घरीं नसतां माझेघरांतील पंचावन रुपये घेऊन पळाली मी तालवतोब तुझे बापाकडेस शेगावी गेलो, त्यानें माझेशी साम्योपचाराचे भाषण न करितां म्हटले कीं मेली दिली होती आणि आतां जिवंत विचारितो पुढें बातमी लागली कीं माझा भाऊबंद उपचे माझेशीं वांकडे आहे त्याचे घरीं सांगळी येथें तिनचार दिवस होतीस, शिवाय गेल्या शेगांवचे बाजारचे दिवशीं बाजारांत एक महार तुझा भाऊ व बाप हाती काठ्या घेऊन मला पाहत फिरत होते व लोकांस सांगत कीं सदुस म्हणा कीं आता हुशार रहा वरून वाटते कीं अजूनही माझे घाताचा तूं प्रयत्न करित आहेस अशा दुष्कृत्यानें तुझी फजिती होईल. तुला जर माझेशीं संसार करणे असेल तर घरांतून काढून नेलेले पंचावन रुपये घेऊन चार वयोवृद्ध भले माणसांबरोबर माझे घरीं ये नाहींतर कायद्याप्रमाणें तुझा रस्त्यावर येण्याची तजवीज करीन ता. २९ १-१५

सही

सदाशिव बालनाथ रा. जानोरी द० खुद्द हल्लीं खामगांव येथें गणपत गोरक्ष नाथ यांचें घरीं.

नो. नं. ७५

## नोटीस

रा० रा० सदाराम रामगोपाळ दुकान माळेगांव

यांस

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे व आमचे मध्यें मौजे शेरी प्रगणें वडनेर ता० आकोट येथील शेत सर्वे नंबर २९ चे संबंधानीं तंटा चालु होता त्याचा तुम्ही आपसांत निकाल करून सदरहु शेतात तुमचा व छोगालाल चांदनमल माळेगांव असे दोघाचे मालकीचा असलेला सात दशांश हिस्सा तुम्ही आम्हांस रुपये २१०० मध्यें विकतेंदेण्याचे कबूल करून ता० ४।२।१५ इसवी रोजीं टीकीट लाऊन चिठ्ठी लिहुन दिली. त्याप्रमाणें ता० ११।२।१५ ई॥ रोजी तुमचे मालकीचे पांच दशांश हिश्शाबद्दल रुपये १५०० चें खरेदीखत तुम्ही आम्हास छोगालाल मथुरादास यांचे नांवानी करून देऊन त्याच दिवशीं रजीष्टर करून दिले. त्या खरेदीखतांत भरणा रजीष्टर समक्ष देण्याबद्दल लिहिला त्याप्रमाणें आम्ही तुम्हास रोख नगदी रुपये ४०० व दर्शनी हुंडी १ रुपये ११०० ची असे रुपये १५०० रजीष्टर समक्ष दिले खरेदीखत नोंदून आमचे जवळ आल नंतर आम्ही जाहिरनाम्यावरून पाहतां त्यांत तुमचे दुकानचे मालक फौजराज गुलाबचंद व बुलीदान सांगीदास असे आहेत. छोगालाल मथुरादास यांचे नांव मुळींच नाहीं. यावरून तुम्ही त्यांचे नांवानी करून दिलेले खरेदीखत आम्हास बुडविण्याचे हेतूनें करून दिले असे दिसते. म्हणून सदरहु हुंडीचे रुपये तुम्हांस न देण्याबद्दल ज्या इसमावर हुंडी दिली त्यांस आम्ही हुंडी लिहिणाराचे मार्फत कळविले. व मागहून असे ही समजले कीं तुमचे दुकानची व्यवस्था करते शेट फतेलालजी याचे कडेस आहे. करितां तुम्हांस या नोटिसीनें मुद्दाम कळविण्यांत येते कीं तुम्ही छोगालाल यांचे नांवानीं करून दिलेले खरेदीखत कायदेशीर नाहीं. ते तुम्ही तुमचे दुकानचे वर लिहीले प्रमाणें मालकाकडून ही नोटीस पावल्यापासून ४ चार दिवसाचे आंत करून द्यावे व तुमचे भरण्या पैकीं हुंडीचे राहिलेले रुपये ११०० घ्यावे व सदरहु खरेदीखतावर फतेलालजी यांची संमती बद्दल साक्ष घ्यावी. तसें न केल्यास तुमचेवर योग्य मालकाकडून खरेदीखत करून घेण्याबद्दल योग्य कोर्टात दावा करू व या नोटीशीचे खर्चा सुद्धां तुमचे पासून नुकसान भरून घेउ. खरेदी खतांत लिहिले प्रमाणें २ सेतें तुम्ही आमचे ताब्यांत दिले आहेच तसेच तुम्ही छोगालाल चंदनमल माळेगाव यांजकडून २/१० हिश्शाचे खरेदीखत रुपये ६०० चे वरील तारखेस करून दिले यांतही भरणा रजीष्टर समक्ष देण्य बद्दल लिहिले आहे. खरेदखत लिहीले नंतर सदरहु २/१० हिसा भिवराम रामपुत हीवरखेडकर यांचे जवळ सदरहु छोगालाल यांनीं ताबेगहाण दिल्याचे समजल्या वरून तेही अपुरे राहीलें आहे. तेंही खरेदीखत तुम्ही आम्हास बुडविण्याचे हेतूनें करून दिले करीतां वर लिहिले प्रमाणें ४ चार दिवसाचे आंत सदरहु खरेदीखतावर सदर्हू गाहाणदार यांनी ताबे गाहाणाचा हक्क सोडल्या बद्दल साक्ष देऊन खरेदीखत पुरे करून द्यावे, नाहींतर त्या बद्दल ही वर लिहीले प्रमाणे व्यवस्था करावी लागले कळावे ता. १७।२।१५

सही

गंगाधर गणेश जोशी रा० तेल्हारे

नो० नं० ७६

# युरोपांतील महायुद्ध.

—:*:*:*:—

## उपयुक्त व विविध माहितीचा संग्रह.

( रंगीत नकाशे व विविध चित्रें यांसह. )


सांप्रत युरोपांत जें महायुद्ध चाललें आहे, त्यासंबंधांत लागणारी सर्व प्रकारची माहिती थोडक्यांत वाचकांस समजावी, अशा उद्देशानें हें पुस्तक तयार केलेलें आहे. वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या लढाईच्या बातम्या या पुस्तकांत घेतलेल्या नसून, हल्लींच्या महायुद्धाचें ज्ञान सुलभ रीतीनें होईल अशा प्रकारची संगतवार हकीकत घेऊन, शेवटीं वेगवेगळ्या रणभूमीचे २ नकाशे; आणि सर्व जगाचा व युरोपांतील सर्व रणसंग्राम-भूमीचा एकत्र असे दोन रंगीत नकाशे, आणि लढाईत सामील झालेल्या राष्ट्रांचे बलाबल दाखविणारा नकाशा, याप्रमाणें पांच नकाशे या पुस्तकास जोडले आहेत. ह्या नकाशांत लढाईचीं मुख्य ठिकाणें, आरमारांच्या जागा, किल्ले मुख्य शहरें, नद्या, रेल्वे इत्यादि माहिती स्पष्ट करून दाखविली असून, शिवाय स्पष्टीकरणार्थ ३ कोश जोडले आहेत. या कोशांच्या आधारानें लढाईतील शहरांची, बंदरांची, गावांची, त्याचप्रमाणें लढाईत भाग घेणारे थोर पुरुष आणि शस्त्रास्त्रासंबंधानें वापरण्यांत येत असलेले पारिभाषिक शद्ब इत्यादि माहिती थोडक्यांत समजेल अशी योजना केली आहे. पुस्तकांतील विषयांचीं ४९ प्रकरणें केलीं असून त्यांत युरोपांतील राष्ट्रांची परिस्थिति, लढाईचीं कारणें, जर्मनी इंग्लंड, रशिया, फ्रान्स, आस्ट्रिया, सर्विया, टर्की, बेलजम इत्यादि राष्ट्रांचा परस्परांत झालेला पत्रव्यवहार नाकेबंदीचीं ठाणीं, व्यापाराचा प्रसार, वेगवेगळ्या राष्ट्रांच्या परिस्थितीची माहिती, लढाईशीं संबंध असलेल्या थोर पुरुषांची माहिती, आतांपर्यंत लढाईत घडलेल्या गोष्टींची त्रोटक माहिती, अशा प्रकारें विषयांची योजना करून पन्नासांवर चित्रेंहि घातलीं आहेत. कापडी पुठ्यांत बांधलेल्या पुस्तकाची किंमत १॥ रुपया, आणि साध्या कागदी पुठ्यांत बांधलेल्या पुस्तकाची किं. १ रु. आहे. परंतु 'इंदुप्रकाश' आणि 'श्रीसयाजीविजय' या पत्राच्या वर्गणीदारांस हें पुस्तक सन १९१९ सालची भेट म्हणून देण्यांत येतें. इंदुप्रकाश रोजचें पत्र असून त्याची वार्षिक वर्गणी टपालसह ९ रु. आहे, आणि सयाजीविजय हें साप्ताहिक पत्र असून त्याची वार्षिक वर्गणी टपालसह रु. २॥ आहे. वाटेल तेव्हां नांव दाखल करून वर्गणीदार होतां येतें. नमुना अंक फुकट मिळेल.

ठाकुरद्वार, मुंबई, दामोदर सांवळाराम आणि मंडळी.

---

सतत ९० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

दूषित रक्त शुद्ध करणारा




शरीराचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपलें शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळ व तदनुषंगिक होणाऱ्यां पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच सार्सापरिला देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु. १।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नकल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक–** डा. गौतमराव केशव, आणि सन्स
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई नंबर २

नो. नं. २३

---

## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी साठ्याचें तेल,

किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो"

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.

सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

### परमा सायरप.

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध. एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,
खबुतरखाना भुलेश्वर मुंबई

नो० नं० २४

---

## Oriental Government security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER.
THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDs 4 CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Extra Assunces. |
|---|---|---|
| | Rs | Rs. |
| 1888 | 8668 | 2,63,38 000 |
| 1893 | 17,657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8 47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 62 097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11 4 8,642 | 36 38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80 05,818 |
| [illegible] | 31 36 42 [illegible] | 1,40,32356 |
| 1903 | [illegible] | 2,10,[illegible]5,947 |
| 1908 | [illegible] | 3,22 79,99[illegible] |
| 1913 | 69,44,5 48 | 4,[illegible]1,61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London*

"At each of the last three Valuations the Reserves of the Compan have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resouaces of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essentia in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBRRAL
Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh,* NagPUr

N. N. 25

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें